४१ वा वर्धापन दिन

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

४१ वा वर्धापन दिन

सोलापूर | गुरुवार, ७ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २६९ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# वर्धापन दिनी 'तरुण भारत'वर शुभेच्छांचा वर्षाव!



सोलापूर : तरुण भारतला शुभेच्छा देताना आ.सुभाष देशमुख, कुलगुरु प्रा.प्रकाश महानवर, अक्कलकोट अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, सचिव शाम मोरे, उपाध्यक्ष अभय खोबरे, पोलीस आयुक्त एम.राजकुमार



'अश्विनी'चे चेअरमन बिपीनभाई पटेल, संचालक अशोक लांबतुरे, मनपा आयुक्त डॉ.सचिन ओंम्बासे, अ‍ॅड.धनंजय माने, मराठा सेवा संघाचे डॉ.जी.के.देशमुख, दत्तामामा मुळे, सुर्यकांत पाटील, श्री.साठे, पेठे फुडस्‌च्या उद्योजिका सुवर्णा पेठे, अ‍ॅड. चैतन्य पेठे, सौ.अनुजा पेठे

## ● विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती
## ● दैनिक तरूण भारत ठरला पत्रकारितेतील मानदंड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

सोलापूर दैनिक तरुण भारतचा ४१वा वर्धापनदिन विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. यावेळी आलेल्या मान्यवरांच्या शुभेच्छांचा वर्षाव झाला. दैनिक तरूण भारत पत्रकारितेतील एक मानदंड ठरला असून, वृत्तपत्रसृष्टीत दैनिक तरुण भारतची भरभराट अशीच होत राहो... अशा सदिच्छा उपस्थितांनी व्यक्त केल्या. आलेल्या मान्यवर पाहुण्यांनी अवघे सभागृह बहरले होते.

यावेळी आमदार सुभाष देशमुख, पोलिस आयुक्त एम. राजकुमार, मनपा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर, वित्त व लेखा अधिकारी महादेव खराडे, सहाय्यक कुलसचिव प्रा. डॉ. शिवाजी शिंदे, सोमनाथ सोनकांबळे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. सचिन गायकवाड, पोलिस उपाधीक्षक विजयालक्ष्मी कुर्री, जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के, पोलिस निरीक्षक सुनील दोरगे, दादासाहेब गायकवाड, चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, सचिव धवल शहा, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते हाजीमलंग नदाफ, श्रीकांत ढेपे, शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनेचे दशरथ गुरव, संतोष खेंडे, माजी विरोधी पक्षनेते पांडुरंग दिड्डी, संत सेवा मंडळाचे अध्यक्ष सुधाकर देशमुख, सह्याद्री फाऊंडेशनचे नेताजी खंडागळे, सुनील दावडा...

(उर्वरित पान २ वर)

### भारतमातेच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमास सुरुवात

दैनिक तरुण भारतच्या वर्धापनदिन सोहळ्याचा प्रारंभ भारत मातेच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आला. दै. तरूण भारतचे समुह संपादक दिलीप पेठे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. यावेळी मुख्य संपादक प्रशांत माने, अ‍ॅड. चैतन्य पेठे, सीईओ बी. श्रीनिवास, व्यवस्थापक विनायक पुला, जाहिरात व्यवस्थापक मनोहर बायणी, मराठवाडा विभाग प्रमुख राजाराम मस्के, वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, उपसंपादक अविनाश गायकवाड, किरण बनसोडे, आरती कुसेकर, शाम जोशी, अमोल व्यवहारे, अमोगसिद्ध मुंजे, मकरंद ढोबळे आदी उपस्थित होते.



अ‍ॅड.भारत कट्टे, पोलीस उपअधिक्षक विजयालक्ष्मी कुर्री, प्रभाकर क्षीरसागर आणि बार्शीच्या एकता महिला मंचच्या पदाधिकारी, महाराष्ट्राचा महागायक मोहम्मद अय्याज.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांचा रिपब्लिकन पक्षाच्यावतीने सत्कार

**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट -**
राज्याच्या कृषीमंत्रीपदी आ. दत्तात्रय भरणे यांची निवड करण्यात आल्याने महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. महाएऐराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री पद मिळाल्या मुळे महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री दत्ता भरणे यांचा भरणेवाडी येथील निवासस्थानी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक पक्षप्रमुख संजय सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राहुल शंके व पक्षातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्तिथ



### मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला शिवसेना उबाठा गटाचा पाठिंबा

**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**
मराठा समाजासाठी मनोज जरांगे लढा देत असून त्यांच्या आंदोलनाला शिवसेना उभाटा गट पूर्ण पाठिंबा देत असल्याची माहिती शहर प्रमुख प्रा. अजय दासरी यांनी दिली. मराठा समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी जरांगे यांचा संघर्ष महत्त्वपूर्ण असून, शिवसेनेतील सर्व शिवसैनिक त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील, असे त्यांनी सांगितले. मराठा समाजासाठी सुरू असलेली लढाई ऐतिहासिक असून, समाजाला न्याय मिळेपर्यंत हा पाठिंबा सुरू राहील, असेही प्रा. दासरी यांनी स्पष्ट केले. शिवसेना उबाठा गट आगामी काळात आंदोलनात सक्रिय सहभाग घेईल, असे संकेत त्यांनी दिले.



### चौधरी फौंडेशनतर्फे मेडिकल बँक सुरू

**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**
चौधरी फौंडेशनतर्फे गरजू पेशंटसाठी मेडिकल बँकची सुरुवात करण्यात आली. मेडिकल बँकेची सुरुवात तीन गरजू निराधार पेशंट ना वॉकर मान्यवरांच्या हस्ते देऊन करण्यात आली. मेडिकल बँक मध्ये गरजू व्यक्तींना वॉकर, कमोड खुर्ची, वॉकिंग स्टिक इत्यादी साधने तीन महिन्यांकारिता अगदी मोफत देण्याची सोय करण्यात आलेली आहे. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे प्रशांत बडवे, चौधरी फौंडेशनचे चेतन चौधरी, राष्ट्रवादी कॉंग्रेस वैद्यकीय कक्षाचे बसू कोळी, सिव्हिल हॉस्पिटलचे प्रशासकीय अधिकारी सुधीर सलगर, डॉक्टर लोणीकर, अनिकेत लांबतुरे उपस्थित होते.

### कै. सूर्यकांत माने-देशमुख यांच्या जयंतीनिमित्त आज विविध कार्यक्रम

**वेळापूर, दि.६ ऑगस्ट-**

लोकनेते कै. सूर्यकांत माने-देशमुख यांच्या ८५ व्या जयंतीनिमित्त तसेच विविध क्षेत्रांत प्रावीण्य मिळवलेल्या मान्यवरांचा सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रम गुरुवार, दि. ७ ऑगस्ट रोजी सकाळी ९:३० वाजता वेळापूर वि.का.स. सेवा सोसायटीत होणार आहे. आयोजन अमृतराज माने-देशमुख व अमरसिंह माने-देशमुख यांनी केले असून स्थानिक मान्यवरांच्या उपस्थितीत हा जयंती सोहळा साजरा होणार आहे.

### वर्धापन दिनी 'तरूण भारत'वर...

पान १ वरून
सेवानिवृत्त रजिस्टार दौलतराव सीताफळे, सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त दीपक आरवे, अश्विनी रूग्णालयाचे चेअरमन बिपीनभाई पटेल, विमानतळाचे माजी व्यवस्थापक सज्जन निचळ, सिंहगड कॉलेजचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, माजी महापौर नलिनी चंदेले, ॲड. यु. एन. बेरिया, तरुण भारतचे माजी संपादक अनिल कुलकर्णी, नारायण कारंजकर, विजयकुमार पिसे, रमेश बसाटे, दशरथ वडतिले, दत्तात्रय आराध्ये, सतीश पाटील, लेखक अनिल पाटील, लोकमतचे संपादक मिलिंद कुलकर्णी, व्यवस्थापक रमेश तावडे, रवी देशमुख, दिव्य मराठीचे संपादक महेश रामदासी, वृत्तसंपादक श्रीकांत कांबळे, श्रीनिवास दासरी, संजय जाधव, संचारचे जयप्रकाश अभंगे, अप्पू गोटे, हरीभाऊ कदम, पुण्यनगरीचे व्यवस्थापक व्यंकटेश पटवारी, वृत्तसंपादक रघुवीर मदने, सकाळचे माजी संपादक अभय दिवाणजी, सांजचे संपादक अविनाश कुलकर्णी, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक-शिक्षकेतर महासंघाचे राज्याध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर, राष्ट्रवादीचे किसन जाधव, आनंद चंदनशिवे, सुनिता रोटे, सुधीर खरटमल, प्रदेश सरचिटणीस सायरा शेख, महिला शहराध्यक्षा संगीता जोगदनकर, संभाजी आरमरचे श्रीकांत डांगे, काशिनाथ भतगुणकी, श्रीकांत वाघमारे, श्याम कदम, मीनल दास, माजी नगरसेवक अनंत जाधव, आरीफ शेख, सुनील रसाळे, चक्रपाणी गज्जम, हाजीमलंग नदाफ, गुरू वठारे, संदीप जव्हेरी, सचिन जाधव, मनपा जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, प्राचार्य बोधीप्रकाश गायकवाड, कुमार वाले, मनमोहन भुतडा, चंद्रकांत कुलकर्णी, गायक महंमद अयाज, राजेश जगताप, ॲड. धनंजय माने, ॲड. बाबासाहेब जाधव, ॲड. शशी कुलकर्णी, चित्रकार विठ्ठल मोरे, प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, कवी मारुती कटकधोंड, मसाप अध्यक्ष श्रुती वडकबाळकर, पद्माकर कुलकर्णी, भारतीय जैन संघटनेचे केतन शहा यांची उपस्थिती होती.

# नंबर प्लेटसाठी फक्त १० दिवस शिल्लक

■ यापुढे वेळमर्यादा वाढणार नाही, थेट कारवाईची शक्यता?

**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट -**
प्लेट लावण्याच्या प्रक्रियेला विविध अडथळ्यांमुळे अपेक्षित वेग मिळालेला नाही. महाराष्ट्रात एकूण सुमारे २.१ कोटी वाहनांपैकी केवळ २३ लाख वाहनांवरच आतापर्यंत या प्लेट्स बसवण्यात आल्या आहेत. वाहनांना 'एचएसआरपी' बसवण्याची प्रक्रिया १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करता येणार आहे. ही शेवटची संधी असून, यानंतर 'एचएसआरपी' नसलेल्या जुन्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याची शक्यता असल्याचे अधिकाऱ्यांमधून बोललण्यात येत आहे.

राज्यात सुमारे दोन कोटी जुनी वाहने आहेत. सद्यस्थितीत २३ लाख जुन्या वाहनांना 'एचएसआरपी' बसवण्यात आले आहेत. ४० लाख वाहनधारकांनी 'एचएसआरपी'साठीची ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण केली आहे. जवळपास सव्वा कोटी वाहने अद्याप 'एचएसआरपी'च्या कक्षेबाहेर आहेत. एप्रिल २०१९ नंतर नोंदणी होणाऱ्या नव्या वाहनांना डीलरकडून 'एचएसआरपी' बसवण्यात येत आहेत.

महाराष्ट्र परिवहन विभागाने १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांवर हाय सिक्युरिटी नोंदणी प्लेट लावणे अनिवार्य केले आहे. ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी १५ ऑगस्ट ही शेवटची मुदत देण्यात आली असून, यानंतर मुदतवाढ दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. मार्च २०२५, एप्रिल २०२५ आणि जून २०२५ या कालावधीत तीन वेळा मुदतवाढ देण्यात आलेली होती. मात्र आता परिवहन विभागाने अधिक कठोर पवित्रा घेतला आहे. १५ ऑगस्टनंतर जर वाहनावर प्लेट नसेल, तर भरारी पथक थेट कारवाई करत १,००० ते १०,००० रुपयांपर्यंत दंड ठोठावू शकते.

राज्यातील ६० प्रादेशिक-उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांची तीन मंडळांत विभागणी केली आहे. तीन मंडळांसाठी मेसर्स रोजमर्टा सेफ्टी सिस्टीम लिमिटेड, मेसर्स रियल मेजॉन इंडिया लिमिटेड, मेसर्स एफ टी ए एचएसआरपी सोल्यूशन्स प्रायव्हेट लिमिटेड अशा तीन कंपन्यांची निवड करण्यात आली आहे. एचएसआरपी ही भारत सरकारने वाहनांची सुरक्षा आणि ओळख वाढविण्यासाठी लागू केलेली एक अनिवार्य नंबर प्लेट आहे. ही एक विशेष प्रकारची नंबर प्लेट आहे, ज्यामध्ये एक सिरीयल नंबर आणि न काढता येणारा लॉक असतो. ही नंबर प्लेट चोरी, वाहन ट्रॅकिंग आणि इतर सुरक्षा कारणांसाठी महत्त्वाची आहे. भारतातील सर्व नवीन आणि जुन्या वाहनांसाठी नंबर प्लेट असणे अनिवार्य आहे.



#### सोलापुरमध्येही

सोलापूर जिल्ह्यातील सोलापूर व अकलूज आरटीओ कार्यालयांतर्गत सुमारे ११ लाख वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यात येणार आहेत. त्यापैकी २ लाख ४० हजार वाहनधारकांनी नंबरप्लेटसाठी अपॉइंटमेंट घेऊन त्यापैकी १ लाख २७ हजार १७३ वाहनांना नंबर प्लेट बसविण्यात आल्या आहेत. तर अकलूज कार्यालयाकडील १ लाख ९८ हजार १२२ वाहनांपैकी २३ हजार ८८० वाहनधारकांनी एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घेतली असून ५ हजार ७१७ जणांनी अपॉइंटमेंट घेतली असल्याचे सहायक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अमरसिंग गवारे यांनी दिली.

#### या कारणास्तव दिली होती मुदतवाढ...

एचएसआरपी प्लेट लावण्याच्या प्रक्रियेला विविध अडथळ्यांमुळे अपेक्षित वेग मिळालेला नाही. महाराष्ट्रात एकूण सुमारे २.१ कोटी वाहनांपैकी केवळ २३ लाख वाहनांवरच आतापर्यंत या प्लेट्स बसवण्यात आल्या आहेत. ऑनलाइन नोंदणीतील तांत्रिक समस्यांमुळे, फिटमेंट केंद्रांवरील वाढलेली गर्दी, प्लेट्सची कमी उपलब्धता आणि ग्रामीण भागात जनजागृतीचा अभाव यामुळे मुदतवाढीचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे अनेक वाहनचालक अडचणीत सापडले आहेत.

#### एचएसआरपी कोणासाठी अनिवार्य आहे?

१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी दुचाकी, तिनचाकी, चारचाकी तसेच खासगी आणि व्यावसायिक वाहनांसाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट बसवणे कायद्यानुसार आवश्यक आहे. या प्लेटमध्ये क्रोमियमवर आधारित होलोग्राम, लेसरने कोरलेली यूनिक ओळख क्रमांक आणि न हटवता येणाऱ्या स्नॅप लॉकसह टॅम्पर-प्रूफ वैशिष्ट्ये असतात. एप्रिल २०१९ नंतर विक्री झालेल्या नव्या वाहनांवर एचएसआरपी आधीच बसवलेले असतात.

#### नोंदणी प्रक्रिया कशी कराल

- ऑनलाईन अर्ज :
- योग्य आरटीओ निवडा :
- वाहन तपशील भरा :
- अपॉइंटमेंट ठरवा :
- पेमेंट : दुचाकी : ५३१, तीनचाकी : ५००, चारचाकी: ७४५ (जीएसटीसह)
- होम डिलिव्हरीसाठी : दुचाकी १२५ रूपये आणि चारचाकी २५० रुपये अतिरिक्त.
- फिटमेंट प्रक्रियेचा दिवस : अपॉइंटमेंटच्या दिवशी आरसी, ओळखपत्रासह वाहन घेऊन फिटमेंट सेंटरवर जा.

#### १५ ऑगस्ट २०२५ नंतर काय होईल?

या तारखेनंतरही जर एखाद्या वाहनावर लावलेली नसेल, तर मोटर वाहन कायदा कलम १७७ अंतर्गत १,००० ते १०,००० इतका दंड ठोठावला जाईल. तथापि, जर एखाद्या वाहनधारकाने १५ ऑगस्टपूर्वी अपॉइंटमेंट बुक केली असेल आणि त्याची फिटमेंट तारीख नंतरची असेल, तर त्याला दंड लावला जाणार नाही.

## लाचखोर भूमी अभिलेख कार्यालयातील दुरुस्ती लिपिकास जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

भूमी अभिलेख कार्यालयातील लाचखोर दुरुस्ती लिपीकास जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. जे. कटारीया यांनी जामीन मंजूर केला.

यातील तक्रारदाराच्या शेतजमिनीची फोड करून त्यामध्ये विहीर व विंधन विहिरीची नोंद घेणेकामी दक्षिण सोलापूर भूमी अभिलेख कार्यालय येथील दुरुस्ती लिपिक शंकर बजबळकर यांनी तक्रारदाराकडे १० हजार रुपये लाचेची मागणी केलेली होती. त्यामुळे तक्रारदाराने सोलापूर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे आरोपी शंकर बजबळकर यांच्याविरुद्ध रितसर तक्रार नोंदवलेली. त्यानुसार लाचेबाबतची सरकारी पंचांसमक्ष पडताळणी करण्यात आली असता, आरोपी शंकर बजबळकर यांनी तक्रारदारांकडे १० हजार रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती ९ हजार रुपये स्वीकारण्याचे कबूल केले होते. त्यावेळी शंकर बजबळकर यांनी सदर लाचेची रक्कम ही रिक्षाचालक सुरज सर्वगोड यांच्याकडे देण्यास सांगितले. सदरची रक्कम स्वीकारताना सुरज सर्वगोड यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिसांनी रंगेहात पकडले होते. आरोपींविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याच्या कलमानुसार सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येऊन त्यांना सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयासमोर हजर करण्यात आले.

आरोपी शंकर बजबळकर व सुरज सर्वगोड यांनी जामीनासाठी जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केल्यानंतर त्याच्या सुनावणीवेळी आरोपीच्यावतीने करण्यात आलेला युक्तिवाद ग्राह्य धरून जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. जे. कटारीया यांनी आरोपींची जामीनावर मुक्तता केली.

यात आरोपींच्यावतीने ॲड. निलेश जोशी, ॲड. यशश्री जोशी, ॲड. राणी गाजूल, ॲड. ओंकार परदेशी, ॲड. मधुश्री देशपांडे, ॲड. तेजस साळुंखे यांनी काम पाहिले.

## माजी नगरसेवकसह पुत्र दोन वर्षासाठी तडीपार

**गुन्हे करणारी टोळी सोलापूर व धाराशीव जिल्हयातून दोन वर्षाकरीता तडीपार**



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**
शहरात गुन्हे करणाऱ्या टोळीतील माजी नगरसेवकसह त्याचा पुत्र यास पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी दोन वर्षासाठी सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून तडीपार केले. इब्राहीम खाजासाब कुरेशी(वय ५२) अलिम इब्राहीम कुरेशी (वय ३५, दोघे रा. शास्त्री नगर, अन्सारी चौक, सोलापुर) अशी तडीपार केलेल्याची नावे आहेत. याचेविरुध्द सन २००९, २०१५, २०१६, २०१८, २०२१ व २०२५ या कालावधीमध्ये टोळीच्या माध्यमातून गैरकायद्याची मंडळी जमा करुन दंगा व मारामारी करणे, जनावरांची निर्दयतेने, क्रूरतेने वाहनात कोंबून वाहतूक करणे, गोवंश जातीच्या जनावरांच्या कत्तलीमुळे जातीय तणाव निर्माण होवून कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण करणे, गोवंशीय जनावरांचे कत्तलीच्या अनुषंगाने सामान्य नागरीकांना शिवीगाळ, दमदाटी व मारहाण करणे यासारखे गुन्हे दाखल आहेत. त्याचेविरुध्द सदर बझार पोलीस ठाणेकडून महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ५५ अन्वयेचा तडीपार प्रस्ताव पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ), सोलापूर शहर यांना सादर करण्यात आला होता. पोलीस उप आयुक्त विजय कबाडे यांनी कार्यवाही करुन माजी नगरसेवक इब्राहीम कुरेशी व अलिम इ कुरेशी यास सोलापूर व धाराशीव जिल्हा येथून दोन वर्षाकरीता तडीपार केलेबाबतचा आदेश पारित करण्यात आला आहे.

## लिंकद्वारे सव्वा चार लाख रुपयांची महिलेची फसवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट -**
लिंकद्वारे डेटा चोरी करून महिलेची सव्वा चार लाख रुपयांची फसवणुक केल्याप्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रेणु व्यंकटेश बोमकंटी (वय ३७, रा. सरदार निवास, शिवरत्न नगर, जुळे सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.रेणु बोमकंटी यांचे कार्यालय किर्लोस्कर फेरियस एटीडी होटगी रोड शिवशाही सोलापूर येथे असताना अज्ञात आरोपींनी त्यांनी सादर केल्याप्रमाणे सर्व ऋणको खातेधारक यांनी बोमकंटी यांच्या वापरत्या एचपी कंपनीचे फ्युअल कार्ड मध्ये अनधिकृत प्रवेश करून कस्टमर आयडी तयार केला व ओटीपीद्वारे लिंक असलेल्या मोबाईलमध्ये प्रवेश करून त्याद्वारे बोमकंटी यांची ४ लाख २४ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणुक केली. म्हणून सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक गजा पुढील तपास करीत आहेत.

### मधमाशांनी चावा घेतल्याने एकजण रुग्णालयात

**सोलापूर :** मधमाशांनी चावा घेतल्याने एकजण उपचाराकरीता रुग्णालयात दाखल झाला. हा प्रकार मोहोळ तालुक्यातील कामती खुर्द येथे मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास घडला. दत्तात्रय भगवान लांबतुरे (वय ५२, रा. कामती खुर्द, ता. मोहोळ) असे मधमाशांनी चावा घेतलेल्या व्यक्तीचे नाव आहे. दत्तात्रय हे मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास कामती खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेजवळ थांबले होते. त्यावेळी तेथील मधमाशांच्या पोळ्यातील सुमारे २० ते २५ मधमाशांनी त्यांना चावा घेतला. कामती येथील सरकारी रुग्णालयात उपचार घेऊन रात्री ११.२५ वाजता रमेश याने दाखल केले.

## वाहनाच्या धडकेने कारचालकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट -**
धडक दिल्याने कारचालकाच्या मृत्यूप्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आशिष पनशेट्टी (वय ४२, रा. तडवळ, ता. अक्कलकोट) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. याबाबत सविता आशिष पनशेट्टी (वय ३५, रा. तडवळ) या महिलेच्या फिर्यादीवरुन अज्ञात वाहनचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ जुलै रोजी अशिष पनशेट्टी हे एमएच १३ सीएस ०३०८ क्रमांकच्या चारचाकी वाहनातून सोलापूर ते तडवळ जात होते. त्यावेळी हत्तुर गाव ते मद्रे रोडवर अज्ञात वाहनचालाकने कारला जोरदार धडक दिली. त्यामध्ये चारचाकी कारमधील अशिष पनशेट्टी हे गंभीर जखमी होऊन मरण पावले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक न्यामणे पुढील तपास करीत आहेत.


## सोलापुरातील 'ते' चार भाविक 'सेफ'

■ आरडीसी अभिजित पाटलांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**
गेल्या काही दिवसांपासून सर्वत्र पाऊस सुरू असून, उत्तराखंडच्या उत्तर काशी जिल्ह्यातील धराली गावात मगळवारी ढगफुटी झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे त्या गावाचं प्रचंड नुकसान झालं आहे, ज्यामध्ये अनेक घरं, दुकानं, लॉज, बाजारपेठा आणि हॉटेल्स वाहून गेली आहेत. या दुर्घटनेत सोलापुरातील चार भाविक अडकले असले तरी ते सेफ ठिकाणी असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना दिली.

सोलापुरातून धार्मिक पर्यटनासाठी गेलेले धीरज बगले, समर्थ दासरी, विठ्ठल पुजारी व मल्हारी धोत्रे अशी चार भाविकांची नावे आहेत. हे भाविक हरिव्दार येथे दर्शनासाठी गेले होते. उत्तराखंडमधील ०८ टीए ५६७२ या क्रमांकाच्या गाडीतून त्यांनी प्रवास केला. या चार भाविकांचे अंतिम लोकेशन हे गंगोत्री पार्किंग दरम्यान आहे.

या भागात बचाव कार्यासाठी उत्तराखंड पोलीस, एसडीआरएफ, एनडीआरएफ आणि भारतीय लष्कराचं पथकं घटनास्थळी पोहोचलं असून, बचावकार्य वेगाने सुरू करण्यात आलं आहे, परंतु मुसळधार पाऊस आणि रस्ते बंद असल्याने मदतकार्यात अडचणी निर्माण झाल्या असल्याचेही सांगण्यात आले. या चार भाविकांचे अंतिम लोकेशन हे गंगोत्री पार्किंग दाखविण्यात आले असून, ५ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री ११ वाजता त्यांचा कुटुंबियांशी संवाद झाला होता अशी माहिती आपत्कालीन यंत्रणेकडून मिळाली. सध्या पुरात अडकलेल्यांचा शोध सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, सध्या चारही कुटुंबियांना मोठी भीती वाटत असून ते सर्वजण काळजीत पडले आहेत. याबाबत आरडीसी पाटील यांच्याशी संवाद साधल्यावर ते चार भावीक सुखरूप असल्याचे त्यांनी सांगितले.



#### खासदार प्रणिती शिंदे डेहराडून प्रशासनाच्या संपर्कात

उत्तराखंडमध्ये अचानक भीषण पावसामुळे अनेक ठिकाणी ढगफुटी झाली असल्याने सोलापूरचे चार पर्यटक उत्तराखंडमध्ये अडकले असल्याची माहिती मिळाल्यावर खासदार प्रणिती शिंदे या डेहराडून प्रशासनाच्या संपर्कात आहेत. तर त्यांनी या चार जणांच्या कुटुंबियांशी संपर्क साधून दिलासा दिला. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून प्राप्त माहितीनुसार, ओम साई ट्रॅव्हल्समार्फत हरिद्वारहून प्रवास करणारे धीरज बगले, समर्थ दासरी, विठ्ठल पुजारी आणि मल्हारी धोटे हे चार पर्यटक सध्या संपर्काबाहेर आहेत. जखमींच्या यादीत या चार नागरिकांची नावे नसल्याने ते सुखरूप असावेत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच खासदार प्रणिती शिंदे या डेहराडून येथील स्थानिक प्रशासन, जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्याशी सातत्याने संपर्कात राहून अडकलेल्या पर्यटकांविषयी माहिती मिळवण्याचे प्रयत्न करत आहेत.

## नंदिकेश्वर दूध संकलन केंद्राचे भाऊसाहेब काळे यांना जामीन मंजूर

■ विधानसभेत गाजलेले दूध भेसळ प्रकरण


**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट -**
विधानसभेत गाजलेल्या करकंब (ता. पंढरपूर) येथील दूध भेसळ प्रकरणातील आरोपींचा उच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला.

भोसे येथील जाधव भेसळयुक्त व बनावट दूध बनवण्याची पेढी सुरू करून दूध संकलन केंद्रांमार्फत विक्री करत असल्याची माहिती सहायक पोलिस निरीक्षक कुंजीर यांना मिळाली. त्यावरून त्यांनी २० फेब्रुवारी रोजी प्रत्यक्ष धाड घालत मुख्य आरोपी हे बनावट व भेसळयुक्त दूध करत असल्याचे आढळून आलेला होता. त्यानुसार अन्न व सुरक्षा अधिकारी उमेश भुसे यांच्या फिर्यादीवरुन करकंब पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणाचा तपास हा पंढरपूर उपविभाग पोलिस अधिकारी यांनी करून एकूण दहा आरोपींना अटक करून अनेक भेसळयुक्त पदार्थ व आर्थिक व्यवहारासंदर्भातील कागदपत्रे जप्त करत आरोपींविरुद्ध पंढरपूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

या प्रकरणातील आरोपी नंदिकेश्वर दूध संकलन केंद्राचे भाऊसाहेब बाळासाहेब काळे यांना देखील अटक करण्यात आली होती. त्यांचा जामीन अर्ज पंढरपूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी फेटाळल्यानंतर काळे यांनी मुंबई उच्च न्यायालयात जामीनासाठी अर्ज केला होता. त्या जामीन अर्जाची चौकशीवेळी आरोपीच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायमूर्ती अश्विन बोबे यांनी आरोपीची जामीनावर मुक्तता केली. याप्रकरणात सरकारपक्षातर्फे ॲड. अनामिका मल्होत्रा यांनी तर आरोपी भाऊसाहेब काळे यांच्यावतीने ॲड. निलेश जोशी, ॲड. यशश्री जोशी, ॲड. प्रसाद कुलकर्णी, ॲड. अमोल कणकी यांनी काम पाहिले.

## विचारपुष्प



सत्ताप्राप्ती हेच अंतिम ध्येय, असा आजकाल समाजाचा समज झाल्यामुळे सगळ्या कामांकडे त्याच दृष्टीने बघितले जाते. पण देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या महापुरुषांना सत्तेचा मोह होता काय? त्या प्रत्येकाच्या मनात एकच भावना होती की, आमच्यासारखे सुपुत्र असताना आमची भारतमाता पारतंत्र्यात का असावी? आज भारताच्या परम वैभवासाठी तीच उदात्त भावना ठेवून संघ स्वयंसेवक कार्यरत आहेत, हा भाव समाजाचा बनावा.

**- प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

## महत्त्वाचे

### सात कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त, पाच अटकेत

**गुवाहाटी** : दोन वेगवेगळ्या कारवाईत सात कोटी रुपयांहून अधिक किमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले. या जप्तींप्रकरणी आसामच्या कछार जिल्ह्यात पाच जणांना अटक करण्यात आली, असे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी सांगितले. विशिष्ट माहितीवरून कारवाई करत, पोलिसांनी जिल्ह्यात दोन कारवाई केली आणि दोन वाहनांसह २१६ ग्रॅम हेरॉइन आणि २० हजार याबा गोळ्या जप्त केल्या, असे मुख्यमंत्र्यांनी एक्सवर पोस्ट केले. सात कोटी रुपयांचे अंमली पदार्थ, आता धुरात! आसाम पोलिस ठाम आहे, अंमली पदार्थांसाठी जागा नाही, सरमा म्हणाले. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया आधीच सुरू करण्यात आल्या आहेत.

### महाराष्ट्रात मासळी उत्पादनात वाढ



**कोची** : केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्थेने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, यावर्षी देशभरात एकूण ३४.७ लाख टन सागरी मासळी पकडण्यात आली. मागील वर्षाच्या तुलनेत ती दोन टक्क्यांनी कमी आहे. या घसरणीनंतरही गुजरातने आपले अव्वल स्थान कायम राखले. तर महाराष्ट्राच्या मासळी उत्पादनात ४७ टक्क्यांनी वाढ नोंदवण्यात आली. मासळी उत्पादनात गुजरात राज्याने ७.५४ लाख टन उत्पादनासह पुन्हा एकदा पहिला क्रमांक पटकावला आहे. त्याखालोखाल तामिळनाडू ६.७९ लाख टन आणि केरळ ६.१० लाख टन यांचा क्रमांक लागतो. देशभरात पकडल्या गेलेल्या मासळीमध्ये 'बांगडा' हा मासा सर्वाधिक लोकप्रिय ठरला असून, त्याचे उत्पादन २.६३ लाख टन झाले आहे. त्यानंतर 'तारळी' या माशाचे २.४१ लाख टन उत्पादन झाले. मात्र, मागील वर्षाच्या तुलनेत या दोन्ही प्रमुख माशांच्या उत्पादनात घट नोंदवण्यात आली. यावर्षी 'डाना', 'रेमल' आणि 'आसना' यांसारख्या चक्रीवादळांमुळे मासेमारीच्या दिवसांवर मोठा परिणाम झाला.

# अमेरिकेने भारतावर लादले ५० टक्के शुल्क

## अडेलतट्टू ट्रम्प यांचा निर्णय; २७ ऑगस्टपासून होणार लागू



**वॉशिंग्टन, ६ ऑगस्ट**

पुढील २४ तासांत भारतावर शुल्क लादू, अशी धमकी देणारे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बुधवारी सायंकाळी आणखी २५ टक्के अतिरिक्त कर लादला. यामुळे भारतावर एकूण ५० टक्के व्यापार शुल्क द्यावे लागणार आहे. २५ टक्के शुल्काची आकारणी गुरुवारपासून केली जाईल, तर अतिरिक्त २५ टक्के शुल्क २७ ऑगस्टपासून आकारले जाईल. यासंदर्भातील कार्यकारी आदेशावर स्वाक्षरी केली. भारत सातत्याने रशियाकडून तेलखरेदी करीत असल्याने हा निर्णय घेतल्याचे त्यांनी म्हटले. ट्रम्प यांच्या या निर्णयाचा भारताने निषेध व्यक्त केला आहे.

यापूर्वी अमेरिकेने भारतावर २५ टक्के शुल्क आणि दंड आकारण्याची घोषणा केली होती. ट्रम्प यांनी स्वाक्षरी केलेल्या आदेशानुसार, या शुल्काची २१ दिवसांत अंमलबजावणी केली जाईल. म्हणजेच २७ ऑगस्टपासून भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या वस्तूंवर ही शुल्क आकारणी केली जाईल. या तारखेपूर्वी अमेरिकेला रवाना झालेल्या १७ सप्टेंबरपूर्वी अमेरिकेत पोहोचणाऱ्या वस्तूंवर सूट मिळेल. हे टेरिफ सर्वच शुल्क आणि करांच्या अतिरिक्त असेल आणि काही खास प्रकरणांत सवलत दिली जाऊ शकते, असे आदेशात म्हटले आहे.

रशियाकडून कोणत्याही देशाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष खनिज तेलाची खरेदी केल्यास, त्यावर अशीच कारवाई केली जाईल, असे संकेत ट्रम्प प्रशासनाने दिले आहेत. रशिया किंवा इतर कोणत्याही प्रभावित देशाने अमेरिकेच्या धोरणांनुसार पावले उचलल्यास, या आदेशात बदल केला जाऊ शकतो, असे त्यात म्हटले आहे.

२०२२ मध्ये घोषित केलेल्या राष्ट्रीय आणिबाणीचा आधार या आदेशासाठी घेण्यात आला. रशियाने युक्रेनवर केलेल्या हल्ल्याबद्दल या देशाच्या खनिज तेलाच्या आयातीवर प्रतिबंध लादला होता. प्रतिबंधाकडे दुर्लक्ष करून भारताने रशियाकडून तेल खरेदी सुरूच ठेवली आहे. याचा आर्थिक फायदा रशियाला होत असून, त्यामुळे भारतावर शुल्क लादण्यात आल्याचे ट्रम्प यांनी म्हटले. (वृत्तसंस्था)

### 'त्या' सर्वच देशांवर होणार कारवाई

कोणत्याही देशाने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे रशियाकडून खनिज तेलाची खरेदी केल्यास, त्याच्यावरही असेच शुल्क लादले जाईल, असेही ट्रम्प यांनी या आदेशात म्हटले आहे. याबाबतची चौकशी अमेरिकी वाणिज्य मंत्री करेल आणि परराष्ट्र व्यवहार मंत्र्याच्या सल्ल्यानुसार राष्ट्राध्यक्ष ट्रम्प कारवाईची शिफारस करतील.

### कोणतेही पेट्रोलियम उत्पादन खरेदी केल्यास खबरदार

रशियन खनिज तेल म्हणजे केवळ रशियातून निर्यात केलेले तेल नव्हे. रशियात उत्पादन घेतलेले कोणतेही पेट्रोलियम उत्पादन किंवा तिसऱ्या देशाच्या माध्यमातून मूळ स्रोत रशिया असलेले पण भारताकडून तेलाची खरेदी केल्यास शुल्क लादले जाईल, असे आदेशात म्हटले आहे. या कायद्याचा कोणताही भाग कायदेशीर दृष्ट्या अमान्य घोषित झाल्यास, याच्या उर्वरित भागाचा प्रभाव पडणार नाही. कोणत्याही व्यक्तीला अमेरिकी न्यायालयात जाऊन याला आव्हान देण्याचा कोणताही विशेषाधिकार नसेल, असे या आदेशात म्हटले आहे.

# 'हिंदू' हाच मानव धर्म

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन




मुकुंदराव पणशीकर भवनाचे लोकार्पण करताना सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत. शेजारी भय्याजी जोशी, शरद ढोले, सुनील भूलगावकर

### धर्मजागरण न्यासच्या मुकुंदराव पणशीकर भवनाचे लोकार्पण

**नागपूर, ६ ऑगस्ट**

जगाने स्वीकारावा असा हिंदू धर्म आहे आणि हिंदू धर्मच मानवधर्म शिकवितो, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी बुधवारी येथे केले. दक्षिण नागपुरातील भगवान नगर पोस्ट ऑफिसमागे धर्मजागरण न्यासची 'मुकुंदराव पणशीकर भवन' ही नवनिर्मित वास्तू उभारण्यात आली आहे. या वास्तूचे लोकार्पण सरसंघचालकांच्या हस्ते झाले. त्यानंतर जवळच असलेल्या धनश्री मंगल कार्यालयात त्यांचे उद्बोधन झाले.

यावेळी रा. स्व. संघाचे विदर्भ प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार, सह संघचालक श्रीधर गाडगे, महानगर संघचालक राजेश लोया, धर्मजागरण प्रमुख शरद ढोले, विदर्भ प्रांत प्रमुख सुनील भूलगावकर, महानगर प्रमुख विजय कैथे व्यासपीठावर उपस्थित होते.

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले, धर्माचे कुठलेही कार्य हे पवित्रच असते. समाज व राष्ट्रसेवा करणारा हाच खरा धर्म आहे. तसा आदर्श उभा केला तरच त्याचा स्वीकार होईल. हिंदू धर्म विविधतांचा स्वीकार करण्याची शिकवण देतो. हिंदू धर्म मानवतेचे आचरण शिकवतो. मार्ग वेगवेगळे असले तरी साध्य सर्वांचे सारखेच असते. त्यामुळे इतरांचा मार्ग बदलण्याचा प्रयत्न व्हायला नको. कुणाचा मार्ग कुठला आहे, यावर संघर्ष व्हायला नको. सनातन धर्म हा आत्मीयता व विविधतेचा स्वीकार करण्याची शिकवण देतो. भारतात विविधतेत एकता आहे. विविधतांचा स्वीकार करणे हाच खरा धर्म आहे. ईश्वरप्राप्तीसह समाजकार्य हेदेखील धर्माचे उद्दिष्ट असते. धर्म सत्य, अहिंसेच्या मार्गावर चालत असेल तर समाजात संतुलन व शांती कायम राहते.

धर्मजागरण होईल तेव्हाच हिंदू धर्माचे आचरण अस्तित्वात राहील. जगाला दिशा दाखविण्याची क्षमता भारतात आहे, यावर डॉ. मोहनजी भागवत यांनी भर दिला.

इमारत निर्माणकार्यात सहयोग करणारे धीरज महाकाळकर, विवेक देशकर व चंदनसिंह यांचा सत्कार करण्यात आला. रा. स्व. संघाचे अ. भा. कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी, माजी आमदार सुधाकर कोहळे, राम हरकरे, मधुमेहतज्ज्ञ डॉ. सुनील गुप्ता, महानगरातील भाग व नगर संघचालक आदींसह महानगर, विदर्भातील महिला-पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

#### कर्तव्य पालनदेखील धर्म

कर्तव्यांचे पालनदेखील धर्म होय. तसेच राजधर्म, प्रजाधर्म, पितृधर्म पाळले गेले पाहिजेत. जीवनात कठीण प्रसंग आल्यास अनेकांचा संयम सुटतो, संतुलन बिघडते. मग ते सन्मार्ग सोडतात. पण पुरुषार्थी लोक न थकता, न थांबता पूर्ण शक्तिनिशी कठीणप्रसंगीही धर्माप्रति ठाम राहतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातही संकटे आलीत, पण त्यांनी शक्ती व युक्तीने मार्ग काढलाच. धर्मनिष्ठा ठाम व मजबूत हवी. धर्मासाठी अनेकांनी बलिदान दिले आहे. त्यांच्यावर अत्याचार झाले, पण त्यांनी धर्म सोडला नाही. असेच लोक आदर्श असतात, असेही डॉ. मोहनजी भागवत म्हणाले.

# रेपो दर 'जैसे थे'

## ईएमआय वाढणार नाही
## पतधोरण समितीच्या बैठकीत निर्णय

**मुंबई, ६ ऑगस्ट**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतविषयक धोरण समितीने रेपो दरात कोणताही बदल न करता तो ५.५ टक्के एवढा कायम ठेवला. याबाबतची माहिती बुधवारी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली. रेपो रेट न वाढवल्याने ईएमआय वाढणार नाही. हा सामान्यांना दिलासा आहे.

रिझर्व्ह बँकेने फेब्रुवारीपासून तीन वेळा रेपो दरात एकूण १०० बेसिस पॉईंटची कपात केली आहे. आता रेपो 'दर जैसे'थे ठेवला आहे. सणासुदीपूर्वी कर्जाची मागणी सामान्यतः वाढते. या पृष्ठभूमीवर रिझर्व्ह बँकेने पतधोरण जाहीर केले आहे.

आरबीआय पतधोरण समितीने तटस्थ भूमिका घेत इतर व्याज दरांतही कोणताही बदल केलेला नाही. आरबीआयने स्थायी ठेव सुविधा ५.२५ टक्के आणि सीमांत स्थायी सुविधा, बँकिंग दर ५.७५ टक्के एवढा कायम ठेवला आहे. रेपो दर हा एक महत्त्वाचा दर असतो. ज्यावर रिझर्व्ह बँक इतर बँकांना कर्ज पुरवठा करते.

जूनमध्ये महागाई नियंत्रणात राहिल्याने ग्राहक किंमत निर्देशांक महागाई २.१ टक्क्यांपर्यंत खाली आली. तसेच अमेरिकेच्या टॅरिफ धोरणांमुळे जागतिक व्यापारात अनिश्चितता वाढली आहे. या पृष्ठभूमीवर रिझर्व्ह बँकेने तटस्थ धोरण अवलंबवले आहे. मध्यम कालावधीत, बदलत्या जागतिक वातावरणातही अंतर्भूत ताकदीचा जोरावर भारतीय अर्थव्यवस्थेला संधी उज्ज्वल आहेत, अशी आशा संजय मल्होत्रा यांनी व्यक्त केली आहे. (वृत्तसंस्था)



"मुख्य महागाईचा दर आधीच्या अंदाजापेक्षा खूपच कमी आहे. अन्नधान्याच्या स्थिर किमतींमुळे हे घडले आहे. या आर्थिक वर्षाच्या अखेरच्या तिमाहीपासून महागाई वाढीचा अंदाज आहे. आम्ही आधी जाहीर केलेल्या अंदाजांप्रमाणे ही वाढ अधिक राहू शकते. टॅरिफची अनिश्चितता अजूनही कायम आहे. मॅक्रोइकॉनॉमिक स्थिती पाहता रेपो दर ५.५ टक्क्यांवर कायम ठेवण्याची आवश्यकता आहे.''

**- संजय मल्होत्रा**
भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर

### छत्तीसगडमध्ये नऊ नक्षलवाद्यांची शरणागती

**बिजापूर** : छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात नऊ नक्षलवाद्यांनी बुधवारी शरणागती पत्करली. यातील सहा जणांच्या शिरावर एकूण २४ लाख रुपयांचे बक्षीस होते, असे पोलिसांनी सांगितले.

माओवादाची पोकळ विचारसरणी, निष्पाप आदिवासींवर होणारे अत्याचार आणि प्रतिबंधित संघटनेत मोठ्या प्रमाणात वाढलेल्या मतभेदांना कंटाळून या नक्षलवाद्यांनी पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या (सीआरपीएफ) वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर शरणागती पत्करली, असे बिजापूरचे पोलिस अधीक्षक जितेंद्रकुमार यादव यांनी सांगितले.



## निसर्गाचा प्रकोप

उत्तरकाशीतील धराली या गावावर मंगळवारी निसर्गाचा प्रकोप झाला. अवघ्या ३६ मिनिटांत शेकडो घरांच्या वस्तीचे हे गाव होत्याचे नव्हते झाले. सर्वत्र केवळ चिखल, मलबा आणि पाणी साचलेले आहे. बुधवारी लष्कराने मदत कार्याला सुरुवात केली. या गावापर्यंत पोहोचणारे मार्गही दरड कोसळल्याने बंद झाले.

- महाराष्ट्राचे ५१ पर्यटक उत्तरकाशीत सुरक्षित
- केरळातील २८ बेपत्ता
- अजूनही १०० पेक्षा जास्त नागरिक बेपत्ता
- मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता

**उत्तरकाशीतील जलप्रलयात ११ जवान बेपत्ता** (पान ३ वर)

# रेकॉर्ड ब्रेक मराठे मुंबईत घुसणार

**मनोज जरांगे-पाटील**

## पुन्हा असा मराठ्यांचा समुद्र कधी पाहायला मिळणार नाही

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

मराठा आरक्षणाची ही अंतिम लढाई, आरपारची लढाई आहे. ऐतिहासिक विजय आपलाच होणार आहे. रेकॉर्ड ब्रेक मराठे मुंबईत घुसणार आहेत. असा मराठ्यांचा दुसरा समुद्र कुठेच पाहिला मिळणार नाही, तो २९ ऑगस्टला पाहायला मिळणार आहे. तर सर्व मराठा बांधवांनी त्या घटनेचा साक्षीदार व्हा कोणीही सोशल मीडियावर घरी बसून पाहू नका. ही अंतिम लढाई असणार आहे. शांततेत जाऊन शांततेत यायचं आहे. आरक्षणाचा विषय मार्गी लागल्याशिवाय परत फिरायचं नाही. सरकारने काही घडवून आणले तरी एक इंच देखील तेथून सरकायचं नाही असे आवाहन बुधवारी मनोज जरांगे-पाटील यांनी पत्रकार परिषदेत केले.



धाराशिव पासून पश्चिम महाराष्ट्राचा दौरा सुरू केला असून आज सोलापुरात होते. मराठा समाजातील बांधवांशी २९ ऑगस्टला मुंबईला जायचं याची चर्चा करण्यात आली. ज्याची कुणबी नोंद निघाली त्याने गाडी घेऊन मुंबईकडे निघायचं. मुंबईला येताना पाण्याचे टँकर हे सोलापुरातून घेऊन यावेत. डॉक्टरांनी ॲम्बुलन्स घेऊन यावे व सेवा द्यावी असे आवाहन त्यांनी केले. संघर्षयोद्धा जरांगे-पाटील यांची बुधवारी ६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजल्यापासून शासकीय विश्रामगृहात बैठक सुरु झाली. येथे दिवसभर सोलापूर शहर व जिल्ह्यातील सर्व मराठा बांधवांची ते भेट घेत होते. जरांगे-पाटील यांना पाठिंबा देण्यासाठी सोलापूर शहर जिल्ह्यातील सामाजिक संघटना, राजकीय संघटना इतर कार्यकर्त्यांची मोठी रिघ लागल्याचे पाहायला मिळाले. यावेळी माऊली पवार, विनोद भोसले, राजन जाधव, अमोल शिंदे, चेतन चौधरी, रवी मोहीते, सोमनाथ राऊत, तुकाराम मस्के, दत्तात्रय मुळे, मनीषा नलावडे, निर्मला शेळवणे, सूर्यकांत पाटील, किरण पवार आदी मराठा बांधव, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मतदारयादी पुनरीक्षणावर संसदेत चर्चा होणार नाहीच

## प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे किरेन रिजिजूंनी केले स्पष्ट

**नवी दिल्ली, ६ ऑगस्ट**

बिहारमधील मतदार यादी पुनरीक्षणाचा मुद्दा न्यायालयात असल्यामुळे त्यावर नियमानुसार संसदेत चर्चा करता येणार नाही, असे सांसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी आज स्पष्ट केले. या मुद्यावरील गदारोळामुळे लोकसभेचे कामकाज आज दोनदा स्थगित केल्यानंतर तिसऱ्यांदा दिवसभरासाठी स्थगित करण्यता आले. बिहारमधील मतदार यादी पुनरीक्षणाच्या मुद्यावर चर्चा घडवावी या मागणीसाठी संसदेच्या दोन्ही सभागृहात विरोधक आक्रमक आहेत, यामुळे होणाऱ्या गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज वारंवार स्थगित करावे लागत आहे. या पार्श्व भूमीवर सरकारची भूमिका स्पष्ट करतांना किरेन रिजिजू आज लोकसभेत म्हणाले की, मतदार यादी पुनरीक्षणाच्या मुद्यावर सभागृहात चर्चा करता येणार नाही, कारण हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, आणि सांसदीय नियमानुसार न्यायालयात प्रलंबित असलेल्या कोणत्याही विषयावर सभागृहात चर्चा करता येत नाही. विरोधक उपस्थित करत असलेल्या कोणत्याही मुद्यावर चर्चा करायला सरकार तयार आहे, मात्र सभागृहात जे कामकाज होईल, ते संवैधानिक तरतुदीनुसार तसेच सांसदीय नियमानुसारच होईल, असे ते म्हणाले. याआधीही अनेकवेळा असे अनेक मुद्दे आले होते, पण त्यावर सभागृहात चर्चा झाली नव्हती.

### राज्यसभेत प्रचंड गदारोळ

नवी दिल्लीः बिहारमधील मतदार यादी पुनरीक्षणाच्या मुद्यावरुन झालेल्या गदारोळामुळे राज्यसभेचे कामकाज स्थगित करावे लागले. तत्पूर्वी गदारोळातच एक विधेयक सभागृहात पारित करण्यात आले. मतदार यादी पुनरीक्षणाच्या मुद्यावर सभागृहात चर्चा घडवावी या मागणीसाठी विरोधकांची घोषणाबाजी सुरु असतांना जलमार्ग वाहतूक राज्यमंत्री शांतनू ठाकूर यांनी जलमार्ग वाहतूक विधेयक सभागृहात सादर केले आणि तालिका उपसभापती भूवनेश्वर कालिता यांनी ते कोणत्याही चर्चेशिवाय पारित करुन घेतले. राज्यसभेत या पध्दतीने पारित झालेले हे दुसरे विधेयक आहे, याआधी मर्चंट विधेयक पारित करण्यात आले होते. राज्यसभेत आज विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे आणि तालिका उपसभापती यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. खडगे यांनी हरिवंश यांच्यावर पक्षपात करत असल्याचा आरोप केला.

## अग्रलेख...

# मानवी प्रवृत्तीला प्रकृतीचा तडाखा

भारतातील उत्तरेकडील उत्तराखंड हे राज्य 'देवभूमी' म्हणून ओळखले जाते. या भागातील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली हे गाव मंगळवार, ५ ऑगस्ट २०२५ रोजी ढगफुटीमुळे 'धराशायी' झाले. हिरव्यागार, निसर्गरम्य, जैवविविधतेने नटलेल्या आणि वेढलेल्या धराली या गावाजवळ उंच भागातून खीरगंगा नदी वाहते. ढगफुटीमुळे या नदीचे पात्र ओसंडून वाहू लागले. पाण्याच्या जबरदस्त वेगामुळे डोंगरकडे कोसळून पडले. या देवभूमीतील बरेच काही ते आपल्या सोबत घेऊन गेले. त्यात धरालीतील घरे, मंदिरे, उपाहारगृहे, पर्यटक निवास, पूल, रस्ते, वाहने, जनावरे आणि माणसे असे बरेच काही होत्याचे नव्हते झाले. यात मृतांचा सुरुवातीचा आकडा एकेरी असला तरी तो निश्चितपणे मोठा होईल असे असलेल्या लोकांच्या संख्येवरून दिसून येते. उंचावरून आलेले पाणी, दगड आणि चिखलाचे लोट यांनी धरालीतील स्थावर मालमत्तेस खूप सारे मातीत मिसळून टाकले. या भागातील एक लष्करी छावणीसुद्धा वाहून गेली. पर्यटकांच्या सोयीसाठी असलेले २५ ते ३० 'होम स्टे' किंवा हॉटेल्स या प्रकृती प्रकोपात वाहून गेल्याची माहिती आहे. दहा भारतीय लष्करी जवान बेपत्ता असल्याचेही सुरुवातीचे आकडे आहेत. केवळ साठ सेकंदांच्या त्या निसर्ग प्रकोपात जीव व वित्तहानी मोठ्या प्रमाणात झाल्याची, एका गावाचे रूपांतरच एका ढिगाऱ्यात झाल्याची मन सुन्न करणारी ही घटना आहे.

हिमालयाच्या कुशीतील उत्तराखंड अर्थात 'देवभूमी' गेल्या दोन दशकांमध्ये नैसर्गिक आपत्तींच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील बनली आहे. आल्हाददायक निसर्ग, अनेक तीर्थस्थळे, हिमशिखरांचे रमणीय सौंदर्य या सर्वांसोबतच, अनपेक्षित आणि विध्वंसक महापूर, ढगफुटीसारख्या घटनांनी या भागाला अलिकडे अधिकच तडाखे बसू लागले आहेत. अशा आपत्ती म्हणजे मानवी हव्यास तसेच बेपर्वा व हवामानातील अतिशय जटिल आंतरक्रियांचे संयुक्त परिणाम आहेत. या सर्व घटनांची शास्त्रीय मीमांसा, मानवी जबाबदारीचा मुद्दा आणि अशा घटनांतून आपल्याला मिळणारा धडा या सर्वांचा सखोल मागोवा सर्वांनीच घेत राहायला हवा. या घटना म्हणजे केवळ आकडेवारी नसते. हजारो लोकांचे जीवन क्षणात अंधकारमय करून टाकणाऱ्या या घटना असतात.

ढगफुटी म्हणजे एका छोट्याशा टापूत अतिशय अल्प काळात रेकॉर्डब्रेक असा पाऊस पडणे आणि त्याच्या परिणामी हिमकडा, डोंगरकडा यांचे कोसळणे. मुख्यत्वेकरून दुर्गम, पर्वतीय, अरुंद खोऱ्यांमध्ये अशा घटना घडतात. इथल्या तीव्र उतारांमुळे मान्सूनचे ढग सरळ त्या डोंगरावरील थंड हवेवर आदळतात आणि पटकन जबरदस्त स्वरूपात पडतात. त्याचा जोर इतरही घटकांना मिळतो आणि त्यातून नुकसान होते. ही असते ढगफुटी. अशा अनपेक्षित किंवा अप्रिय घटनांसाठी मानवी बेपर्वाई सर्वात आधी जबाबदार असते. अनियंत्रित व निसर्ग विरोधी बांधकामे, ज्यापैकी काहींना 'विकास' असेही म्हणतात, देखील निश्चितच जबाबदार असतात. मोठमोठी हॉटेल्स, लॉज, रस्ते, पूल, रिसॉर्ट्स, व्यावसायिक इमारती असे सारे भूगर्भशास्त्रीय परीक्षणाविना उभारली जातात. सर्वांना पैसा कमावायचा असतो. सर्वांना रोजगार मिळवायचा असतो. त्यात कोण कुठे आणि कसे बांधकाम करते आहे, हे पाहिलेच जात असेल आणि ते नियमात बसते की नाही, याची खातरजमा केलीच जात असेल याची काहीही शाश्वती नाही. पर्यटनाचा उद्योग भारतात वाढत चालला आहे. पर्यटकांची संख्या कित्येक पटींनी वाढली. अवैध खाणी व नदीखोऱ्यांचे शोषण, वाळू, खडी खणणाने नद्यांचे गाळ वाहून जाणे, मातीचे व दगडांचे अवैध उत्खनन, जंगलतोड आणि जैवविविधतेवर हल्ला, जंगलांवर अतिक्रमण, हे सारे प्रकार सत्यानाश करणारेच असतात. आपण सत्यानाश केला तर निसर्ग महाविनाश करणारच, हे आपल्याला कळले पाहिजे. आवश्यक विकासात मोठमोठे जलविद्युत प्रकल्प व मोठ्या इन्फ्रास्ट्रक्चरचे दडपण, नदीच्या नैसर्गिक प्रवाहातील अडथळे, पाईप, धरणे, साठवण टाक्या, बोगदे, खनिज आणि गौण खनिजाच्या प्रचंड उत्खननामुळे डोंगर दुभंगण्यापर्यंत प्रसंग आलेले पाहण्यात आहेत. या सर्व घटना हवामान, भूगर्भबदल आणि मानवी हस्तक्षेप या तीन प्रमुख घटकांशी नाते सांगतात. ढगफुटीसारख्या आपत्तींमुळे उत्तराखंड राज्याची चर्चा होते. इतरही अनेक राज्यांमध्ये अशीच स्थिती आहे. खरे तर अशा घटनांतून आपण भारतीयांनी पर्यावरणीय, भौगोलिक, सांस्कृतिक आणि आर्थिक धडे घ्यायला हवेत. निसर्गाच्या सहनशक्तीची परीक्षा घेणाऱ्यांना परीक्षा द्यावयास लागतील, हे लक्षात ठेवायला हवे. समाज, शासन- प्रशासन आणि वैयक्तिक जबाबदारीचे भान असायला हवे. मानवी हलगर्जीपणा व बेपर्वाईमुळे अशा घटनांचे गांभीर्य वाढत असते. दरवर्षी कोट्यवधी भाविक व पर्यटक हिमालयात जातात. पर्यटकांची वाहतूक, प्लॅस्टिक, प्रदूषण आणि स्थानिक संसाधनांवरचा वाढता ताण हे सारे घटक पर्यावरण असंतुलनास कारणीभूत ठरतात. केदारनाथमध्ये हेलिकॉप्टरच्या प्रतीक्षेत लोक मृत्युमुखी पडणे, चमोलीमध्ये कामगार पुरात अडकणे ही त्याची बोलकी उदाहरणे आहेत. ही समस्या अक्राळविक्राळ आहे. अशा घटनांनंतर तेच नैसर्गिक की मानवनिर्मित अशी चर्चा नेहमीच होत राहते. चर्चेवरच सारे थांबते आणि पुढचे पाठ, मागचे सपाट अशा पद्धतीने आपले रहाटगाडगे सुरू असते. अशा बहुतांश घटना सुरुवातीला नैसर्गिकच वाटत असल्या तरी त्यामध्ये मानवी हव्यासाचा मोठा वाटा असतो हे विसरून चालणार नाही. 'भूमी' या कधीही न वाढणाऱ्या संपत्तीचा भयंकर असा हव्यास आपल्याला देशभर, गावोगावी, ठिकठिकाणी आढळून येतो. थोडीशीही रिकामी जागा दिसली की ती कशी घशात घालता येईल, याचाच विचार करणारे 'भू-माफिया' मानसिकतेचे लोक गल्लोगल्ली, गावोगावी असतात. सामान्य लोक देखील गेटच्या बाहेर थोडी सरकारी जागा दिसत असेल तर गेट पुढे सरकवण्यात धन्यता मानतात. उत्तराखंडमध्ये तर सपाट जागाच मर्यादित आहे. तेथे बांधकामे अवघड स्थितीत व अवघड ठिकाणीच केली जातात. धनदांडगे उद्योजक, बांधकाम व्यवसायी, राजकारणी, तथाकथित समाजसेवी अशा मंडळींचे येथे फावते. धंदेवाले तर चिरीमिरी देऊन काहीही करून घेऊ शकतात. रिकामा भूखंड लाटण्यासाठी किंवा नियमबाह्य बांधकाम करण्यासाठी हे लोक 'काय वाट्टेल ते' करत असतात. या अशा प्रवृत्तींमुळे आणि त्यांना मोकळे रान देण्याच्या 'अर्थपूर्ण' प्रशासकीय मानसिकतेमुळे वेगवेगळ्या निसर्गरम्य प्रदेशांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अघटित होतच राहणार. आता तरी सुधारायला हवे.

प्रकृतीशी खेळ करणारी प्रवृत्ती निसर्ग खपवून घेत नाही हे एक नव्हे हजारो वेळा दिसले. सतत दिसले. माणसं मेली. वित्तहानी झाली. भारत हा सौंदर्याने नटलेला देश आहे. अवैध बांधकामे, नैसर्गिक व्यवस्थेचे अनावश्यक नुकसान हे सारे या सौंदर्याला बाधा आणणारे घटक आहेत. निसर्गाचे सौंदर्य त्याच्या मूळ स्वरूपातच टिकत असते. गरज असेल तेथे नियमानुसार कामे व्हायलाच हवीत. कुणीही आणि कुठेही-काहीही-कितीही बांधून टाकले तरी त्याला वैधता प्रदान करणाऱ्यांनी जनाची नाही तर मनाची तरी ठेवली पाहिजे. शेवटी हा देश त्यांचाही आहे. त्यांचीही मुले-बाळे उद्या पर्यटनाला जातील. उद्योग-व्यवसाय करतील. निसर्गच नसेल तर पर्यटन नसेल. रोजगार आणि अन्य व्यवसायही नसतील. पण, मानवी हव्यास आणि बेपर्वाई कमी होत नाही. परवाच सर्वोच्च न्यायालयाने सरकारी यंत्रणेचे कान उपटले. अशाच पद्धतीने अवैध कामांना वैधता प्रदान करणाऱ्यांचे पराक्रम तुम्ही करीत राहिलात तर एक दिवस हिमाचल प्रदेश दिसेनासा होईल, अशी टिप्पणीही सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात केली. सरकार व प्रशासनाकडून पर्यावरणाचे संतुलन बिघडविणाऱ्यांवर अंकुश लावला जायलाच हवा, हे सर्वोच्च न्यायालयाने सांगावे लागत असेल तर समाज, सरकार यांचे कुठेच लक्ष नाही, हेच सिद्ध होते. आताही वेळ गेलेली नाही. हिमाचल प्रदेश, उत्तराखंडसह अशा सर्व राज्यांमध्ये झालेली बांधकामे तपासली पाहिजेत आणि जी नियमांत बसत नसतील त्यांच्या विरुद्ध ठोस कारवाई केली गेली पाहिजे. अवैधतेचे नियमन करण्याचा हव्यास सोडला तरच प्रकृती टिकेल आणि ती टिकली तरच सारे टिकेल.

## तंत्रवेध

# हायड्रोजनवर चालणारी वाहने

**डॉ. दीपक शिकारपूर**

डिझेल, पेट्रोल, गॅससारख्या जैव-इंधनांच्या वाढत्या उपशामुळे आणि वापरामुळे पृथ्वीचे पर्यावरण धोक्यात आले आहे, येत आहे हे सर्वांना माहीतच आहे. चंगळवादी जीवनशैली बदलून मुळात खाजगी वाहनांचा वापर कमी करा, असे आवाहन सुरू होऊनही दोन दशके झाली; परंतु आपल्या सवयी बदलत नसल्याने वाहनांची विक्री वाढतेच आहे. त्यामुळे वाहनाच्या इंजिनच्याच स्वरूपात बदल करण्याबाबतचे संशोधन होऊन त्याला आलेले फळ म्हणजे इलेक्ट्रिक व्हेईकल्स म्हणजेच विजेवर (बॅटरीवर) चालणारी वाहने. गेल्या दशकात अशा वाहनांची संख्या जगभर वेगाने वाढली, परंतु त्यांच्याही काही मर्यादा आणि भविष्यात निर्माण होऊ शकणाऱ्या समस्या आता दिसू लागल्या आहेत.

पहिली बाब म्हणजे किंमत. पारंपरिक वाहनांच्या तुलनेत ई-वाहने दीडपट दुप्पट महाग आहेत. पर्यावरणाची कितीही काळजी असली, तरी ही जादा किंमत अनेकांना या वाहनांपासून दूर ठेवते आहे. दुसरा मुद्दा त्यांच्या 'रेंज'चा आहे. म्हणजेच एकदा बॅटरी चार्ज केल्यावर ई-वाहन कापू शकणारे अंतर. साधी ई-वाहने जेमतेम ७० ते ९० किमी जातात; मग ती दुचाकी असोत वा चारचाकी. नवी आधुनिक वाहने ३०० किलोमीटरपर्यंतही जाऊ शकतात. पण त्यांच्या किमती खूपच जास्त आहेत. म्हणजे गोल फिरून आपण पुन्हा मूळ समस्येकडेच येतो. शिवाय बॅटरी चार्ज होण्याची क्रिया वाहन चालत असताना होत असते (मग ते पारंपरिक असो वा विजेवर चालणारे). अनेक जणांचे आठवड्यातून किमान दोनदा असे २००-३०० किलोमीटर दूर जाणे होते. पण अनेकांचे असे येणे-जाणे कमी असते. त्यामुळे बॅटरी आपोआप चार्ज होत नाही. परिणामी बॅटरी चार्ज करण्यासाठी वेगळा वेळ द्यावा लागतो. चार्जिंग घरीही करता येते, परंतु त्यासाठी काही तास लागतात. बाहेर हायवेवर अद्याप चार्जिंग स्टेशन्सची संख्या पेट्रोल पंपांच्या मानाने अगदीच नगण्य आहे. त्यामुळे जगभरच्या अनेक वाहनचालकांवर सतत बॅटरी संपण्याची टांगती तलवार असते. बरे, ग्रामीण किंवा विरळ वस्तीच्या भागात चार्जिंगची सोडा, विजेच्या उपलब्धतेचीच हमी नसल्याने तूर्त तरी ई-वाहने शहरी भागांमध्येच अडकली आहेत.

डिझेलचा बराचसा वापर व्यापारी कारणांसाठी म्हणजे मालवाहतुकीसाठी केला जातो. त्यामुळे ट्रक्स विजेवर चालू शकले तर जैवइंधनांची बरीच बचत होईल. परंतु या रूपांतरणाचा खर्च खूप आहे. शिवाय रेंजची समस्या कायमच असल्याने मालवाहतूकदार या वाहनांसाठी फारसे उत्सुक नाहीत. विजेवरची वाहने वापरात आलेल्याला आता एक दशक झाले असून आता एक वेगळीच समस्या समोर येत आहे. या वाहनांमधील बॅटरी विशिष्ट प्रकारची असते. म्हणजे हमरस्त्यावरील बॅटरीच्या दुकानात मिळणारी नेहमीची बॅटरी यांना चालत नाही. यासाठीची वेगळी बॅटरी अत्यंत महाग तर आहेच; शिवाय तिचा पूर्णपणे पुनर्वापर करण्याचे म्हणजे ती रिसायकल करण्याचे मार्ग अद्याप दृष्टिपथात आलेले नाहीत. याचा अर्थ लक्षावधी इलेक्ट्रिक गाड्यांच्या तितक्याच निरुपयोगी बॅटऱ्यांच्या घातक कचऱ्याचे करायचे काय? पर्यावरणपूरक म्हणून विजेवरील वाहन वापरायचे आणि त्याची निरुपयोगी बॅटरी मात्र पर्यावरणाचे नुकसान करणार, अशी ही विचित्र परिस्थिती आहे.

...तर हे झाले विजेवरील वाहनांचे तोटे आणि मर्यादा. गेल्या दशकापासून मात्र हायड्रोजन वायूवर चालणाऱ्या वाहनांवरील संशोधनाला गती मिळाली आहे. अद्याप यांचा इलेक्ट्रिक कार्सइतका बोलबाला नसला, तरी बीएमडब्ल्यू आणि स्टोलांटिस या मोठ्या कंपन्यांनी याबाबतच्या संशोधन आणि विकास कार्यक्रमांमध्ये मोठी गुंतवणूक केल्याने या क्षेत्राकडे अनेकांच्या नजरा वळल्या आहेत. कमीत कमी धूर सोडून पर्यावरणाची हानी शक्य तितकी टाळणारी इंजिने (आणि इंधनेही) शोधण्याचे, बनवण्याचे व वापरण्याचे बंधन आता अनेक देशांनी आपापल्या वाहन उत्पादकांवर घातले आहे. त्यामुळे वाहन उद्योगाच्या पारंपरिक चित्रात आणि एकंदर रचनेमध्ये मोठे बदल होऊ घातले आहेत. हायड्रोजन कार्स हे त्यामधीलच एक महत्त्वाचे पाऊल आहे. सध्या जागतिक स्तरावर विविध कारणांमुळे आर्थिक मंदीचे सावट आहे. महागाई मात्र सर्वत्र वेगाने वाढते आहे. यामध्ये सामान्य नागरिकांना त्रास देणारा घटक म्हणजे इंधनाचे दर. अशा परिस्थितीत हायड्रोजनसारख्या पर्यायी इंधनाकडे वापरकर्त्यांचे लक्ष वळणे स्वाभाविक आहे. विजेवरील वाहनांच्या निर्मितीमागे खंबीरपणे उभ्या असलेल्या फोक्सवॅगनसारख्या कंपनीनेही एकदा टाकी फुल केल्यावर गाडीला तब्बल २००० किलोमीटर नेऊ शकेल, असा 'फ्युएल सेल' बनवण्याच्या दिशेने संशोधन आरंभिले आहे. बीएमडब्ल्यूचे सीईओ ऑलिव्हर झिप्स यांनी '२०३० च्या आत आपली हायड्रोजन वाहने अमेरिकेत विक्रीला उपलब्ध होतील' असे सांगितले आहे. युरोपीय महासंघाने यासंदर्भात दोन महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. हायड्रोजनवर चालणाऱ्या ट्रक्सना उत्तेजन देणे आणि हायड्रोजन भरण्याची सोय दर १०० किलोमीटरवर करून देणे. वाहनांची संख्या (पर्यायाने प्रदूषण) भरपूर असलेल्या चीनमध्येही २०३० पर्यंत सुमारे एक लाख (फ्युएल सेल इलेक्ट्रिक व्हेईकल) रस्त्यांवर आणण्याची योजना आहे. कार्बन-उत्सर्जनाचे प्रमाण शून्यावर आणायचे असेल (नेट झीरो २ पॉलिसी) तर हायड्रोजनपासून सुरुवात करावी लागेल, असे बहुतेक वाहनतज्ज्ञांचे मत आहे. न्यू ऑटोमोटिव्ह ॲण्ड मोबिलिटी एक्स्प्लोरेशनच्या सांगण्यानुसार त्यांनी फ्युएल सेल तंत्रज्ञानावरील वाहनांच्या रिफ्युएलिंग म्हणजेच पुनर्भरणाचा प्रश्न वेगळ्या प्रकारे सोडविला आहे. त्यांनी आपल्या गाडीला हायड्रोजनच्या दोन टाक्या दिल्या आहेत त्यापैकी एक 'फिक्स्ड' आहे (इतर वाहनांप्रमाणे) परंतु दुसरीमध्ये हायड्रोजनने भरलेल्या, बाहेर काढण्याजोग्या सहा कॅप्सूल्स बसवल्या आहेत. या कॅप्सूल्स विविध दुकानांमार्फत सुट्या विकत मिळण्याची सोय कंपनी करत आहे. म्हणजेच ही टाकी भरण्यासाठी 'हायड्रोजन पंपा'वर थांबण्याची गरज नाही. दोन्ही टाक्या भरलेल्या असल्या की, ही गाडी साडेसातशे किलोमीटर अंतर कापू शकेल. ही कार २०२६ नंतर बाजारात येणार आहे.

'केपजेमिनी' या सल्ला सेवा देणाऱ्या प्रसिद्ध कंपनीच्या वाहन विभागाचे मुख्य अलेक्झांडर ऑदिन यांचा विश्वास आहे की, फ्युएल सेलचे तंत्र व्यापारी वाहने आणि मोठ्या गाड्यांप्रमाणेच दैनंदिन वापराच्या छोट्या गाड्यांमध्येही यशस्वीरीत्या वापरता येईल. भावी वाहन उद्योगात अशा गाड्यांचा मोठा वाटा असेल असे त्यांना वाटते. ही हायड्रोजन कार कशी चालते, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. इथे हायड्रोजन पेट्रोलप्रमाणे थेट जाळला जात नाही तर त्यातील रासायनिक ऊर्जेचे रूपांतर विजेमध्ये केले जाते. या विजेवर गाडीची चाके फिरवली जातात. मुख्य म्हणजे या वाहनाच्या एक्झॉस्ट पाईपमधून धूर नाही तर चक्क पाणी बाहेर येते; परिणामी प्रदूषण शून्य. फ्युएल सेलची रचना बॅटरीसारखीच असते. एका बाजूने हायड्रोजन आत सोडला जातो. तो तेथील कारक रसायनाच्या (कॅटेलिस्ट) संपर्कात येतो आणि हायड्रोजनच्या अणूंचे इलेक्ट्रॉन आणि प्रोटॉन या कणांमध्ये विभाजन होते. हे इलेक्ट्रॉन वाहनामधील उच्च वीजदाबाच्या रचनेमधून जाऊन वाहनाच्या बॅटरीला किंवा थेट वाहनाला ऊर्जा पुरवतात. २०२२ च्या मध्यावर टोयोटाने आपली 'मिराइ' ही भारतातील पहिली हायड्रोजन कार सादर केली. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी संसद भवनापर्यंतचा प्रवास या गाडीमधून केला. या सर्व नवसंशोधनांकडे पाहताना म्हणता येईल की, कोणतेही एक तंत्रज्ञान श्रेष्ठ मानून त्याचाच वापर करण्याचा आग्रह धरण्यापेक्षा विविध सर्वोत्तम तंत्रांचे एकत्रीकरण करून पर्यावरण रक्षणाचा अंतिम हेतू साध्य करणे महत्त्वाचे आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# 'लव्ह जिहाद' सामाजिक समस्या

प्रेम ही निर्मळ भावना आहे. जात, धर्म बघून प्रेम होत नाही. ज्याने जसा चष्मा घातला असेल तसेच त्याला दिसते. २१ व्या शतकात एकीकडे जग जवळ असताना दुसरीकडे काही लोक धर्मासारख्या बाबी कालबाह्य असल्याच्या चर्चा रंगवतात. 'लव्ह जिहाद' ही बुरसटलेले विचार असलेल्यांच्या डोक्यातील काल्पनिक बाब आहे. त्यातही हिंदुत्ववादी संघटनांनी मोठा केलेला हा बागुलबुवा असल्याचे मत अनेकदा तथाकथित बुद्धिजीवी म्हणविणाऱ्यांकडून जोरकसपणे व्यक्त होते. मुळात 'लव्ह जिहाद' आहे हे पहिल्यांदा सांगणाऱ्यांपैकी कुठल्याही हिंदुत्ववादी संघटना नव्हत्या तर काही मुस्लिम युवक धर्मांतरणाच्या उद्देशाने हिंदू आणि ख्रिश्चन युवतींना प्रेमाच्या भूलथापा देऊन फसवीत आहेत. त्यांचे धर्मांतरण करीत आहे आणि याच उद्देशाने ते काम करीत आहेत, असा दावा २००९ साली लंडनचे पोलिस आयुक्त इयान ब्लेअर यांनी केला. याच दरम्यान केरळ येथील पोलिस महानिदेशक जेकब पुन्नोज यांनी एका अहवालात गैरमुस्लिम मुलींना धर्मांतरणाच्या हेतूने फसविण्यासाठी काही संघटना काम करीत असल्याचे निरीक्षण नोंदविले होते. त्याच वेळी कम्युनिस्ट पक्षाचे व्ही. एस. अच्युतानंद यांनी 'लव्ह जिहाद'चा मुद्दा उपस्थित केला होता. यातील काही प्रकरणे न्यायप्रविष्ट झाल्यानंतर केरळ उच्च न्यायालयानेदेखील त्यावेळी यात तथ्य असल्याचे म्हटले होते.



ओळख लपवून, भौतिक सुखाचे आमिष दाखवून काही प्रकरणांमध्ये तर अमली पदार्थांद्वारे सुनियोजित पद्धतीने कोवळ्या वयातील मुलींची फसवणूक करून धर्मांतरणाचा डाव 'लव्ह जिहाद'च्या आड सुरू असल्याचे समोर आले आहे. त्यातच आता छांगुर बाबा अर्थात जलालुद्दीन याला अटक करण्यात आली. त्याने तब्बल १५०० पेक्षा अधिक हिंदू मुलींचे 'लव्ह जिहाद'च्या माध्यमातून धर्मांतरण केल्याची चर्चा आहे. एकेकाळी दारिद्र्यात असलेल्या जलालुद्दीनकडे तब्बल ३५० कोटींची संपत्ती असून त्याच्या चौकशीत अनेक आश्चर्यकारक बाबी समोर आल्यात. या प्रकरणानंतर तर 'लव्ह जिहाद' हा सुनियोजित कट असल्याचेच स्पष्ट होते. 'लव्ह जिहाद' केवळ धर्मांतरणासाठीचाच डाव नव्हे, तर देशाविरोधात असलेले मोठे षडयंत्र आहे. या षडयंत्रातील धर्मांतरणाचा उद्देश जेव्हा फसतो त्यावेळी यात अडकलेल्या मुलीचा जीव घेण्यास देखील हे नराधम मागेपुढे पाहत नाही. यावेळी धर्म ही कालबाह्य बाब असून प्रेम धर्म पाहून होत नाही, असा युक्तिवाद करणाऱ्या तथाकथित बुद्धिजीवी म्हणविणाऱ्यांची मात्र दातखीळ बसलेली असते. महाराष्ट्राच्या लगत असलेल्या मध्यप्रदेश येथे नुकत्याच घडलेल्या घटनेमुळे याबाबतची चर्चा पुन्हा होते आहे. मध्यप्रदेशातील नवारा या भागात राहणाऱ्या ३५ वर्षीय भाग्यश्री हिने धर्मांतरण आणि लग्नाला नकार दिला म्हणून शेख रईस याने तिचा गळा कापून जीव जाईपर्यंत तिच्यावर चाकूने वार केले. त्यापूर्वी तो तिला वारंवार धर्मांतरण कर, लग्नाला होकार दे यासाठी दबाव आणत होता. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हे दाखल करून रईसला अटक केली आहे. सहज मिळत नसेल तर ओरबाडण्याची वृत्ती असणाऱ्यांकडून दुसरी अपेक्षा तरी काय करावी. ही समस्या केवळ मोठ्या शहरांमध्ये आहे असे नाही तर हे षडयंत्र गावखेड्यापासून तालुका-जिल्ह्यापर्यंत पोहोचले आहे.

मानवी वेषात फिरणारे लांडगे सावजाच्या शोधात असतात. शिक्षणाच्या निमित्ताने कुटुंबापासून लांब राहणाऱ्या कोवळ्या वयातील मुली हे जणू आपलं भक्ष्य आहे, अशा आविर्भावात जसा शक्य असेल तसा लचका तोडण्यासाठी तयार असतात. मध्यंतरी अकोल्यात ऑटोने आपल्या रूमवर जाण्यासाठी बसस्थानकावरून निघालेल्या मुलीशी अभद्र व्यवहार ऑटोचालक शांतिदूताने केला. मुलीने समयसूचकता दाखवून आरडाओरडा करीत त्याच्यापासून सुटका करवून घेतली म्हणून नशिबाने ती वाचली. दुसऱ्या प्रकरणात भावनिक फसवणूक करून अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याचे प्रकरण ताजेच आहे. खरं म्हणजे 'लव्ह जिहाद'ने हिंदू संस्कृती, हिंदू संस्कार यासह राष्ट्रीय सुरक्षेला आव्हान दिले असल्याची वस्तुस्थिती असताना तथाकथित बुद्धिजीवी मात्र तर्कावर आधारित केवळ युक्तिवाद करतात. जोपर्यंत समाजातील सर्व घटक ही समस्या असल्याचे स्वीकारणार नाहीत, जोवर कुटुंबातील ज्येष्ठांचा मुलांशी संवाद नियमित होणार नाही. कुटुंबातील धार्मिक रूढी, परंपरांची जपणूक होणार नाही तोपर्यंत 'लव्ह जिहाद'च्या आड हिंस्र लांडगे लचके तोडतच राहतील.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# एका वादळी युगाचा अंत

**श्यामकांत जहागीरदार**

झारखंडचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री आणि झारखंड मुक्ती मोर्चाचे सर्वेसर्वा शिबू सोरेन मंगळवारी अनंतात विलीन झाले. सोमवारी सोरेन यांचे राजधानी दिल्लीतील एका रुग्णालयात निधन झाले. झारखंडच्या रामगड जिल्ह्यातील नेमरा हे त्यांचे मूळ गाव. या गावातच त्यांच्या पार्थिवावर अन्त्यसंकार करण्यात आला. आदिवासींच्या हक्कासाठी लढणाऱ्या त्यांच्या वडिलांची, सोबरन मांझी, यांची गावातील सावकारांकडून हत्या झाली होती. आदिवासींना न्याय मिळवून देण्याची आपल्या वडिलांची लढाई शिबू सोरेन यांनी पुढे चालू ठेवली. १९६०-७० च्या दशकात शिबू सोरेन यांनी धानकटाई आंदोलन सुरू केले. आदिवासींना न्याय मिळवून देण्यासाठी शिबू सोरेन आणि त्यांचे सहकारी जमीनदार आणि सावकारांच्या शेतात घुसून धानकटाई करायचे. येथूनच 'आदिवासींचे नायक' अशी त्यांची प्रतिमा तयार झाली. जनसामान्यांशी आपली नाळ जोडून ठेवण्यासाठी शिबू सोरेन यांनी आपल्या सहकाऱ्यांना मुष्टी भिक्षाटन अभियान राबवायला सांगितले होते. म्हणजे प्रत्येक आदिवासी माणसाच्या घरात जाऊन एक मूठभर धान्य आणि एक रुपया मागायचा.

शिबू सोरेन यांना झारखंडची जनता 'दिशोम गुरू' म्हणून संबोधित होती. दिशोम गुरू हे त्यांचे टोपणनाव नव्हते, तर जनतेने त्यांना प्रेमाने दिलेली पदवी होती. राज्यातील गोरगरीब जनतेचे दु:ख मी फक्त समजून घेतले नाही तर त्यांची लढाई आपली लढाई म्हणून लढायला घेतली, दिशोम म्हणजे समाज आणि समाजाला दिशा दाखवणारा म्हणून लोक मला दिशोम गुरू म्हणायला लागले, असे शिबू सोरेन सांगत. शिबू सोरेन यांचे निधन झाल्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे रुग्णालयात जाऊन अन्त्यदर्शन घेतले. यावरून त्यांचे राजकीय महत्त्व लक्षात येते. शिबू सोरेन आदिवासी समाजातील सर्वमान्य नेते होते. झारखंड राज्याची निर्मिती ही त्यांच्याच संघर्षाचे आणि आंदोलनाचे फळ होते. सोरेन यांची राजकीर्द लक्षणीय अशी होती. पहिल्या लोकसभा निवडणुकीत पराभव पत्करावा लागलेल्या शिबू सोरेन यांनी नंतर सात वेळा लोकसभेत दुमका मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. तीनदा ते राज्यसभेवर होते. आमदार म्हणून त्यांनी तीन वेळा झारखंडचे मुख्यमंत्रिपद भूषवले तर तीन वेळा डॉ. मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळात ते कोळसा आणि खाण मंत्री होते. पण मुख्यमंत्री असो की केंद्रीय मंत्री कोणत्या ना कोणत्या कारणाने प्रत्येक वेळी शिबू सोरेन यांची कारकीर्द वादग्रस्त ठरली. त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे तसेच गुन्हेगारी स्वरूपाचे अनेक आरोप झालेत. मात्र, प्रत्येक वेळी ते या आरोपातून सहीसलामत बाहेरही पडले.

शिबू सोरेन एका अर्थाने दुर्दैवी म्हणायला हवे. तीनदा मुख्यमंत्री असले, तरी त्यांना एकदाही सलग वर्षभर मुख्यमंत्रिपद भूषवता आले नाही. हीच बाब केंद्रीय मंत्रिपदाची. तीन वेळा केंद्रीय मंत्रिपद भूषवणाऱ्या सोरेन यांना एकदाही सलग वर्षभर मंत्रिपदावर राहता आले नाही. गंमत म्हणजे सोरेन आधी केंद्रात मंत्री झाले आणि नंतर झारखंडचे मुख्यमंत्री. बाबुलाल मरांडी आणि अर्जुन मुंडा यांच्यानंतर झारखंडचे तिसरे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली. पहिल्यांदा ते २३ मे २००४ ते २४ जुलै २००४ या काळात डॉ. मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळात कोळसा आणि खाण मंत्री होते. मात्र, ३० वर्ष जुन्या एका प्रकरणात अटक वॉरंट जारी झाल्यामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला. चिरुडिह येथे १९७५ मध्ये झालेल्या आदिवासी आणि मुसलमान यांच्यातील संघर्षात १० जणांचा बळी गेला; यात शिबू सोरेन एक आरोपी होते. केंद्रीय मंत्री असतानाही सोरेन यांना अटक करण्यासाठी झारखंड पोलिस दिल्लीत आले होते. शिबू सोरेन यांच्या नावाने अटक वॉरंट निघाल्यानंतर ते भूमिगत झाले. नंतर राजीनामा देत ते पोलिसांना शरण आले. महिनाभर तुरुंगात राहिल्यानंतर त्यांची जामिनावर सुटका झाली. जामिनावर सुटल्यानंतर काँग्रेस आणि झामुमो यांच्यातील राजकीय तडजोडीतून पुन्हा त्यांचा कोळसा आणि खाण मंत्री म्हणूनच केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला.

२००५ मध्ये झारखंड विधानसभेच्या निवडणुकीत कोणत्याच पक्षाला बहुमत मिळाले नाही. झामुमो आणि काँग्रेस आघाडीचे नेते म्हणून राज्यपालांनी सोरेन यांना सरकार स्थापण्यासाठी आमंत्रित केले. मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतलेल्या शिबू सोरेन यांना विधानसभेत बहुमत सिद्ध करता आले नाही. त्यामुळे दहा दिवसांतच त्यांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. २००८ मध्ये भाजपाच्या पाठिंब्याने सोरेन दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले, पण हे सरकारही फार दिवस टिकू शकले नाही. मतभेद झाल्यानंतर भाजपाने सोरेन सरकारचा पाठिंबा काढला, त्यामुळे सरकार कोसळले. यावेळी ४ महिने २२ दिवस ते मुख्यमंत्री होते. तिसऱ्यांदा ते ३० डिसेंबर २००९ ते ३१ मे २०१० असे पाच महिने मुख्यमंत्री होते. गंमत म्हणजे यावेळीही सोरेन यांनी भाजपाच्या पाठिंब्याने सरकार स्थापन केले. पण राज्यसभा निवडणुकीच्या मुद्यावरून मतभेद झाल्यामुळे भाजपाने सोरेन सरकारचा पाठिंबा काढला आणि त्यांचे सरकार कोसळले. म्हणजे मुख्यमंत्रिपदाचे तीन कालखंड पकडून वर्षभरही मुख्यमंत्री नव्हते.

जानेवारी २००६ मध्ये शिबू सोरेन यांचा तिसऱ्यांदा डॉ. मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळात समावेश झाला. मात्र नोव्हेंबर २००६ मध्ये त्यांना पुन्हा मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. यावेळी आपले खाजगी सचिव शशिनाथ झा यांच्या अपहरणाचा तसेच हत्येचा आरोप सोरेन यांच्यावर लागला. १९९३ मध्ये पी. व्ही. नरसिंहराव सरकारविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आला होता. या प्रकरणात सरकारच्या बाजूने मतदान करण्यासाठी शिबू सोरेन आणि झामुमोच्या खासदारांनी लाच घेतल्याचा आरोप झाला. शशिनाथ झा या प्रकरणाचे साक्षीदार असल्यामुळे सोरेन यांनी त्यांची हत्या घडवून आणली, असा आरोप होता. २३ ऑगस्ट २००७ ला दिल्ली उच्च न्यायालयाने शिबू सोरेन यांना या प्रकरणातून मुक्त केले. नंतर सर्वोच्च न्यायालयानेही सोरेन यांना दोषमुक्त करण्याचा दिल्ली उच्च न्यायालयाचा निकाल कायम ठेवला. कौटुंबिक आघाडीवरही शिबू सोरेन यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. त्यांना दुर्गा, हेमंत आणि वसंत अशी तीन मुलं आणि अंजनी ही मुलगी. सुरुवातीला मोठा मुलगा दुर्गा सोरेन यांच्याकडे शिबू सोरेन यांचे राजकीय वारस म्हणून पाहिले जात होते. झामुमोचे महासचिव असलेले दुर्गा दोनदा आमदार होते. मात्र, २००९ मध्ये त्यांचे आकस्मिक निधन झाले. सीता सोरेन यांनी आपल्या पतीचा राजकीय वारसा चालवण्याचा प्रयत्न केला. झामुमोच्या महासचिवपदासोबत त्या तीनदा आमदारही झाल्या. मात्र कौटुंबिक आणि राजकीय मतभेद वाढल्यानंतर त्यांनी झामुमोचा राजीनामा देत भाजपात प्रवेश केला. शिबू सोरेन यांच्या निधनानंतर झामुमोतील एका वादळी युगाचा अंत झाला.

९८८१७१७८१७

### रस्त्यावरील भाजी बाजार आणि प्रचंड कचरा

नागपूर येथील लंडन स्ट्रीट म्हणजे ऑरेंज सिटी रोड, जयप्रकाश मेट्रो स्टेशनकडून खामलाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर शनिवारी भाजी बाजार भरतो. चांगली सुविधा आहे. परंतु हे भाजीवाले आणि ग्राहक नागपूरच्या स्वच्छतेची ऐसीतैसी करत आहेत आणि वाहतुकीला प्रचंड त्रास होतो आहे. खरे तर भाजीवाल्यांना फूटपाथ आणि त्यामागील भरपूर जागा आहे तिथे त्यांची दुकाने शनिवारी तेथेच लावावी हे अपेक्षित आहे. परंतु आता काही भाजीवाले आणि मुख्यत्वे फळवाले भर रस्त्यावर दुकान थाटतात. त्यांच्या समोर ग्राहक आपली गाडी पार्क करून खरेदी करतो. पूर्ण रस्ता ही मंडळी व्यापतात. फळ कापले की आणि भाजी निवडली की तो कचरा तेथेच फेकला जातो. ग्राहक अथवा विक्रेता कोणालाही त्यात गैर वाटत नाही हे दुर्दैव.

प्रशासन आणि पोलिस यांनी एकदातरी इथे फेरी मारावी आणि जे रस्त्यावर अतिक्रमण करतात त्यांना समज द्यावी. तसेच कचरा फेकणाऱ्याला शिक्षा व्हायलाच हवी. कारण रविवार सकाळी या भागात प्रचंड घाण पसरली असते आणि दुर्गंधी येते. स्वच्छ नागपूर म्हणणाऱ्या महापालिका प्रशासनाने येथे यावे आणि आपल्या स्वच्छतेचा आरसा आपणच बघावा. अतिक्रमण आणि अस्वच्छता यावर लागलीच उपाय झाला पाहिजे. बाजाराला विरोध नाही. पण जागरूक व जबाबदार नागरिक म्हणून आम्ही राहायला हवे की नाही? तसेच पोलिस व महापालिका प्रशासन यांची याबाबत काही जबाबदारी आहे की नाही?

**राजेंद्र बेनोडेकर**/८४२२०९९९२५

●● ●●

### युवा खेळाडूंची जबरदस्त कामगिरी

इंग्लंड विरुद्धच्या शेवटच्या कसोटीच्या शेवटच्या दिवशी भारतीय गोलंदाजांनी अविश्वसनीय कामगिरी करत इंग्लंडचे चार फलंदाज बाद करून कसोटी जिंकली. ही कसोटी जिंकून भारताने तेंडुलकर-ॲंडरसन कसोटी मालिका बरोबरीत सोडवली. भारतीय संघाची ही कामगिरी जितकी कौतुकास्पद आहे तितकीच ती अभिमानास्पद आहे. मालिकेच्या सुरुवातीला इंग्लंडकडून भारताचा दारुण पराभव होईल असा अंदाज जाणकारांनी वर्तवला होता. मात्र भारताच्या युवा खेळाडूंनी जबरदस्त कामगिरी करून जाणकारांचा हा अंदाज फोल ठरवला.

भारताच्या युवा खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर नेत्रदीपक कामगिरी करून इंग्लंडला नामोहरम केले. शुभमन गिल या भारताच्या युवा खेळाडूने संपूर्ण मालिकेत कल्पक नेतृत्व करून आपल्यातील गुण दाखवून दिले. शिवाय त्याने उत्कृष्ट फलंदाजी करून विक्रमी धावा काढल्या. ही मालिका जरी बरोबरीत सुटली असली तरी एकप्रकारे हा आपला विजयच आहे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

●● ●●

## वाचक पत्रे

### ७ ऑगस्ट : शाश्वत शेती दिन

महाराष्ट्र शासनाच्या २९ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार महान कृषी-वनस्पती शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. मनकोम्ब सांबशिवम (एम. एस.) स्वामीनाथन यांचा जन्मदिवस राज्यात शाश्वत शेती दिन म्हणून साजरा केला जाणार आहे. शाश्वत शेती म्हणजे पर्यावरणावर कमी परिणाम आणि नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करणारी शेती. तसेच भविष्यातील पिढ्यांसाठी अन्न आणि इतर संसाधने उपलब्ध राहतील याची काळजी घेऊन सध्याच्या पिढीच्या गरजा पूर्ण करणारी शेती. तामिळनाडूतील कुंभकनम येथे ७ ऑगस्ट १९२५ ला जन्मलेले डॉ. स्वामीनाथन यांनी दुष्काळाच्या झळा अनुभवल्या होत्या. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी वैद्यकीय शिक्षणाची कास सोडून कृषी विज्ञान शिक्षण घेण्याचे ठरविले होते. त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्रात प्रसिद्ध शास्त्रज्ञांसोबत काम करून उच्च उत्पादन क्षमता असलेले गहू, तांदूळ आणि अन्य वाण विकसित केले. यामुळे देश अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण आणि आर्थिकदृष्ट्या मजबूत होण्यास मदत झाली. प्रयोगशाळेतील कृषी संशोधन हे वेळेत शेती - शेतकऱ्यांपर्यंत पोहचले पाहिजे अशी त्यांची नेहमी भावना असायची. आजसुद्धा या गोष्टीची अपेक्षा आहेच. देश त्यांना हरित क्रांतीचे प्रणेते म्हणून संबोधतो. कृषी क्षेत्रातील अनन्यसाधारण योगदानाला अभिवादन म्हणून त्यांच्या जन्मशताब्दी जयंतीच्या औचित्याने दरवर्षी ७ ऑगस्ट हा दिवस आपण शाश्वत शेती दिन म्हणून साजरा करतो. या निमित्ताने राज्यातील सर्व कृषी विद्यापीठामध्ये डॉ. एम. एस. स्वामीनाथन जैव-आनंद केंद्र स्थापन करण्यात येईल. एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशन सुद्धा आधुनिक कृषी विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे फायदे शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्नरत आहे. आजच्या दिवशी एक बाब प्रकर्षाने जाणवते ती अशी की डॉ. स्वामीनाथन हे राष्ट्रीय शेतकरी आयोगाचे (२००४) अध्यक्ष असताना त्यांनी कृषी विकासासाठी अनेक शिफारशी केल्या होत्या. त्यापैकी पिकांना किमान आधारभूत किंमत ही उत्पादन खर्चाच्या ५० टक्के अधिक असावी या शिफारशीच्या अंमलबजावणीची आजही अपेक्षा आहे. ज्या वेळी ही शिफारस लागू होईल तो दिवस शेतीकरिता, भावी शेतकऱ्यांकारिता सुवर्ण दिन असेल आणि तीच शासनातर्फे डॉ. स्वामीनाथन यांना श्रद्धांजली राहील.

**प्रा. विलास डोईफोडे**/९११२८५७२९९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### मनोज जरांगे-पाटलांचे मराठा बांधवांनी केले स्वागत

**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातुन आरक्षण मिळावे या मागणीसाठी २९ ऑगस्ट २०२५ च्या मुंबईच्या आंदोलनामध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सोलापूर शहर व जिल्ह्यातील मराठा समाज बांधवांसोबत चर्चा करण्यासाठी, त्यासाठी लढा देण्याकरिता, दिशा ठरविण्यासाठी, संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील मंगळवार दिनांक ०५ ऑगस्ट रोजी रात्री सोलापूर दौऱ्यावर आले असता शासकीय विश्राम गृह सोलापूर येथे माजी नगरसेवक विनोद भोसले मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा स्वागत करण्यात आले. यावेळी सकल मराठा समाजाचे माऊली पवार, राजन जाधव, विनोद भोसले, रवी मोहिते, सचिन तीकटे, अमोल भोसले, सचिन गुंड, रॉकी बंगाळे, तिरुपती परकीपंडला, राज सलगर, राजासाब शेख, दिनेश जाधव, पिंटू माने, संजय गायकवाड, शाहू सलगर, बसवराज कोळी, फैयाज शेख, सिराज मुल्ला, राजू निलगंटी, सौरभ साळुंखे उपस्थित होते.

# प्रधानमंत्री आवासचे अनुदान लाभार्थ्यांना जमा

### पहिल्या टप्प्यात ११७ जणांना अनुदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

प्रधानमंत्री आवास योजना २.० ची अंमलबजावणी सोलापूर महापालिका हद्दीत सुरू झाली. यामध्येच स्वतःच्या जागेवर बांधकाम करण्याच्या घटकाअंतर्गत १६७ जणांनी महापालिकेकडे अर्ज सादर केला असून यापैकी ३१ जणांना मंजुरी देऊन शासनाने अनुदान त्यांच्या खात्यावर जमा केले आहे. उर्वरित ११ जणांची मंजुरीची प्रक्रियाही सुरू असून पुढील आठवड्यात त्यांच्या अनुदानाचीही प्रक्रिया पूर्ण होणार आहे.

प्रधानमंत्री आवास योजना २.० ची अंमलबजावणी सोलापूर महापालिका हद्दीत सुरू झाली. प्रधानमंत्री आवास योजना २.० मधील घटक २ मध्ये परवडणारी घरे अंतर्गत २२१५ अर्ज शहर हद्दीतून प्राप्त झाले आहेत. त्यांचा प्रकल्प अहवाल राज्य शासनाकडे सादर करण्याची प्रक्रिया प्रकल्प संचालक आणि महापालिका यांच्या विद्यमाने सुरू आहे. यापूर्वी प्रधानमंत्री आवास योजना पहिल्या टप्प्यात २६७ जणांनी महापालिकेकडे लाभासाठी अर्ज दाखल केले होते. यामधील ११७ जणांना यापूर्वी त्यांचे अनुदान त्यांच्या खात्यात जमा झाले आहेत. उर्वरित १५० लाभार्थ्यांना अनुदान व्यतिरिक्त करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यामध्ये ज्या लाभार्थ्यांचे घर बांधून तयार आहे अशांचे केंद्र शासनाचे उर्वरित निधी पुढील आठवड्यात त्यांच्या खात्यावर जमा होणार आहेत परंतु तत्पूर्वी त्यांनी आपली घरे तयार केली आहेत पण पूर्णत्वाचा दाखला अद्याप महापालिकेकडे सादर केला नाही अशांनी तात्काळ महापालिकेकडे दाखला सादर करून अनुदान मिळवून घ्यावे. शहरात ज्यांच्याकडे जागा आहे अशांनी योजनेचा लाभ घेऊन अनुदान मिळवण्यासाठी आणि ज्यांच्याकडे घर- जागा नाही, अशांनी महापालिकेकडे अर्ज सादर करून याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. महापालिकेच्या या विभागाकडून शहरातील नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार विविध ठिकाणी कार्यशाळा घेण्यात येत आहेत. यामधील पहिली कार्यशाळा ही माशाळ वस्ती व बहुरूपी नगर येथे घेण्यात आली. ज्या कुटुंबांच्या नावे पक्के घर नाहीत अशा कुटुंबासाठी योजनेमध्ये लाभ देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. १०० पेक्षा जास्त कुटुंबांना योजनेचा लाभ देण्याचा प्रयत्न असून त्यापैकी ३० ते ३५ लाभार्थ्यांनी आपला प्राथमिक माहितीचा अर्ज सादर केला आहे.

#### योजनेच्या यशस्वीतेसाठी महापालिकेची ही टीम आहे प्रयत्नशील

सोलापूर शहरात या योजनेसाठी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्या मार्गदर्शनाखाली नगर अभियंता सारिका अकुलवार, सहाय्यक अभियंता प्रकाश दिवाणजी, पंतप्रधान आवास योजना शहर तांत्रिक कक्ष प्रमुख अधिकारी नागनाथ पदमगोंडे, अधिकारी सिद्धाराम मेंडगुदळे, प्रशांत गुंड आणि पूजा भूतनाळे हे प्रयत्नशील आहेत.

# समता सैनिक दल जीओसीपदी सुमित्रा जाधव

### महासचिवपदी अनिल जगझाप यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**



समता सैनिक दल शहर जिल्हा सोलापूरची बैठक समता सैनिक दलाचे जीओसी अंबादास कदम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या सभेत समता सैनिक दलाच्या जी ओ सी (जनरल कमांडिंग ऑफिसर ) म्हणून सुमित्रा केरू जाधव यांची निवड सर्वानुमते करण्यात आली तर महासचिवपदी अनिल जगताप यांची निवड करण्यात आली.अन्य पदाधिकारी असे : सहसचिव- शाहू दावणे,खजिनदार - सुनील डांगे,तपासणीस -मुकुंद चंदनशिवे, रुपेश जाधव, प्रसिद्धी विभाग प्रमुख म्हणून बाळासाहेब मस्के,अनिल चंदनशिवे आणि रमेश शिरसाठ, संघटकपदी दीपक नागटिळक यांची निवड करण्यात आली. कार्यकारणी सदस्य म्हणून अंकुश बनसोडे, कुणाल जानराव,प्राचार्य प्रकाश गायकवाड,रत्नदीप कांबळे. सांस्कृतिक विभाग प्रमुख- सुनीता गायकवाड,सुचित्रा थोरे, प्रेमलता कांबळे,मुख्याध्यापिका मंजूश्री खंडागळे आणि वनिता पवार. ज्येष्ठ सल्लागार- अंबादास कदम, अण्णासाहेब भालशंकर, विठ्ठल थोरे, भीमराव लोखंडे, धर्मराज पायाळ,सुधीर चंदनशिवे, शांतीकुमार कांबळे, चंद्रकांत कोळेकर, वशिष्ठ सोनकांबळे, विजयकुमार कांबळे. महिला ब्रिगेड -संगीता कांबळे, राजश्री रणदिवे, वनिता गायकवाड, मंगल दुड्डे, पल्लवी प्रक्षाळे, हेमा वाघमारे, मंदाकिनी शिंगे, सुशिलादेवी भालशंकर, सुवर्णा गायकवाड, लक्ष्मी शिंदे, प्रीती जाधव आणि वर्षा जाधव. खजिनदार सुनील डांगे यांनी आभार मानले.

# कांद्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी; दर न वाढल्याने शेतकरी हवालदिल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**



शासनाच्या यापुर्वीच्या निर्यात बंदी धोरणामुळे कांद्याचे दर प्रचंड प्रमाणात पडले आहेत. दर वाढतील या आशेवर साठवणूक केलेला कांदा सडण्याच्या स्थितीत आला असून त्याची विक्री कशी करायची या विचाराने शेतकरी हवालदिल झालेला आहे. सोलापूर श्री सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे गेल्या तीन ते चार महिन्यांपासून कमी दर कांद्याला मिळत असल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी उभा राहिले आहे.

शासनाने १ एप्रिलपासून कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क हटवले असले तरी अजूनही कांद्याची अपेक्षित निर्यात सुरु नाही. त्यातच सध्या मार्केटमध्ये कांद्याची आवक वाढल्याने तो ठेवायलाही जागा नसल्याने मिळेल त्या भावात कांदा विक्री करण्याशिवाय आडतदारांसमोर पर्याय उरला नाही. त्यालाही खरेदी करण्यासाठी व्यापारी मिळत नसल्याने आडतदारांसमोर मोठा पेचप्रसंग निर्माण झाला आहे. उत्पादन खर्चही निघत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्याचे दिसून येत आहे.

शेतकऱ्यांना कर्ज फेडण्यासाठी तसेच हात उसने घेतलेल्या पैशांची देवाण-घेवाण करण्यासाठी पैशांची गरज भासत आहे. त्यामुळे हाताला असलेला कांदा शेतकऱ्यांनी बाजारपेठेत विक्रीसाठी आणल्याने मार्केटमध्ये कांद्याचे आवक प्रचंड प्रमाणात वाढली. त्याचा फटका दरावर बसला असून कांद्याचे दर प्रचंड प्रमाणात पडले आहेत. सध्या तीन रुपये किलो पासून १४ रुपये किलो पर्यंत कांद्याची विक्री होत आहे. प्रतवारीनुसार कांदा विकला जात असून शेतकऱ्यांच्या पदरात सरासरी सहा ते सात रुपये दराने पैसे मिळत आहेत. शेती कामांसाठी सध्या मजुरांचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच कांदा हे पीक वेळेवर काढणे गरजेचे असते. कांदा काढणे, पात कापणे व पिशवीत भरून देण्यासाठी एकरी पंधरा हजार रुपये खर्च येत आहे. काढलेला कांदा शेतकऱ्यांनी आणखी दोन महिने तसाच पिशवीत बंद ठेवला तर तो खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अनेक छोट्या मोठ्या शेतकऱ्यांना कांदा चाळीत ठेवणे शक्य होत नाही किंवा त्यांना ते परवडत नाही. सध्या पैशाची गरज असल्याने उत्पादित केलेला कांदा मिळेल त्या दराने विकण्याकडे अनेक शेतकऱ्यांचा कल आहे.

# महापालिका कर्मचाऱ्यांना कॅशलेस मेडिक्लेम योजना लागू करावी

### महामानव डॉ. आंबेडकर ट्रेड युनियनचे पालिका आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**



महापालिका कर्मचाऱ्यांना पूर्वी प्रमाणेच कॅशलेस विमा मेडिकल योजना लागू करण्यात यावी यासह विविध मागण्यांचे निवेदन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर

ट्रेड युनियनच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना देण्यात आले. दि. १ जुलै रोजी काढलेल्या आकृतीबंध दुरुस्ती परीपत्रकामध्ये सोलापूर शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या आरोग्याचा विचार करून वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची ५०० नवी पदे तयार करून दि. ६ एप्रिल १९९५ नंतरच्या उर्वरित २४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करावे. आय.सी.टी. बेस्ट प्रणाली मार्फत होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामाचे मूल्यमापन न करणे बाबत क्युआर कोड स्कॅन सक्ती रद्द करावी. सर्व बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना साप्ताहिक सुट्टीचे वेतन देऊन किमान वेतन लागू करावे. कायम कर्मचाऱ्या प्रमाणेच बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांना खाकी कपडे मिळावे. सोलापूर महापालिका कर्मचाऱ्यांना शासनाप्रमाणे महागाई भत्ता लागू करावा आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. या मागण्यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेणार असल्याचे आश्वासन आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे आणि अतिरिक्त आयुक्त रवी पवार युनियनला दिले.

यावेळी अध्यक्ष कामगार नेते बापूसाहेब सदाफुले, सचिव विठ्ठल सोनकांबळे, प्रमुख मार्गदर्शक इकबाल तडकल,कार्याध्यक्ष योहान कानेपागुल, खजिनदार अरुण म्हेत्रे, सहसचिव रामचंद्र चंदनशिवे, प्रमुख संघटक सायबण्णा हदिमनी, शिवराज शिंदे, सुनील शिंदे, धनाजी लोंढे, संतोष गायकवाड, बिभिशण गायकवाड आणि बदली रोजंदारी कर्मचारी उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**
**निविदा सूचना क्रमांक SUR/TD/T/2024/11R2.**
वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर त्यांच्या वतीने आणि भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. कामाचे नाव: सोलापूर विभागात ट्रामवे OHE चे पारंपारिक OHE मध्ये रूपांतर करण्यासाठी प्रस्ताव (पुनर्निमंत्रण). अंदाजे किंमत: 1,66,89,928.60. बयाणा रक्कम :2,33,500/-. पूर्णता कालावधी : 12 महिने. ऑफरची वैधता: 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 29/08/2025 दुपारी 3:00 वाजता.
**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD)**
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-55
रेल्वे रूळ अनधिकृतपणे ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**
**निविदा सूचना क्रमांक SUR/TD/T/2024/12R3.**
वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित करीत आहेत. कामाचे नाव : सोलापूर विभागातील सुरक्षितता आणि विश्वासार्हता सुधारण्यासाठी विविध ठिकाणी असलेल्या लीनिंग मास्टवर उपस्थित राहण्यासाठी जवळ संरचनेची बदली (पुनर्निमंत्रण). अंदाजे किंमत: रु. 2,34,68,737.21. बयाणा रक्कम रु.: 2,67,400/-. पूर्णता कालावधी: 12 महिने. ऑफरची वैधता: 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 01/09/2025 दुपारी 15:00 वाजता.
**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD)**
**सीआर, सोलापूर**
Akar/Sur-56
रेल्वे रूळ अनधिकृतपणे ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**
**ई-निविदा सूचा क्रमांक : 27-2025-SrDENC**
भारताच्या राष्ट्रपतींच्यावतीने एसआरडीईएनसी. डीआरएम (डब्ल्यू), मध्य रेल्वे, सोलापूर खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहेत: कामाचे नाव : सोलापूर विभागात एकूण 60 पुलांचे रंगकाम (आरयूबी/एलएचएस/स्लॅब पूल). कामाची अंदाजे किंमत: 1,87,08,562.5/-. बयाणा रक्कम: 2,43,600/-. काम पूर्ण करण्याचा कालावधी: 06 महिने. देखभाल कालावधी: 12 महिने. www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ: 28/08/2025 ते 15:00 वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 28/08/2025 ते 15:30 वा. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in
**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (वर्क्स)**
**मध्य रेल्वे, सोलापूर**
Akar/Sur-57
रेल्वे रूळ अनधिकृतपणे ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

### राखी पौर्णिमेमुळ कुरिअर सर्विसवर वाढला ताण



**सोलापूर : राखी पौर्णिमेनिमित्त मोठ्या प्रमाणात गिफ्ट पाठवण्याचे प्रमाण वाढल्याने शहरातील कुरियर सर्विसर ताण वाढलेला आहे. त्यामुळे हे कर्मचारी बारा-बारा तास या कामात व्यस्त आहेत. (छायाचित्र : केवल तिवारी)**

**CHANGE OF NAME**
I Here by Declare that my Old Name is **RUDRAVIJAY SHANTLINGAYYA SWAMI** has been change as New name **RUDRAVIJAY SHANTLING SWAMI** Infront of Executive Magistrate Akkalkot
**Affidivite No. 10110/2025**
**Date 23/07/2025**

# लोकशाहीच्या रक्षणासाठी लढलेल्या व्यक्तींचा जिल्हाधिकारी कार्यालयात सन्मान

### मुख्यमंत्र्यांची स्वाक्षरी असलेले सन्मानपत्र ६३ व्यक्तींना प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.६ ऑगस्ट-**



सन १९७५ ते १९७७ या काळात देशात लागू करण्यात आलेल्या आणीबाणीच्या विरोधात लोकशाहीच्या रक्षणासाठी लढा देणाऱ्या व्यक्तींच्या सन्मान करण्यासाठी विशेष गौरव सोहळ्याचे आयोजन प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले. या कार्यक्रमात ६३ व्यक्तींना सन्मानपत्र प्रदान करून त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला.

यावेळी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे, तहसीलदार शिल्पा ओसवाल, नायब तहसीलदार उत्कर्ष देवकुळे, आणीबाणी काळातील व्यक्तींच्या संघटनेचे जिल्हा अध्यक्ष गुरुराज कुलकर्णी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी शासनाच्या वतीने २५ जून रोजी आयोजित कार्यक्रमाचा संदर्भ देत सांगितले की, ज्यांना मानधन मिळत नाही किंवा अपात्र ठरवले गेले आहेत, त्यांनी आपली माहिती लेखी स्वरूपात द्यावी. शासनाकडे पुढील प्रस्ताव पाठवला जाईल. त्यांनी आणीबाणी काळात बंदिवास भोगलेल्या उपस्थित व्यक्तींचे आभार मानले आणि त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासन सकारात्मक असल्याचेही सांगितले. जिल्हा अध्यक्ष गुरुराज कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आणीबाणी काळात आम्ही सैनिक म्हणून लढलो. आम्ही मानधनासाठी नव्हे, तर देशाच्या लोकशाही रक्षणासाठी संघर्ष केला. त्यांनी प्रशासनाचे आभार मानले आणि उपस्थितांना जयघोषाने प्रेरित केले. आणीबाणी काळात बंदीवास भोगलेले संजय कुलकर्णी यांनी जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली बारा महिने कारावास भोगल्याची आठवण सांगितली. वयाने जरी वाढले असलो तरी उत्साह आजही तरुण आहे, असे ते म्हणाले. प्रफुल्ल कुलकर्णी यांनी प्रदर्शन, पत्रव्यवहार आणि संवादाच्या माध्यमातून सत्याग्रहींना एकत्र आणल्याबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रम लोकशाहीच्या मूल्यांची आठवण करून देणारा ठरला असून आणीबाणी काळात लोकशाहीच्या रक्षणासाठी लढा देणाऱ्या व्यक्तींच्या संघर्षाचा गौरव करण्याचा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. आज जिल्हा प्रशासनाच्या वतीने आणीबाणी कालावधीत लोकशाही मूल्यांचे जतन करण्यासाठी लढा देणाऱ्या त्यासाठी बंदीवास भोगलेल्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला प्रास्ताविक नायब तहसीलदार नीलिमा मते यांनी केले. तर उत्कर्ष देवकुळे यांनी आभार मानले.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८९/२०२५
पुढील नेमलेली तारीख १४/०८/२०२५
नि. ५

**बार्शी येथिल मे. अति. जिल्हा व सत्र न्यायाधिश सो. यांचे कोर्टात**

**कु. हर्षवर्धन रामचंद्र धुमाळ,**
वय - १४ वर्षे, धंदा - शिक्षण,
राः हॅन्डबॅल स्टेडियमसमोर, ता. हवेली,
जि पुणे, ४११०२८.
हल्ली रा : पोपळज, तालुका - करमाळा,
जिल्हा - सोलापूर ४१३२०२.
**तर्फे अ.पा.क. वडील**
**रामचंद्र दिगंबर धुमाळ,**
वय - ४२ वर्षे, धंदा - शेती,
रा. हॅन्डबॅल स्टेडियमसमोर,
ता. हवेली, जि पुणे, ४११०२८.
हल्ली रा : पोपळज, तालुका करमाळा,
जिल्हा - सोलापूर ४१३२०२. — **अर्जदार**
विरूध्द
**महाराष्ट्र शासन** — **सामनेवाला**

यात अर्जदारातर्फे जाहीर प्रसिध्दीकरण यात अर्जदार यांनी डि. सोलापूर, सब डी. व तालुका करमाळा, जि.प. सोलापूर व पंचायत समिती करमाळा हद्दीतील मौजे पोपळज येथील,

**अ)** गट नंबर १७९, यांसी एकूण क्षेत्र ०४ हेक्टर, ४२ आर, (०० हेक्टर, १७ आर पोटखराबसहीत), यांसी आकार रक्कम रूपये ०४.२५ पैसे, पैकी अर्जदार यांचे मालकीचे क्षेत्र ०० हेक्टर, ४० आर मधील ०० हेक्टर, २० आर, यांसी **चतु:सिमा पुढीलप्रमाणे :- पुर्वेस** - गव्हाणे यांची जमीन, **दक्षिणेस** - संजय दिगंबर धुमाळ यांचे क्षेत्र, **पश्चिमेस** - नवनाथ धुमाळ यांची जमीन, **उत्तरेस** - अर्जदार यांचे उर्वरीत क्षेत्र,

**ब)** गट नंबर १७९, यांसी एकूण क्षेत्र ०४ हेक्टर, ४२ आर, (०० हेक्टर, १७ आर पोटखराबसहीत), यांसी आकार रक्कम रूपये ०४.२५ पैसे, पैकी अर्जदार यांचे मालकीचे क्षेत्र ०० हेक्टर, ४० आर मधील ०० हेक्टर, २० आर, यांसी **चतु:सिमा पुढीलप्रमाणे :- पुर्वेस** - गव्हाणे यांची जमीन, **दक्षिणेस** - अर्जदार यांचे उर्वरीत क्षेत्र, **पश्चिमेस** - नवनाथ धुमाळ यांची जमीन, **उत्तरेस** - मुरलीधर गोविंद धुमाळ यांची जमीन,

उपरोक्त नमुद अ मधील मिळकत हि अर्जदार यांना वैभव सोपान गव्हाणे यांना व ब मधील मिळकत हि अर्जदार यांना सुरज गौतम धुमाळ यांना विक्री करणेच्या आहेत, त्यासाठी मे. कोर्टाचा योग्य तो आदेश मिळणेकामी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात आणलेला आहे, तरी अर्जदार यांचे नावे असलेल्या मिळकती विक्री करणेकामी कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास दिनांक १४/०८/२०२५ रोजी रोजी सकाळी ११:०० वाजता किंवा ३० दिवसांचे आत स्वतः अगर वकिलांमार्फत हजर आपले म्हणणे सादर करावे. अगर कोणीही हजर न राहील्यास मे. कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार नाही, असे समजून योग्य तो हुकुम करतील, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून सदर प्रसिध्दीकरण दिले असे. आज दि. ०६/०८/२०२८ रोजी आमचे सही व न्यायालयाचे सही शिक्यानिशी दिली असे.

**सही/-**
**क. लिपीक,**
**दिवाणी न्यायालय, बार्शी**

**कोर्टाचा शिक्का**

**हुकूमावरुन**
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**अति. जिल्हा व सत्र न्यायालय,**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**

**श्री भिमाशंकर ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, कुंभारी ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर**

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

**फक्त सभासदांसाठी**

श्री भिमाशंकर ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित कुंभारी, ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक १७/०८/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता संस्थेच्या कार्यालयाजवळ कुंभारी, ता. द. सोलापूर येथे खालील विषयावर विचार विनिमय करण्याकरिता बोलाविण्यात आली आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे. ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१. मागील दिनांक १८/०८/२०२४ रोजीचा वार्षिक सर्वसाधारण सभेचा सभावृत्तांत वाचून कायम करणे.
२. सन २०२४-२५ वर्षाच्या संस्थेच्या कामकाजाबद्दलचा अहवाल, लेखापरिक्षीत ताळेबंद व नफातोटा पत्रक मंजुर करणे.
३. सन २०२४-२५ सालाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व दोषदुरूस्ती अहवालाची वाचून नोंद घेणे.
४. कायदा नियम यास अनुसरून सन २०२४-२५ सालच्या नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहिर करणे.
५. सन २०२५-२६ सालाकरीता मा. संचालक मंडळाने तयार केलेले अंदाज पत्रक मंजूर करणे व सन २०२४-२५ च्या अंदाज पत्रकापेक्षा जास्त केलेल्या खर्चास मंजूरी देणे.
६. सन २०२५-२६ सालाकरीता वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे व मानधन ठरविणे.
७. सन २०२५-२६ सालाकरीता अंतर्गत लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे व मानधन ठरविणे.
८. संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९. शासनाने नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थासाठी तयार केलेला सुधारीत आदर्श उपविधी स्विकृत करणे.
१०. उपविधी क ०३ दुरूस्तीबाबत विचार विनिमय करणे.
११. सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांच्या रजेच्या अर्जास मान्यता देणे,
१२. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या ऐन वेळच्या विषयावर चर्चा करणे.

**स्थळ : कुंभारी, ता. द. सोलापूर**
**दिनांक : ०२/०८/२०२५**

संचालक मंडळाच्या आदेशावरून
**वसंत शंकर मणुरे**
**व्यवस्थापक**

**सभासदांना नम्र सुचना -**

१. कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. मात्र त्यावेळेस कोरमची आवश्यकता भासणार नाही.
२. सभासदांना संस्थेच्या कामकाजासंबंधी जे प्रश्न विचारावयाचे असतील ते प्रश्न संस्थेकडे दिनांक १४/०८/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत लेखी पाठविण्याची विनंती आहे. तद्नंतर येणारे प्रश्न विचारात घेतले जाणार नाहीत. संस्थेची आर्थिक पत्रके कार्यालयात पाहणेसाठी ठेवलेली आहेत तरी सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी.

## महत्त्वाचे

### राशिद खानचा अनोखा विक्रम!

**नवी दिल्ली :** सध्या इंग्लंडच्या सर्वात लोकप्रिय लीग 'द हंड्रेड'चा पाचवा हंगाम सुरू झाला. लंडन स्पिरिट आणि ओव्हल इनव्हिन्सिबल्स यांच्यातील सामन्याने या हंगामाची सुरुवात झाली. या सामन्यात राशिद खानने इनव्हिन्सिबल्ससाठी पदार्पणाच्या सामन्यातच शानदार गोलंदाजी केली व ३ बळी टिपलेत.या तीन बळींसह तो टी-२० क्रिकेटमध्ये ६५० किंवा त्याहून अधिक बळी टिपणारा पहिला गोलंदाज ठरला आहे. टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक बळी टिपणाऱ्या गोलंदाजांमध्ये राशिद खानचे नाव अव्वल स्थानावर आहे. त्याने आतापर्यंत ४८२ सामन्यांमध्ये ६५१ बळींची नोंद केली आहे. वेस्ट इंडीजचा माजी अष्टपैलू ड्वेन ब्राव्हो दुसऱ्या क्रमांकावर आहे. ब्राव्होने ५८२ सामन्यांमध्ये ६३१ बळींची नोंद केलेली आहेत. या यादीत त्याचा सहकारी सुनील नारायण तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने ५५४ सामन्यांमध्ये ५८९ बळी टिपले आहे. दक्षिण आफ्रिकेचा इम्रान ताहिर ५४७ बळींसह चौथ्या क्रमांकावर आहे आणि बांगलादेशचा शाकिब अल हसन ४९८ बळींसह पाचव्या क्रमांकावर आहे. ■

### बिल्किस मीर यांनी घेतली क्रीडामंत्री मांडवीय यांची भेट

**नवी दिल्ली :** अपघाती कायाकरपासून ऑलिम्पिकमध्ये ज्युरी सदस्य होण्यापर्यंतचा प्रवास करणाऱ्या काश्मिरी ट्रेलब्लेझर बिल्किस मीर यांनी क्रीडा मंत्री मनसुख मांडविया आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा निखिल खडसे यांची जलक्रीडाच्या भविष्यावर चर्चा करण्यासाठी भेट घेतली. गत वर्षी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कायाकिंग व कॅनोइंगमध्ये ज्युरी सदस्य म्हणून काम करणाऱ्या ३८ वर्षीय बिल्किस मीर यांनी येथे दोन्ही मंत्र्यांची भेट घेतली आणि त्यांना देशातील जलक्रीडा क्षेत्राच्या विकासाबद्दल माहिती दिली. यावेळी क्रीडामंत्र्यांनी बिल्किस मीर यांना कायाकिंग आणि कॅनोइंगसाठी एक आराखडा तयार करण्यास आणि संघांना तयार करण्यास सांगितले. ऑलिम्पिकमध्ये एकूण १६ पदके मिळवणाऱ्या या जलक्रीडांबाबत केंद्रीय क्रीडा मंत्रालय उत्सुक आहे हे जाणून आनंद झाला, असे मीर म्हणाल्या. जम्मू-काश्मीरचा प्रतिष्ठित दाल सरोवर २१ ते २३ ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या पहिल्या खेलो इंडिया जलक्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यासाठी सज्ज झाला आहे अशा वेळी दोन्ही मंत्र्यांसोबत त्यांची भेट झाली. ■

# गिल आयसीसी पुरस्कारासाठी नामांकित

◆ **दुबई, ६ ऑगस्ट**

भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल याला बुधवारी जुलै महिन्यातील आयसीसीच्या महिन्यातील सर्वोत्तम खेळाडू पुरस्कारासाठी नामांकन देण्यात आले आहे. या पुरस्कारासाठी नामांकित करण्यात आलेल्या तीन खेळाडूंमध्ये गिलसह दक्षिण आफ्रिकेचा वियान मुल्डर व इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सचा समावेश आहे.

गिलने अलीकडेच संपलेल्या अॅण्डरसन-तेंडुलकर चषकांत इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात भारताचे उल्लेखनीय नेतृत्व केले. त्याच्या नेतृत्वाखालील युवा संघाने मालिकेत २-२ अशी कठीण लढत दिली होती, ही मालिका २५ वर्षांच्या जुन्या मालिकेत फलंदाजी विक्रमांची पुनर्रचना केली.

गिलने इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत चार शतकांसह ७५४ धावा केल्या, यात ७५.४० च्या सरासरीने द्विशतकांचा समावेश होता व पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारतीय कर्णधारासाठी सर्वाधिक धावा करण्याचा दिग्गज सुनील गावस्कर यांचा विक्रम (७३२) मोडला. गिलची कामगिरी आता कर्णधारांच्या यादीत सर डोनाल्ड ब्रॅडमन (८१० धावा) नंतर दुसऱ्या क्रमांकाची सर्वोत्तम कामगिरी आहे.

शुभमन गिलने इंग्लंडमधील भारताच्या विजयी मालिकेत तीन कसोटी सामन्यांमध्ये ९४.५० च्या सरासरीने ५६७ धावा केल्या, असे आयसीसीने आपल्या संकेतस्थळावर लिहिले




आहे. एजबॅस्टन येथे भारताच्या विक्रमी विजयात त्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्याने पहिल्या डावात २६९ आणि दुसऱ्या डावात १६१ धावा केल्या. दोन्ही डावांमध्ये त्याने एकत्रित ४३० धावा केल्या, जी ग्रॅहम गूचच्या ४५६ धावांनंतर दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च धावसंख्या आहे, असे त्यात म्हटले आहे.

गिलने चौथ्या क्रमांकावर 'सर्वकालीन महान' विराट कोहलीकडून कामगिरी बजावली, त्याच प्रमाणात स्थिरता आणि लय दिली, असे त्यात म्हटले आहे. दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार म्हणून आपल्या पहिल्याच सामन्यात, मुल्डरने झिम्बाब्वेविरुद्ध नाबाद ३६७ धावांची प्रचंड खेळी केली, पण २००४ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या महान ब्रायन लाराचा सर्वाधिक वैयक्तिक नाबाद ४०० धावांचा विक्रम तो मोडू शकला असता तेव्हा त्याने आपल्या संघाचा डाव घोषित केला. त्याने दोन्ही सामन्यांमध्ये २६५.५० च्या आश्चर्यकारक सरासरीने ५३१ धावा केल्या, असे आयसीसीने म्हटले आहे.

तथापि, बुलावायो येथील दुसऱ्या कसोटीत मुल्डरने आपली उत्कृष्ट कामगिरी केली होती, तिथे त्याने दक्षिण आफ्रिकेचा कसोटी कर्णधार म्हणून आपल्या पहिल्याच सामन्यात नाबाद ३६७ धावा केल्या. ही दक्षिण आफ्रिकेच्या कसोटी इतिहासातील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या आहे.

मुल्डरने गोलंदाजीतही चांगली कामगिरी केली व केवळ १५.२८ च्या सरासरीने सात बळी घेतले, यात पहिल्या कसोटीत चार बळींचा समावेश आहे, असे त्यात म्हटले आहे.

भारताविरुद्धच्या अष्टपैलू कामगिरीबद्दल आयसीसीने बेन स्टोक्सचे कौतुक केले आहे. बेन स्टोक्सने ५०.२० च्या सरासरीने २५१ धावा केल्या व २६.३३ च्या सरासरीने १२ बळी घेतले. त्याने उच्च दाबाच्या परिस्थितीत फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्हीतून कामगिरी केली. त्याचे संघ नेतृत्व इंग्लंडची तीव्रता व विश्वास टिकवून ठेवण्यात महत्त्वपूर्ण ठरले.

◀(वृत्तसंस्था)

# सिराजचे हैदराबादमध्ये जोरदार स्वागत



मोहम्मद सिराजचे चाहत्यांनी उत्स्फूर्त स्वागत केले

### चाहत्यांची उत्स्फूर्त गर्दी

◆ **हैदराबाद, ६ ऑगस्ट**

इंग्लंडविरुद्धच्या अनिर्णीत कसोटी मालिकेत उत्कृष्ट कामगिरी केल्यानंतर भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज बुधवारी आपल्या गावी हैदराबादमध्ये पोहोचला, यावेळी उत्साही चाहत्यांनी त्याचे उत्स्फूर्तपणे स्वागत केले.

अॅण्डरसन-तेंडुलकर चषक पाच सामन्यांच्या मालिकेत सिराज हा आघाडीचा बळी घेणारा गोलंदाज होता. त्याने पाचही सामने खेळले आणि १८५.३ षटके गोलंदाजी केली.

३१ वर्षीय हा खेळाडू संघाचे क्षेत्ररक्षण प्रशिक्षक टी. दिलीप यांच्यासह लंडनहून मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रथम उतरला व नंतर आपल्या मायभूमी- हैदराबादकडे रवाना झाला. त्याने काळे कॅज्युअल कपडे परिधान केले होते आणि चाहत्यांच्या एका गटाने त्याचे आनंदाने स्वागत केले.

सेल्फी व हस्ताक्षरासाठी विनंत्या करण्यात आल्या, पण सिराज लगेचच कारमध्ये बसला आणि हैदराबादला जाणारी कनेक्टिंग विमान पकडण्यासाठी देशांतर्गत टर्मिनलकडे रवाना झाला, तिथे त्याचे पुन्हा एकदा चाहत्यांच्या एका गटाने स्वागत केले.

आम्ही अद्याप त्याच्याशी बोललो नाही. पण आम्ही त्याच्यासाठी काहीतरी सत्कार योजना नक्कीच आखू, कारण तो आता काही काळ शहरात असू शकतो. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेत त्याने देशासाठी इतके चांगले काम केले, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे, असे हैदराबाद क्रिकेट संघटनेच्या पदाधिकाऱ्याने सांगितले.

सिराजचा सर्वात निर्णायक प्रयत्न ओव्हल येथे झालेल्या शेवटच्या कसोटी सामन्याच्या पाचव्या दिवशी झाला. त्याच्या अद्वितीय कामगिरीमुळे भारताने इंग्लंडला ३७४ धावांच्या पाठलागात ३६७ धावांत गुंडाळले.सिराजने डावात पाच बळींसह एकूण नऊ बळी टिपण्याची किमया केली. भारताच्या कसोटी इतिहासातील सर्वात रोमहर्षक अशा ६ धावांच्या विजयामुळे भारतीय संघाला मालिकेत २-२ अशी प्रशंसनीय बरोबरी साधता आली.

सिराज एका कर्णधाराचे स्वप्न आहे, त्याने टाकलेला प्रत्येक चेंडू, प्रत्येक स्पेल त्याने सर्वस्व पणाला लावले व संघासाठी सर्वकाही दिले, असे भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिल पाचव्या कसोटीनंतर म्हणाला.

मी कोणत्याही टप्प्यावरून सामना जिंकू शकतो. ओव्हलवरील शेवटच्या दिवशी आपल्या संघाला विजय मिळवून देण्यावर माझा विश्वास होता. भारतीय संघाला ३५ धावांचा बचाव करताना चार बळी टिपायचे होते, ती कामगिरी आम्ही फत्ते केली, असे सिराज म्हणाला.

◀(वृत्तसंस्था)

# सिराज, प्रसिध कृष्णा आयसीसी क्रमवारीत चमकले

◆ **दुबई, ६ ऑगस्ट**

भारत व इंग्लंड यांच्यातील शेवटच्या सामन्यातील विजायचे शिल्पकार भारताचे दोन गोलंदाज होते. त्यांनी जवळजवळ गमावलेला सामना टीम इंडियाच्या खिंडीत टाकला. मोहम्मद सिराज आणि प्रसिध कृष्णाने शानदार गोलंदाजी केली. जरी संपूर्ण मालिका प्रसिधसाठी चांगली गेली नाही, परंतु त्याने पाचव्या सामन्यात त्याची भरपाई केली. आयसीसी क्रमवारीमध्येही या दोन्ही गोलंदाजांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचा फायदा झाला आहे व त्यांनी मोठी झेप घेतली आहे.

भारत व इंग्लंडदरम्यानची कसोटी मालिका संपल्यानंतर, आयसीसीने नवीन क्रमवारी जाहीर केली आहे. यात जसप्रीत बुमराह अजूनही प्रथम क्रमांकाचा गोलंदाज आहे. तथापि, बुमराह शेवटचा सामना खेळला नव्हता. बुमराहचे रेटिंग सध्या ८८९ आहे. दरम्यान, पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाच्या गोलंदाजांमधील रेटिंगमध्ये मोठा फरक आहे. सध्या कसोटी मानांकनामध्ये कॅगिसो रबाडा दुसऱ्या क्रमांकावर आहे, ज्याचे रेटिंग ८५१ आहे. म्हणजेच, बुमराह सध्या कोणत्याही धोक्यात नाही.

**सिराज थेट १५ व्या क्रमांकावर**

इंग्लंडविरुद्धच्या ओव्हल कसोटीत मोहम्मद सिराजने ज्या पद्धतीने गोलंदाजी केली, त्यामुळे त्याचे रेटिंग ६७४ पर्यंत वाढले आहे. त्याने एकाच वेळी १२ स्थानांची झेप घेतली आहे. सिराज आता थेट १५ व्या क्रमांकावर पोहोचला आहे. आयसीसी कसोटी क्रमवारीत सिराजने १५ व्या क्रमांकावर विराजमान होण्याची ही पहिलीच वेळ आहे. ही सिराजची सर्वकालीन सर्वोच्च रँकिंग देखील आहे.

**प्रसिध कृष्णा ५९ व्या क्रमांकावर**

प्रसिधने पहिल्या काही सामन्यांमध्ये खूप धावा दिल्या, परंतु शेवटच्या सामन्यात तो विजयाचा शिल्पकार म्हणून उदयास आला. यामुळेच त्याचे रेटिंग आता ३६८ पर्यंत वाढले आहे. प्रसिध कृष्णाने यावेळी एकाच वेळी २५ स्थानांची झेप घेतली आणि तो थेट ५९ व्या क्रमांकावर पोहोचला आहे. हे प्रसिधचे सर्वकालीन सर्वोच्च रँकिंग देखील आहे. आता मालिका संपली आहे, परंतु पुढील मालिकेत तो कसा कामगिरी करतो हे पाहणे खूप मनोरंजक असेल. ◀(वृत्तसंस्था)

### आशियाई सर्फिंग स्पर्धेत हरीश, तयिन तिसऱ्या फेरीत

**चेन्नई :** भारताचे हरीश प्रकाश व तयिन अरुणने बुधवारी उत्तम कामगिरी करत येथे सुरु असलेल्या आशियाई सर्फिंग स्पर्धेत १८ वर्षांखालील मुलांच्या गटात तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. अरुणने भारतीय स्पर्धकांमध्ये सर्वोत्तम ९.२३ गुण नोंदवले. ११ वर्षीय प्रकाशनेही प्रभावी कामगिरी केली आणि ७.९७ गुणांसह तिसऱ्या फेरीत स्थान मिळवले आणि मलेशियाच्या लुकास सँटियागो (१०.५७ गुण) मागे राहिला. ■

# बुमराहशिवाय विजय हा केवळ योगायोग

### तेंडुलकरने केली पाठराखण

◆ **मुंबई, ६ ऑगस्ट**

जसप्रीत बुमराहच्या अनुपस्थितीत भारताने इंग्लंडविरुद्ध दोन कसोटी जिंकणे हा केवळ 'योगायोग' होता. बुमराहच्या वेगवान गोलंदाजीची गुणवत्ता 'अपवादात्मक व अविश्वसनीय' आहे, असे मत महान फलंदाज सचिन तेंडुलकरने व्यक्त केले.

बुमराहने नुकत्याच संपलेल्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील तीन सामने खेळले, यात तुलनेने अननुभवी भारतीय संघाने मालिकेत २-२ अशी बरोबरी साधली. भारताने जिंकलेल्या दोन सामन्यांमध्ये बुमराहचा समावेश नव्हता, कारण त्याने पूर्वनियोजित वर्कलोड





व्यवस्थापन योजना आखली होती.

बुमराहच्या अनुपस्थितीत भारताने बर्मिंगम व द ओव्हलमध्ये विजय मिळवणे ही संधीची बाब होती. त्याने खेळलेल्या तीन कसोटी सामन्यांमध्ये एकूण १४ बळी घेतले, असे तेंडुलकर म्हणाला.

बुमराने सुरुवात खूप चांगली केली, पहिल्या कसोटीच्या पहिल्या डावात पाच बळी घेतले. तो दुसरी कसोटी खेळला नाही, पण तिसरी आणि चौथी कसोटी खेळला. पुन्हा, त्या दोन कसोटींपैकी एका कसोटीत त्याने पाच बळी घेतले, असे त्याने व्हिडीओ विश्लेषणात म्हटले आहे.

त्याने खेळलेल्या तीन कसोटींपैकी त्याने दोनदा पाच बळी टिपण्याची किमया केली. ज्या कसोटी सामन्यांमध्ये तो खेळला नाही त्या आपण जिंकल्या. पण माझ्यासाठी, हा केवळ एक योगायोग आहे. लोक अनेक गोष्टींवर चर्चा करत आहेत, याची मला कल्पना आहे, असेही सचिन म्हणाला. काही चाहत्यांनी याबद्दल बुमराहला ट्रोल करण्यास सुरुवात केली. दरम्यान, टीम इंडियाचा माजी दिग्गज क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर जसप्रीत बुमराहच्या समर्थनार्थ बाहेर पडला आहे.


खरे सांगायचे तर, माझ्यासाठी हा केवळ एक योगायोग आहे. बुमराह एक उत्तम गोलंदाज आहे. बुमराहची कामगिरी उत्कृष्ट आहे. त्याने आतापर्यंत जे काही केले आहे ते अविश्वसनीय आहे. माझ्या मते, तो सध्याच्या काळात सर्वात सुसंगत खेळाडू आहे यात शंका नाही, मी त्याला इतर कोणत्याही खेळाडूपेक्षा चांगला मानतो, असे तेंडुलकर म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

# के. एल. राहुल पुन्हा वडिलांच्या कर्तव्यावर रुजू

◆ **नवी दिल्ली, ६ ऑगस्ट**

इंग्लंडचा दौरा यशस्वी केल्यानंतर आता भारतीय फलंदाज के. एल. राहुल आपला विश्रांतीचा वेळ आपल्या कुटुंबासोबत घालवत आहे. तो पुन्हा वडिलांच्या कर्तव्यावर रुजू झाला आहे.

मी थोडेफार वडील म्हणून कर्तव्याते पालन केले आहे, पण दुर्दैवाने, एवाराच्या जन्मानंतर दोन दिवसांनी मला आयपीएल खेळावे लागले. आणि आयपीएल दरम्यान मिळालेल्या ब्रेकमध्ये मी काही दिवसांसाठी परत जाण्याचा व नंतर आयपीएल संपवण्याचा प्रयत्न केला, असे तो म्हणाला.



कुटुंबासमवेत वेळ घालवताना केएल राहुल

आता, मालिकेनंतर, राहुल पितृत्वाच्या प्रत्येक क्षणात रमतो आहे. एवारासह गमावलेल्या वेळेची भरपाई करत आहे आणि मैदानाबाहेरील जीवनातील शांत आनंदांना जपत आहे. बरोबरीत सुटलेल्या अॅण्डरसन-तेंडुलकर चषक कसोटी मालिकेत राहुलने दोन शतके व दोन अर्धशतकांसह ५०० हून अधिक धावा केल्या व सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तिसऱ्या क्रमांक मिळविला आहे. सध्या लंडनमध्ये, राहुलने मार्चमध्ये जन्मलेली मुलगी एवारासह शांतपणे फिरतानाचा एक हृदयस्पर्शी फोटो शेअर केला आहे. व्यस्त क्रिकेट वेळापत्रकानंतर राहुल पत्नी अभिनेत्री अहान शेट्टी व कन्या एवारासोबत दर्जेदार कौटुंबिक वेळेत रमताना दिसला.

मालिकेच्या सुरुवातीला, राहुलने आंतरराष्ट्रीय क्रिकेट व नवीन पितृत्वाच्या जबाबदाऱ्यांमध्ये संतुलन साधण्याच्या भावनिक परिणामांबद्दल उघडपणे सांगितले होते.

चेतेश्वर पुजारासोबतच्या एका मनमोकळ्या ऑन एअर गप्पा दरम्यान, राहुलने राष्ट्रीय कर्तव्यावर असताना त्याच्या नवजात मुलीपासून दूर राहणे किती कठीण होते हे सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

### चेन्नई ग्रॅण्ड मास्टर्स स्पर्धा एक दिवसासाठी स्थगित

◆ **चेन्नई, ६ ऑगस्ट**

चेन्नईमध्ये होणारी ग्रॅण्डमास्टर्स बुद्धिबळ स्पर्धा एका दिवसासाठी पुढे ढकलण्यात आली आहे. ही स्पर्धा आता ७ ऑगस्ट रोजी होणार आहे. प्रत्यक्षात, चेन्नई ग्रॅण्डमास्टर्स स्पर्धा ज्या हॉटेलमध्ये होणार आहे त्या हॉटेलमध्ये आग लागली होती, ज्यामुळे आयोजकांना हा निर्णय घ्यावा लागला. भारत आणि इतर देशांतील अनेक महान खेळाडू चेन्नई ग्रॅण्डमास्टर्स स्पर्धेत सहभागी होतील. या स्पर्धेची ही तिसरी आवृत्ती आहे.

भारतीय ग्रॅण्डमास्टर व स्पर्धा संचालक श्रीनाथ नारायण यांनी इंस्टाग्रामवर ही माहिती दिली व लिहिले की, काल रात्री चेन्नई ग्रॅण्डमास्टर्स ज्या हॉटेलमध्ये होणार होते त्या हॉटेलमध्ये आग लागली. सध्या सर्व खेळाडू सुरक्षित आहेत आणि त्यांना जवळच्या दुसऱ्या हॉटेलमध्ये पाठवण्यात आले आहे. स्पर्धा एका दिवसासाठी पुढे ढकलण्यात आली आहे. खेळाडूंना नंतर हॉटेलमध्ये परत आणण्यात आले असले तरी, सुरक्षा तपासणीनंतर एक दिवसानंतर ही स्पर्धा सुरू होईल. चेन्नईमधील हॉटेल हयात रिजन्सीच्या नवव्या मजल्यावर आग लागली, ज्यामुळे संपूर्ण हॉटेल धुराने भरले होते व हॉटेलमधून सर्व लोकांना बाहेर काढण्यात आले. आगीनंतर तिथे उपस्थित असलेल्या लोकांना श्वास घेण्यास त्रास होत होता.◀(वृत्तसंस्था)

# सकारात्मक क्रिकेट म्हणजे बेपर्वा क्रिकेट नाही

### चॅपेल यांची इंग्लंडच्या बॅझबॉल तत्त्वज्ञानावर टीका

◆ **नवी दिल्ली, ६ ऑगस्ट**

सकारात्मक क्रिकेट म्हणजे बेपर्वा क्रिकेट नाही, अशा शब्दांत ऑस्ट्रेलियाचे महान खेळाडू ग्रेग चॅपेल यांनी भारताविरुद्धच्या उच्च-तीव्रतेच्या अनिर्णीत कसोटी मालिकेदरम्यान इंग्लंडच्या बॅझबॉल तत्वज्ञानावर टीका केली.

चॅपेल यांनी ईएसपीएनक्रिकइन्फोमधील आपल्या स्तंभात चॅपेल यांनी तरुण भारतीय संघाचे निर्भय असल्याबद्दल कौतुक केले, तर इंग्लंडच्या खेळाडूंवर, विशेषतः हॅरी ब्रुकवर चमकदार फटकेबाजी खेळ करण्याऐवजी चिकाटीची आवश्यकता असलेली परिस्थिती समजून घेण्यात अपयशी ठरल्याबद्दल टीका केली.



या मालिकेत इंग्लंडने सावधगिरीच्या खेळाचे प्रदर्शन केले. एक हुशार परंतु पारदर्शक हॅरी ब्रुकने मूर्त रूप दिले आहे. ब्रुकच्या या गुणाचे मी यापूर्वी सार्वजनिकरित्या कौतुक केले आहेत, असे भारतीय संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक चॅपेल म्हणाले.

हॅरी ब्रुककडे वेळ, रेंज, आत्मविश्वास व फलंदाजीला सहजतेने खेळण्याची दुर्मिळ देणगी आहे. पण क्रिकेट, विशेषतः कसोटी क्रिकेट केवळ फटकेबाजी करण्याबद्दल नाही. ते निर्णय घेण्याबद्दल आहे. केव्हा आक्रमण करण्याची वेळ आली, कधी संयम बाळगायचा, तशी परिस्थिती ओळखणे महत्त्वाचे असते, असे ते म्हणाले.

निर्भय, आक्रमक क्रिकेटच्या 'बॅझबॉल' तत्वज्ञानाने त्यांच्या कसोटी संघाला पुनरुज्जीवित केले आहे, परंतु ते कठीण काळ टाळण्याचे निमित्त बनू शकत नाही. सकारात्मकतेत काहीही चूक नाही, पण सकारात्मक क्रिकेट म्हणजे बेपर्वा क्रिकेट नाही. त्याचा अर्थ आत्मविश्वासाने, विचारपूर्वक जोखीम घेणे असा होतो, असेही ते म्हणाले.

आव्हानात्मक सामन्यांच्या परिस्थितीत अधिक संयमी दृष्टिकोन हॅरी ब्रुकला इंग्लंडचा सर्वात जास्त धावा करणारा फलंदाज जो रूटचा योग्य उत्तराधिकारी म्हणून स्थापित करण्यास मदत करेल, असे ते म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

### आयसीसी मानांकनामध्ये गोंधळ

**नवी दिल्ली :** भारत विरुद्ध इंग्लंड मालिका संपल्यानंतर पुन्हा एकदा आयसीसी मानांकनामध्ये मोठा बदल झाला आहे. यशस्वी जयस्वालने पुन्हा एकदा अव्वल ५ मध्ये आपले स्थान निश्चित केले आहे, तर भारतीय कसोटी कर्णधार शुभमन गिलला यावेळी पराभवाचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, जो रूटने अव्वल स्थान कायम राखले आहे.

भारत- इंग्लंड यांच्यातील शेवटच्या कसोटी सामन्यानंतर, आयसीसीने आता नवीन कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे. यामध्ये, इंग्लंडचा जो रूट अव्वल स्थानावर कायम आहे. त्याचे रेटिंग आता ९०८ पर्यंत वाढले आहे. भारतीय संघाविरुद्धच्या शेवटच्या कसोटी सामन्यात शानदार फलंदाजी करणाऱ्या हॅरी ब्रुकने यावेळी एक स्थान मिळवले आहे. ■

# ओसाका उपांत्य फेरीत, गाठ क्लाराशी

◆ **मॉण्ट्रियल, ६ ऑगस्ट**

जपानच्या नाओमी ओसाकाने १० व्या मानांकित युक्रेनच्या एलिना स्वितोलिनाचा ६-२, ६-२ असा पराभव करत नॅशनल बँक ओपन टेनिस स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. आता ओसाका पुढील फेरीत १६ व्या मानांकित क्लारा टॉसनशी लढणार आहे.

पहिल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात क्लाराने सहाव्या मानांकित मॅडिसन कीजचा ६-१, ६-४ असा पराभव केला. क्लाराने सोमवारी विम्बल्डन विजेती व तिसऱ्या क्रमांकाच्या इगा स्वियातेकला ७-६ (१), ६-३ असे पराभूत केले, त्याचदिवशी तिला तिच्या आजोबांच्या मृत्यूची बातमी कळली. तिने हा विजय आजोबांना समर्पित केला.




प्रतिस्पर्धीविरुद्ध खेळताना नाओमी ओसाका

चार वेळा ग्रॅण्ड स्लॅम जिंकून महिला जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान पटकावणाऱ्या नोओमीने २०२२ मध्ये मियामीमध्ये अंतिम फेरी गाठल्यापासून डब्ल्यूटीए १००० स्पर्धेत आपली सर्वोत्तम कामगिरी सुरू ठेवली. त्या हंगामाच्या अखेरीस ती १५ महिने टेनिसपासून दूर राहिली. या काळात जुलै २०२३ मध्ये तिला मुलगी शाई झाली. जपानची रहिवासी असलेली ही महिला टेनिसपटू आपल्या कारकिर्दीतील आठव्या व २०२१ च्या ऑस्ट्रेलियन ओपननंतरच्या पहिल्या उपांत्य फेरीत पोहोचली आहे.

कॅनेडियन किशोरवयीन व्हिक्टोरिया म्बोको बुधवारी दुसऱ्या उपांत्य फेरीत कझाकस्तानच्या नवव्या मानांकित एलेना रायबाकिनाशी लढणार आहे. नॅशनल बँक ओपनमध्ये तिचा पहिला मुख्य ड्रॉ खेळणारी म्बोको, वर्षाची सुरुवात अव्वल ३०० च्या बाहेर केल्यानंतर, ती आता डब्ल्यूटीएच्या अव्वल ५० मध्ये प्रवेश करेल. टोरंटोच्या १८ वर्षीय खेळाडूने उपांत्य फेरीत पाच उच्च दर्जाच्या प्रतिस्पर्ध्यांना पराभूत केले आहे, यात चौथ्या फेरीत अव्वल मानांकित कोको गॉफचा समावेश आहे. ◀(वृत्तसंस्था)

# जो रूटला मालिकावीरचा सन्मान मिळायला हवा होता : हॅरी ब्रुक




◆ **लंडन, ६ ऑगस्ट**

अॅण्डरसन-तेंडुलकर चषक पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत जो रूटला त्याच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल मालिकावीर म्हणून सन्मान मिळायला हवा होता, असे इंग्लंडचा स्टार फलंदाज हॅरी ब्रुकने म्हटले आहे. त्याने भारतीय संघाचे प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या मालिकावीर म्हणून निवडण्याच्या निर्णयाशी असहमती दर्शविली. कसोटी मालिका २-२ अशी बरोबरीत सोडविल्यानंतर प्रत्येक संघाच्या प्रशिक्षकाने मालिकावीर पुरस्कारासाठी विरोधी संघातून एका खेळाडूची निवड केली.



इंग्लंडचे मुख्य प्रशिक्षक ब्रेंडन मॅक्युलमने भारताचा कर्णधार शुभमन गिलची निवड केली, तर गंभीरने इंग्लंडचा उत्कृष्ट कामगिरी करणारा खेळाडू म्हणून हॅरी ब्रुकची निवड केली.

शेवटच्या कसोटीच्या चौथ्या दिवशी हॅरी ब्रुकने ९८ चेंडूत १११ धावांची झंझावाती खेळी केली. ब्रुकच्या खेळीमुळे इंग्लंडला विक्रमी पाठलागाच्या उंबरठ्यावर आणले, परंतु नंतर ६६ धावांत सात फलंदाज गमावून इंग्लंडने सामना गमावला.

मी जो रूट इतक्या धावा काढल्या नाहीत, म्हणून मला वाटते की तो मालिकावीर असावा. मला वाटते आपण एका उत्तम स्थितीत आहोत. अर्थातच, ही मालिका खूपच छान राहिली आहे. २-२ अशी जिंकली, खरं सांगायचं तर असं होईल असं मला वाटलं नव्हते, असे ब्रुकने बीबीसीला सांगितले. हॅरी ब्रुकने ५३.४४ च्या सरासरीने ४८१ धावा केल्या, तर रूटने पाच सामन्यांच्या मालिकेत नऊ डावांमध्ये ६७.१२ च्या सरासरीने ५३७ धावा केल्या. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### सांगोला तहसील कार्यालयात महसूल सप्ताह अंतर्गत कार्यक्रम उत्साहात

**सांगोला, दि. ६ ऑगस्ट-**

सांगोला तालुक्यात दि.१ ते ७ ऑगस्ट दरम्यान महसूल सप्ताह साजरा करणेत येत आहे. या महसूल सप्ताहामध्ये दि.४ ऑगस्ट रोजी आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे प्रमुख उपस्थितीत तहसिल कार्यालय, सांगोला येथे कार्यक्रम आयोजित करणेत आला होता. यावेळी तहसिलदार संतोष कणसे यांनी दि.१ ते ७ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनाबाबत तसेच संगेवाडी मंडळ अधिकारी विजया नाईक यांनी महसूल कामकाजाविषयी सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वी पासून रहिवासी प्रयोजनार्थ घरकुल मंजूर झाले आहे अशा १७ लाभार्थ्यांना पटटे वाटप करण्यात आले. तसेच सांगोला तालुक्यातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी तहसिल कार्यालयातील नायब तहसिलदार, २ सहायक महसूल अधिकारी, ९ मंडळ अधिकारी, १० ग्राम महसूल अधिकारी, ८ महसूल सहायक, १० महसूल सेवक, १० पोलीस पाटील, ५ संगणक ऑपरेटर तसेच १०० टक्के केवायसी व धान्य वाटप पुर्ण केलेले दुकानदार यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला. निवासी नायब तहसिलदार सोमनाथ साळुंखे यांनी आभार मानले. महसूल सप्ताह अंतर्गत पाणंद शिव रस्त्याची मोजणी करून तालुक्यातील धायटी, चिंचोली व डोंगरगांव येथे दि.३ व ४ ऑगस्ट रोजी मंगळवेढा उपविभागीय अधिकारी बी.आर.माळी, सांगोला तहसीलदार संतोष कणसे यांचे उपस्थितीत दुतर्फा ११२ वृक्षारोपण करण्यात आले.



### स्पर्धा परीक्षेमध्ये संयम अन् सातत्य गरजेचे : मयूर राजमाने

**पंढरपूर, दि.,६ ऑगस्ट -**

स्पर्धा परिक्षा देताना संयम आणि सातत्य गरजेचे आहे. त्यातूनच स्पर्धा परिक्षेत यश मिळवणे सोपे जाते असे प्रतिपादन पृथ्वी अकॅडमी कराडचे संचालक मयूर राजमाने यांनी सांगितले. येथील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात 'स्पर्धा परीक्षा मार्फत उपलब्ध संधी' या विषयावर पृथ्वी अकॅडमी कराडचे संचालक मयूर राजमाने यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांच्या हस्ते मयूर राजमाने यांचे स्वागत करून झाले. प्रारंभी उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी यांनी स्पर्धा परीक्षा सेलमार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. व्याख्यानात मयूर राजमाने यांनी राज्यसेवा, लोकसेवा आयोग व सरळ सेवा अंतर्गत मिळू शकणाऱ्या संधींबाबत सखोल माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना यावरही त्यांनी मार्मिक भाष्य करत विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. व्याख्यानाचा लाभ महाविद्यालयातील ५९० हून अधिक विद्यार्थ्यांनी घेतला. स्पर्धा परीक्षा सेलच्या माध्यमातून दर शनिवार व रविवार इच्छुक विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण दिवस मार्गदर्शन सत्र व अभ्यास वर्ग घेतले जातात. स्पर्धा परीक्षा सेल प्रमुख प्रा. अभिजीत सवासे, डॉ. अतुल आराध्ये, प्रा. अजित करांडे, प्रा. नागनाथ खांडेकर, प्रा. उदयकुमार फुले, प्रा. सिद्धेश पवार, प्रा. सिद्धेश्वर गणगोंडा यांचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन सानिका बाबर यांनी केले.

### निराधार व श्रावणबाळ योजनेची कामे मार्गी; महसूल दिनानिमित्त घरभेट कार्यक्रम

**पंढरपूर, दि. ६ ऑगस्ट-**

संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेचे एकूण ७० प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. संबंधित लाभार्थी यांना मंजूरी आदेश देण्यात आले आहेत. तसेच ५५ लाभार्थ्यांचे आधार प्रमाणिकीकरण करण्यात आले आहे. ग्राम महसूल अधिकारी यांनी गावनिहाय गृहभेटी देवून ४७५ लाभार्थ्यांना प्रलंबित डिबीटी चे कामकाज पूर्ण करुन घेण्याबाबत सांगण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली आहे. महसूल विभागामार्फत राज्यात दि.१ ऑगस्ट रोजी महसूल दिन व दि.१ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्यानुसार मंगळवार दि.५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील डिबीटी न झालेल्या लाभार्थ्यांची घरभेटी देऊन डीबीटी करुन घेणे बाबत सूचित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने तहसिल कार्यालय पंढरपूर अंतर्गत संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेचे डिबीटीव्दारे अनुदान वितरीत न झालेले व आधार प्रमाणित न झालेल्या लाभार्थ्यांची गावनिहाय यादी संबंधित गावचे ग्राम महसूल अधिकारी यांना देण्यात आली आहे. संबंधित ग्राम महसूल अधिकारी व ग्रामसेवक यांनी सदरची यादी प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालये व महत्वाच्या ठिकाणी प्रसिध्द करून संबंधित लाभार्थ्यांची घरभेटी करून संबंधित लाभार्थी यांचे आधारकार्ड, बँक पासबुक झेरॉक्स, रेशनकार्ड झेरॉक्स, आधारला लिंक असलेला मोबाईल क्रमांक, दिव्यांग असलेस दिव्यांग प्रमाणपत्र, विधवा असलेस पतीचे मयत प्रमाणपत्र तसेच इनॲक्टीव्ह आधारकार्ड पुनर्जीवित करण्याबाबत सुचना संबंधति लाभार्थ्यांना दिल्या आहेत.

### गळोरगीमध्ये अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**अक्कलकोट, दि. ६ ऑगस्ट-**

गळोरगी येथे मातंग समाज तरूण मंडळ व एबी एस ग्रुप यांच्या संयुक्त विद्यामाने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ वी जयंती साजरा करण्यात आली. याप्रसंगी लोकशाहीर)अण्णाभाऊ साठे प्रतिमेचे पूजन वहीदबाशा शेख,संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती दुधनी,) लहुजी वस्ताद साळवे प्रतिमेचे पूजन गावचे सरपंच, संतोष कौटगी बाबु जगजिवनराम प्रतिमेचे पूजन बाळासाहेब पाटील माजी तंटामुक्त अध्यक्ष,यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष कैलासभाऊ पाटोळे, उपाध्यक्ष महादेवभाऊ पाटोळे, चंद्रकांत प्रचडे, संतोष जमादार ग्रामपंचायत ऑपरेटर, शंकर बनसोडे ग्रामपंचायत सदस्य, राहुल बगले ग्रामपंचायत कर्मचारी, चंद्रकांत अंदोडगी, ईरणा पुजारी, मोनप्पा हतरकी युवा नेता, प्रभुलिंग बिराजदार, अजय बिराजदार,धानलिंग वाघमारे,समर्थ बनसोडे युवा नेता,बिरप्पा अळगी, कैलास अळगी, सिद्धाराम पुजारी, सिदण्णा बिराजदार मलकप्पा पाटोळे, गौरीशंकर बिराजदार, अविनाश बिराजदार, संतोष हरवाळकर, भोगेश अळगी, अक्षय जाधव, मौलाली नदाफ, संतोष बगले उपस्थित होते.

# मोहोळचा कन्या प्रशाला चौक ठरतोय अपघाताचा स्पॉट

### उड्डाणपुलावरून वाहतूक वळवण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा । गुरुराज कुलकर्णी**
**वाळूज, दि. ६ ऑगस्ट-**

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील मोहोळ शहरातील कन्या प्रशाला चौक पुन्हा अपघाताचा ब्लॅक स्पॉट ठरतोय.

शहरातून जाणाऱ्या या राष्ट्रीय महामार्गाचे २००८ मध्ये चौपदरीकरण करण्यात आले. शहराची दोन भागात राष्ट्रीय महामार्गामुळे विभागणी झाली आहे, शहरातील कन्या प्रशाला चौकालगतच पाच शाळा आहेत. १० ते १२ गावांना - शहराला जोडणारा प्रमुख चौक आहे. ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांची नागरिकांची संख्याही जास्त आहे. सर्व्हिस रस्त्यावरून सोलापूरच्या दिशेने जाणाऱ्या सर्व वाहनांना बाजार समितीच्या गेट समोर पुलाला जोडणारा मार्ग गेल्या वर्षभरापासून बंद करण्यात आला आहे. त्यामुळे सर्व वाहने सर्व्हिस रस्त्याने कन्या प्रशाला चौकातून पुढे जाऊन सोलापूर रस्त्याला मार्गक्रमण करत आहेत. शहरी वसाहत, विविध शाळा, दोन्ही बाजुला व्यापारी दुकाने, रस्ते दुभाजकाची कमी जागा व दोन्ही बाजूने अरुंद सर्विस रस्ता, नविन गटारी बांधताना पडलेले खड्डे, गटारीचे लोखंडी बार आडवे असल्याने गटारींना भगदाड पडलेले आहेत. यामुळे दोन्ही बाजूच्या वाहतुकीस प्रचंड अडथळा निर्माण होत आहे.

कन्या प्रशालेजवळून हायवे ओलांडणे म्हणजे मृत्यूला सामोरे जाणे, अशी भीती निर्माण झाली होती. या ठिकाणी अपघात रोखण्यासाठी कन्या प्रशाला चौकामध्ये भुयारी मार्गाची मागणी केली होती. त्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाने भुयारी मार्ग केला वाहतूक चालू झाली आहे. मात्र या चौकातून सर्विस रोडने सोलापूरकडे जाणारे बसेस, मोठी वाहने, अवजड वाहने यांची वर्दळ वाढली असून त्यामुळे सर्विस रोडवर अपघातांची परिस्थिती निर्माण झाली आहे. जाणाऱ्या-येणाऱ्या दोन्ही वाहनांच्या रांगा सर्व्हिस रस्त्यावर लागत आहेत. पुन्हा पहिल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. एखादा मोठा अपघात झाल्यानंतरच उपाययोजना होणार का? असा प्रश्न निर्माण होत आहे. नव्याने केलेल्या फ्लाय ओव्हर ब्रिजला जाताना येताना दोन्ही बाजुला बाजार समिती समोरील व हॉटेल शुभम समोरील रस्ता दुभाजक काढून रस्ता पूर्ववत करावा त्या मार्गातून ही वाहने फ्लाओव्हरवर प्रवेश करून मार्गस्थ होतील त्यामुळे कन्या प्रशाला चौकातील वाहनांची गर्दी कमी होणार आहे, परंतु राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकाऱ्यांनी आडमुठी भूमिकी घेत कृषी उत्पन्न बाजार समिती समोरील महामार्गावर जाणाऱ्या रस्त्याला दुभाजक बसवून तो रस्ता बंद केला त्यामुळे मोहोळ येथील कन्या प्रशाला चौकात पूर्वीप्रमाणे वाहतुकीची कोंडी होत आहे. ही कोंडी दूर करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने त्वरित उपाययोजना करून वाहतूक उड्डाणपुलावरून वळवण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.



> जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या माध्यमातून हा विषय मांडण्यासाठी प्रयत्न करू. विद्यार्थी व नागरिकांची सुरक्षितता महत्त्वाची आहे.
> **- प्रीतम यावलकर, अप्पर पोलिस अधीक्षक**

> बाजार समिती समोरील व हॉटेल शुभम समोरील रस्ता दुभाजक काढून रस्ता पूर्ववत करावा, राष्ट्रीय महामार्ग व पोलिस प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे त्या चौकात मोठी वाहतुकीची कोंडी होत आहे. एखादा मोठा अपघात झाल्यास कोण जबाबदार? यासंदर्भात रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत हा विषय मांडावा, यासंदर्भात तत्काळ प्रशासनाने नागरिकांच्या उपस्थितीत बैठक लावून हा विषय मार्गी लावावा. अशी मागणी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे
> **-दशरथ काळे, भाजप मा.तालुकाध्यक्ष**

> मी तसेच पोलिस प्रशासनाने त्याठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली आहे. अपघाताच्या दृष्टिकोनातून तो रस्ता बंद करण्यात आला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या रस्ता सुरक्षा समितीने निर्णय घेऊन जर आम्हाला सांगितले तर तो रस्ता आम्ही मोकळा करून देऊ, समितीच्या परवानगीशिवाय आम्ही तो रस्ता सुरू केला व भविष्यात अपघात झाला तर आमच्यावर जबाबदारी येते.
> **- राकेश जवादे, महाप्रबंधक, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण**

## रिपाइंतर्फे मंत्री शिरसाठ यांना मागण्यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ६ ऑगस्ट-**



सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट माळशिरस तालुक्याच्या दौऱ्यावर आले असता रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुक्याच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी अकलूज येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतीगृहासाठी जागा उपलब्ध करून सुसज्ज इमारत उभी करावी या विषयासाठी माजी आमदार राम सातपुते यांच्या प्रयत्नामुळे वसतीगृहाचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना समाज कल्याण आयुक्त सोनवले मॅडम यांना केल्या. दरम्यान दलित आदिवासींवर होणारे अन्याय अत्याचाराचे प्रमाण रोखण्यासाठी एससी, एसटी अत्याचार प्रबंधक कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी, शेतकऱ्यांचे कर्ज माफ करावे तसेच महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळासह सर्वच मागासवर्गीय महामंडळाची कर्ज माफ करावीत, सामाजिक कार्यकर्त्यांना विशेष कार्यकारी अधिकारीपदी नेमणूक देणार असल्याबाबतचा महाराष्ट्र शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करावी,मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक मॅट्रिकोत्तर व महाविद्यालय शिष्यवृत्ती वेळेत द्यावी, दलित आदिवासी समाजाच्या सामाजिक उत्थानासाठी असलेला निधी इतरत्र वळवू नये, यासाठी बजेटचा कायदा करावा, वेळापूर गाव पालखी मार्ग महामार्गावरील असल्याने या ठिकाणी सुसज्ज बस स्थानक करावे,वेळापूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रामीण रुग्णालय मध्ये रूपांतर करावे, वेळापूर पोलीस स्टेशन साठी पोलीस वसाहत करावी, लंपी आजारामुळे मृत पावलेल्या गाईंना पूर्वीप्रमाणे अनुदान मिळावे, बाधित जनावरांवरती मोफत उपचार करावेत, इत्यादी मागण्यांचे निवेदन मंत्री महोदय शिरसाठ यांना देण्यात आले. यावेळी माजी आमदार राम सातपुते, जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, पश्चिम महाराष्ट्र संघटक एस.एम.गायकवाड,युवक आघाडी राज्य उपाध्यक्ष किरण धाईंजे,तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, युवक तालुका अध्यक्ष दशरथ नवगिरे,सरचिटणीस प्रवीण साळवे,तालुका कोषाध्यक्ष-समीर सोरटे,तालुका उपाध्यक्ष संतोष कांबळे,तालुका उपाध्यक्ष दिलीप सरतापे,तालुका सचिव दादासाहेब सरतापे,युवक कार्याध्यक्ष विनोद रणदिवे,गौतम वाघंबरे प्रशांत साळवे उपस्थित होते.




## रस्ता कामांसाठी आवश्यक विकास निधी देण्याची मागणी

**खा. प्रणिती शिंदे यांनी घेतली मंत्री गडकरी यांची भेट**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.६ ऑगस्ट-**

श्रीक्षेत्र श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी अक्कलकोट तालुक्यात अलिकडच्या काळात देश व जगभरातील भाविक मोठ्या संख्येने येत आहेत. यामुळे तालुक्यातील महत्त्वाच्या रस्त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी आवश्यक विकास निधीची तरतूद करण्यात यावी, या मागणीसाठी अक्कलकोट काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील यांनी खासदार प्रणिती शिंदे यांच्या सहकार्याने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची दिल्ली येथे संसदभवन परिसरात भेट घेतली.

या भेटीबद्दल बोलताना मल्लिकार्जुन पाटील यांनी सांगितले की, केंद्र व राज्य शासनाच्या अधिपत्याखाली सध्या अक्कलकोट तालुक्यात रस्त्यांची कामे सुरू आहेत. ही कामे प्रगतिपथावर आहेत. पण या कामाव्यतिरिक्त आम्ही ना. गडकरी यांना सुचविलेल्या रस्ते कामांचा शासकीय दर्जा सुधारुन आवश्यक निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. तसेच तालुक्यात सध्या सुरू असलेल्या चेन्नई - सुरत ग्रीन फिल्डच्या शेतकऱ्यांना अत्यंत कमी प्रमाणात मोबदला देण्यात आला आहे. त्यांना वाढीव मोबदला देण्यात यावा, अशी मागणी केली.नामदार गडकरी यांनी मल्लिकार्जुन पाटील यांच्या निवेदनाची दखल घेत अक्कलकोट तालुक्यातील रस्ते कामासाठी सहकार्य करणार असल्याचे आश्वासन दिले. तर ग्रीन फिल्डच्या शेतकऱ्यांचा प्रश्न राज्य सरकारकडे पाठपुरावा करण्यास सांगितले. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, खासदार विशाल पाटील आदी उपस्थित होते.

## आयटीआयमध्ये सोलर टेक्निशियन अभ्यासक्रमाला मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

शासकिय आयटीआयमध्ये एनसीव्हीटी नवी दिल्ली अंतर्गत सोलर टेक्निशियन या व्यवसायाची मान्यता मिळालेली आहे. शासकिय आयटीआयमध्ये ५ व्या प्रवेश फेरी अंतर्गत या चालू वर्षापासून नव्याने सोलर टेक्निशियन हा एक वर्ष कालावधीचा कोर्स प्रवेशासाठी उपलब्ध झालेला असल्याचे महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य एस. आर. भालचिम यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

यासाठी शैक्षणिक अर्हता १० वी उत्तीर्ण असून, प्रवेशाकरिता उपलब्ध जागा २० आहेत. ऑन लाईन प्रवेश अर्ज करण्यची मुदत १० ऑगस्ट २०२५ पर्यंत आहे. प्रवेश इच्छूक उमेदवारांना अर्ज कोणत्याही ऑन लाईन स्त्रोतामधून भरता येईल. सौर उर्जेचे मुलभुत ज्ञान, सोलर पॅनलची उभारणी, सोलार सिस्टीमचे मेटेनन्स, ग्रीन एनर्जी पध्दती असे विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. सोलर टेक्निशियन व्यवसाय पुर्ण केल्यानंतर स्वतःचे सोलार इंस्टॉलेशन व्यवसाय सुरु करता येतो तसेच सोलार प्रॉडक्ट डिलरशिप,सोलार मेंटेनन्स सर्व्हिस अशा प्रकाराचे स्वयरोजगार करता येतो विद्यार्थ्यांनी खात्रीचा रोजगार किंवा स्वयरोजगार उपलब्ध होण्यासाठी आय.टि. आय.मध्ये प्रवेश घेण्याचे अवाहन प्राचार्य, शासकिय आयटिआय सोलापूर, यांनी केले आहे.

### सोमवारी पी.एम. नॅशनल ॲप्रेंटीशीप मेळावा

**सोलापूर :** जिल्ह्यामध्ये ११ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर येथे आय. टी.आय. उत्तीर्ण, १२ वी उत्तीर्ण, डिप्लोमा व पदवीधर उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांसाठी पी. एम. नॅशनल ॲप्रेंटीशीप मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व आस्थापना व पात्र प्रशिक्षणार्थी यांनी मेळाव्यास उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा.

## सांगोल्यातील 'आपुलकी'कडून गरजू महिलांना साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ६ ऑगस्ट-**

आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला या सेवाभावी संस्थेच्या वतीने शहर व तालुक्यातील ११ गरजू महिलांना उदरनिर्वाहासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याचे वाटप पत्रकार मोहन मस्के व अशोक बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले.




यावेळी ५ महिलांना शिलाई मशीन, ५ महिलांना शेळी तसेच एका महिलेला पिठाची गिरणी उदरनिर्वासाठी भेट देण्यात आली. सांगोला शहरातील ४, शिरभावी २, वाढेगाव १, लोणविरे १, अकोला १, सोनंद १, मेडशिंगी १ अशा एकूण ११ महिलांना मदत सुपूर्द करण्यात आली. यावेळी मोहन मस्के, बापूसाहेब ठोकळे, शहाजी गडहिरे यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक राजेंद्र यादव, सूत्रसंचालन प्रा.डॉ. विधिन कांबळे यांनी केले. आभार अरविंद केदार यांनी मानले. कार्यक्रमाला पत्रकार अरुण लिगाडे, सुनिल वाघमोडे यांच्यासह लाभार्थी महिला, त्यांचे नातेवाईक व प्रतिष्ठानचे सदस्य आदी उपस्थित होते.

## श्री क्षेत्र पखालपूर गणपती दर्शनासाठी बसेस सोडाव्यात; ग्राहक पंचायतीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ६ ऑगस्ट-**

प्रत्येक चतुर्थी दिवशी श्री क्षेत्र पखालपूर गणपतीच्या दर्शनासाठी बस सोडव्यात अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने पंढरपूर आगार प्रमुखाकडे केली असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

पंढरपूर शहरापासून पाच किलोमीटर अंतरावर श्री क्षेत्र पखालपूर येथे प्राचीन जागृत असे गणपतीचे मंदिर आहे. नवसाला पावणारा गणपती अशी भाविकांची श्रद्धा आहे.त्याठिकाणी प्रत्येक महिन्यात चतुर्थी दिवशी दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी असते.त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रत्येक ''चतुर्थी'' दिवशी दिवसभर तेथे जाण्या-येण्यासाठी एसटी ची सोय करण्यात येत असे. मात्र अलिकडे काही वर्षांपासून ती बससेवा बंद झालेली आहे. वास्तविक याठिकाणी जाण्या-येण्यासाठी सुरू केलेली बससेवा सुरूच ठेवणे आवश्यक होते. तथापि ती बंद आहे ही वस्तुस्थिती आहे. दरम्यान मंगळवार दि. १२/८/२०२५ रोजी ''अंगारकी चतुर्थी'' आलेली आहे. या वर्षातील हा एकमेव योग आहे त्यामुळे तेथे जाण्या-येण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होणार आहे.सर्वसामान्य भाविक,जेष्ठ नागरिक,महिलांना रिक्षाने जाणे त्यांच्याआवाक्याबाहेर आहे. रिक्षाचालक अवाजवी भाडे आकारणी करतात.त्यामुळे आपल्या प्रवाशांची,भाविकांची सोय म्हणून त्या दिवशी महामंडळाने पहाटेपासून रात्रीपर्यंत पंढरपूर-पखालपूर-पंढरपूर अशी बससेवा (फेऱ्या) सुरू ठेवावी याचा गांभीर्याने व प्राधान्याने विचार करून अंगारकी चतुर्थी दिवशी बससेवा सुरू ठेवतील अशी अपेक्षा ग्राहक पंचायतीचे प्रांत सहसचिव दीपक इरकल,जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये,तालुका संघटक महेश भोसले,उपाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, जिल्हा सदस्य अण्णा ऐतवाडकर,पांडुरंग अल्लापूरकर, संतोष उपाध्ये,तालुका सदस्य सतिश निपाणकर यांनी व्यक्त केली आहे.

# अक्कलकोट बाजार समितीतील ५२ व्यापाऱ्यांना नोटीसा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ ऑगस्ट-**

अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समितीमधील ५२ आडत व्यापाऱ्यांना दुकान गाळे बांधकाम परवानाबाबत योग्य पुरावा घेऊन नगरपालिका येथे हजर राहणेविषयी नोटीस नगरपालिका प्रशासनाकडून बजावण्यात आल्याने व्यापारी वर्गात खळबळ माजली आहे.

नुकतेच नगरपालिकेने बसस्थानकामागील ९० व्यापारी गाळेधारकांना नोटीस दिली होती. त्यानंतर येथील अनधिकृत गाळे यांच्यावर सर्वात मोठी कारवाई केली होती. यामुळे व्यापाऱ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. गुलाबरसुल अ. गफुर नदाफ यांच्या सह १५ ते २० बागवान लोकांनी अक्कलकोट कृषी उत्पन्न बाजार समिती मधील आडत व्यापाऱ्यांनी अतिक्रमण करून अनधिकृत पणे व्यापारी गाळे चालवितात . याबाबत नपा कडे लेखी तक्रार दाखल केली होती या अनुषंगाने न पा प्रशासनाने ५२ आडत व्यापाऱ्याना दुकान गाळे बांधकाम परवाना संदर्भात योग्य ते पुरावे घेऊन नपा मध्ये हजर रहावे मालकी हक्क पुरावा बांधकाम संदर्भात घेण्यात आलेली परवानगी मंजुर नकाशा बांध काम पुर्णत्वाचा दाखला सरकारी दस्ता एवज सोबत आणावे त्याची एक प्रत नपा कडे देण्यात यावी सुनावीस हजर रहावे गैरहजर राहिल्यास अथवा खबाबत योग्य पुरावे सादर न केल्यास आपले म्हणणे काही नाही असे समजुन योग्यती पुढील कार्यवाही करण्यात येईल यांची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी असे नपाकडून दिलेल्या नोटीसी मध्ये म्हणल्याने व्यापाऱ्यांमध्ये मोठी खळबळ माजली आहे. दरम्यान नगरपालिका प्रशासनाने बसस्थानक मागील ९१ व्यापारी गाळे बाबत नोटीस देऊन मोठी कारवाई केल्याने शहरातील विना परवाना बांधकाम अतिक्रमण बाबत नगर पालिका प्रशासनाकडे दाखल तक्रारीच्या संख्येत वाढ होत आहे यामुळे विना परवाना बांधकाम पार्कींग ची जागेचा इतर कारणासाठी वापर व्यवसायिक वापराच्या मालमत्ता कर चुकवेगिरी बाबत काटेकोर अंमल बजावणी केल्यास नगरपालिकेला मोठया प्रमाणात महसुल मिळू शकतो . यामुळे नागरिकानां चांगल्या सुविधा पुरविता येतील असे नपा च्या सुत्रानी बोलताना सांगितले.

> शहरातील हत्ती तलाव परिसरात रस्ते रुंदीकरण कामात अडथळा असलेली ५५ घरे बांधीत होणार आहेत . संबधिताना नोटीसी दिल्या आहेत टप्पा टप्प्याने शहरातील विना परवाना बांधकाम अतिक्रमण काढण्यात येणार आहे . घाण विहिर परिसरात नपा जागेवरील विना परवाना बांधकाम केलेली ४५ घरानां नोटीसी देण्यात आल्या आहेत . अशी माहिती मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी दिली आहे .




दैनिक सोलापूर तरूण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

प्रा. मंदार वि. परिचारक MSc MEd यांचे,

## ज्ञानप्रसाद/ब्रिलियंट अॅकॅडेमी पंढरपूर

42 वर्षांची उत्कृष्ट निकालांची विश्वासार्ह परंपरा!

## NEET JEE CET

परिक्षेसाठी पंढरपुरातील एकमेव विश्वासार्ह क्लास.

**NEET 2025**

सूरज गायकवाड 524

सौरभ लबडे 501

**JEE 2025**

7 विद्यार्थ्यांची IIT madras येथे BS data science साठी निवड.

**CET 2025**

98% पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण मिळविणारे 7 विद्यार्थी!

95% पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण मिळविणारे 18 विद्यार्थी!

90% पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण मिळविणारे 93 विद्यार्थी!

- संपर्क -

१. बेलीचा महादेव मंदिराशेजारी प्रदक्षिणा रोड, पंढरपूर

२. रुक्मिणी नगर, पाण्याच्या टाकीजवळ, पंढरपूर.



दैनिक सोलापूर तरूण भारत

दैनिक तरुण भारतच्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

प्रवेश! प्रवेश!! प्रवेश!!!

"समाजसेवा हीच ईश्वर सेवा"

श्री संत चोखोबा शिक्षण प्रसारक मंडळ हुन्नूर ता. मंगळवेढा संचलित

## प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा, हुन्नूर, तालुका मंगळवेढा

आशीर्वाद

मा. प्रशांत साळे

दलितमित्र कै. बाबासाहेब साळे

प्रशालेत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी इयत्ता १ ली ते १० वी साठी एन.टी., एस.सी., ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रवेश सुरू.

शाळेची वैशिष्ट्ये -

- निसर्ग रम्य परिसर
- तज्ञ शिक्षक वृंद
- सर्व सोयींनी युक्त प्रशस्त इमारत
- सुसज्ज ग्रंथालय
- इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षा तयारी
- परीक्षा तयारी
- प्रशस्त सांस्कृतिक हॉल
- मुलीच्या निवासाची स्वतंत्र व्यवस्था
- दर महिन्याला सराव परीक्षा
- विद्यार्थी पालकत्व योजना
- भव्य क्रीडांगण
- खेळासाठी विशेष प्रशिक्षण
- व्यक्तिमत्व विकासावर विशेष भर
- जादा तास
- रात्र अभ्यासिका
- ई- लर्निंगची सोय

श्री. पुंडलिक बाबासाहेब साळे

अध्यक्ष, श्री संत चोखोबा शिक्षण प्रसारक मंडळ हुन्नूर, तालुका मंगळवेढा

: प्रवेशासाठी संपर्क :

श्री. मायाप्पा धुलगुडे (सर) : ९७६४६४६५१८

श्री. सचिन निकम (सर) : ९९२११९४८३३५

श्री. राजाराम पाटील (सर) : ९९२३६२१२४४

श्री. शिवाजी काशीद (सर) : ८२६२८२०५४९

श्री. भाऊसो गोरड (सर) : ९८८१५११९६९१

श्री. गुरुदेव स्वामी (मुख्याध्यापक माध्यमिक आश्रमशाळा, हुन्नूर)

श्री. गोरखनाथ भोसले (मुख्याध्यापक प्राथमिक आश्रमशाळा, हुन्नूर)



मा.आप्पासाहेब पाटील-वडकबाळकर

मा.संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर

सोलापूर तरुण भारत

४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!


शुभेच्छुक

## आप्पासाहेब पाटील

मित्र परिवार, दक्षिण सोलापूर

सीना-भीमा पाणी संघर्ष समिती, दक्षिण सोलापूर

कर्मयोगी



स्व.सुधाकरपंत परिचारक मालक

सोलापूर तरुण भारत

४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!



माजी आमदार — मा.श्री.प्रशांतराव परिचारक साहेब

चेअरमन युटोपियन शुगर्स — मा.श्री.उमेशराव परिचारक साहेब

सभापती — मा.श्री.हरिषदादा भास्करराव गायकवाड

उपसभापती — मा.श्री.राजुबापू विठ्ठलराव गावडे

## आमदार मा.श्री.प्रशांतरावजी परिचारक साहेब

यांचे मार्गदर्शनाखाली चालणारी व अहोरात्र काबाड कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांच्या श्रमाचा मोबदला मिळवून देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारी महाराष्ट्रातील एक अग्रेसर संस्था

## कृषी उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर, जि.सोलापूर

या बाजारपेठेची व मार्केट यार्डाची वैशिष्टे

- ५५६ कोटींची वार्षिक उलाढाल
- कार्तिक यात्रेतील प्रसिध्द जनावरे बाजार
- शासनाच्या ई-नाम योजने अंतर्गत संपूर्ण संगणीकरणाचा मानस
- कै.वसंतरावदादा पाटील उत्कृष्ट कार्य बाजार समिती सन २०१७ व सन २०१८ पुरस्कार प्राप्त बाजार समिती
- बेदाणा व डाळींबाठी प्रसिध्द मार्केट
- ६० मे.टनी वजनकाट्याची सोय
- उघड लिलावाने विक्री आणि वजनमाप त्वरीत व चोख
- फळे, भाजीपाला, डाळींब, केळी, कांदा, भुसार, बेदाणा, विड्याची पाने व वैरण इ. यांची स्वतंत्र उघड लिलावाने विक्री

आपला शेतीमाल या बाजारपेठेत विक्रीसाठी पाठवा व आम्हास सेवेची संधी द्या!


श्री.राजुबापु विठ्ठलराव गावडे, उपसभापती

श्री.हरिषदादा भास्करराव गायकवाड, सभापती

श्री.कुमार नामदेव घोडके, सचिव

मा.सर्व सदस्य व कर्मचारी वर्ग, कृषी उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर, जि.सोलापूर




भुरळ पाडणाऱ्या पॉप-अप्सपासून सावध राहा!

स्कॅमर्स तुमची खाजगी माहिती चोरून तिचा गैरवापर करू शकतात.




आरबीआय सांगते...

स्मार्ट बना, कूल राहा

अधिक माहितीसाठी https://rbikehtahai.rbi.org.in/up वर जा

फीडबॅक देण्यासाठी rbikehtahai@rbi.org.in वर लिहा

सार्वजनिक हितार्थ जारी

भारतीय रिझर्व्ह बँक

RESERVE BANK OF INDIA

www.rbi.org.in

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






# सोलापुरात रेकॉर्ड ब्रेक पाऊस; नागरिकांचे हाल





सोलापूर : ५६ मीटर रोडवरील रेल्वेच्या नवीन पुलाखाली पाणी साचले होते. शिवाजी चौक ते मेकॅनिक चौक रस्ता जलमय झाला होता. (छाया : केवल तिवारी)

## २४ तासात पडला १०६.९ मिलिमीटर इतका पाऊस

## आश्लेषाच्या पावसाने खरिपाच्या पिकात 'आला जीव'

## शेतकऱ्यांत आनंदाचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

गेले दोन महिने दडी मारलेल्या पावसानं सोलापुरात गेल्या दोन दिवसात मात्र चांगलाच जोर धरला असून गेल्या २४ तासात सोलापूर परिसरात १०६.९ मिलिमीटर इतक्या रेकॉर्ड ब्रेक पावसाची नोंद झाली आहे. सध्याही सोलापुरात रिमझिम पाऊस सुरू आहे.

सोलापूरसह मराठवाड्यात मंगळवारी पहाटे ३ पासून आश्लेषा नक्षत्राच्या पावसानं अक्षरशः धुमाकूळ घातल्यानं खरिपाच्या पिकांना जीवदान आले. सध्या सोयाबीन हे मुख्य पीक बहरात आले आहे. त्यास पावसाची अत्यंत गरज होती आणि आश्लेषाचा निब्बर पाऊस पडला आणि खरिपाच्या पिकांत जीव आला. दरम्यान, मे महिन्यात २३० मिलीमीटर पाऊस पडल्यानंतर जून-जुलै महिन्यात पावसाने दडी मारली होती. आता ऑगस्टमध्ये पुन्हा पावसाने सुरूवात केली असून, जून ते आजतागायत सरासरी टक्केवारी ८१.३ टक्के इतकी आहे.

### आजतागायत शहर, तालुकानिहाय पाऊस

जून ते आजतागायत तालुकानिहाय पाऊस पाहता उत्तर सोलापूर २५५.४ मिलीमीटर, दक्षिण सोलापूर २९२.२, बार्शी १८८.४, अक्कलकोट २४८.१, मोहोळ १८२.१, माढा १५०.५, करमाळा १०५.८, पंढरपूर १३३.०, सांगोला १४६.४, माळशिरस १३८.७, मंगळवेढा १६३.९ मिलीमीटर इतका पाऊस झाला आणि जिल्हाभरात १७७.३ मिमी इतका पाऊस झाला.

शहर, जिल्ह्यात मध्यरात्रीपासून मुसळधार पावसाची दमदार एन्ट्री झाली असून रात्रभर पाऊस पडल्यानंतर शहरात सकाळी पावसाची रिपरिप सुरु होती. शहरातील कारंबा नाका परिसरात सतत पडणाऱ्या पावसामुळे रस्त्यावरील पाणीच पाणी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून निचरा करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू होते. रस्त्यावरील पाण्यामुळे नागरिकांना चालत जाण्यासाठी व वाहनेही काढण्यासाठी बुधवारी सकाळी तारेवरची कसरत करावी लागत होती. बुधवार पेठ परिसरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नगर, जय मल्हार चौक येथील मंगल अशोक रणदिवे यांचे घर कोसळले आहे. मे महिन्यात पावसानं जोरदार बँटिंग केली होती. काळजापूर मारुती मंदिरात देखील मोठ्या प्रमाणात पाणी साचलं. पाण्यातून वाट काढतचं भक्तगणांना दर्शन घ्यावं लागलं. काही ठिकाणी घरं आणि झाडं पडली आहते. निर्मलकुमार फडकुले सभागृहाशेजारी, फुटपाथवरील मोठं झाड बुधवारी सकाळी शेजारी असलेल्या एका हॉटेलवर उन्मळून पडलं. दुसरीकडं साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नगर, जय मल्हार चौक इथल्या रहिवाशी मंगलबाई अशोक रणदिवे यांचं घर जोरदार पावसामुळं कोसळलं, त्यामुळं संसार उपयोगी साहित्याचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. उत्तर सोलापूर तालुक्यातील बीबीदारफळ इथला तलाव जोरदार पावसामुळं ओव्हर फ्लो झाल्यानं पाणीचं पाणी अशी स्थिती दिसून आली.

### जय मल्हार चौक येथील घर ढासळले

बुधवार पेठ परिसरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नगर, जय मल्हार चौक येथील घर ढासळले. या दुर्घटनेत त्यांच्या घरातील सर्व संसारोपयोगी वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या परिसरात राहणाऱ्या मंगलबाई अशोक रणदिवे यांचे घर पावसामुळे पूर्णपणे ढासळले. या दुर्घटनेत त्यांच्या घरातील सर्व संसारोपयोगी वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कपडे, भांडी, अन्नधान्य, इलेक्ट्रॉनिक वस्तू अशा अनेक साहित्याचे नुकसान झाले आहे.सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी आर्थिक नुकसानीने कुटुंब संकटात सापडले आहे. तसेच महापालिकेचे संबंधित अधिकारीही घटनास्थळी पोहोचले. त्यांनी परिस्थितीची पाहणी करून प्रशासनाच्या वतीने आवश्यक मदत केली जाईल, असे सांगितले.

### बाळे येथील ढेपे शाळेत, संतोषनगर, तोडकर वस्तीतील ८० घरे जलमय





बाळे परिसरात जनजीवन विस्कळीत झाले असून, विशेषतः डेपो शाळेच्या आवारात पाणी साचल्यामुळे दोन दिवस विद्यार्थ्यांना सक्तीची सुट्टी जाहीर करावी लागली. पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्यामुळे संपूर्ण आवार जलमय झाले आहे. संतोषनगर व तोडकर वस्ती या भागांमध्ये जवळपास ८० घरे पाण्याखाली गेली असून, काही घरांत ड्रेनेजचे घाण पाणी शिरल्याचे पाहायला मिळाले. नागरिकांच्या तक्रारीनुसार, गेल्या अनेक दिवसांपासून नालेसफाई न झाल्यामुळे ही गंभीर स्थिती निर्माण झाली आहे. संतोषनगरमधील अनेक कुटुंबांना रात्री घराबाहेर पडून सुरक्षित स्थळी आसरा घ्यावा लागला. घरातील साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. बार्शी रोड परिसरातही पावसाचे पाणी साचून अनेक रस्ते तळ्याचे स्वरूप धारण करत आहेत. वाहतुकीवर परिणाम झाला असून काही ठिकाणी वाहने बंद पडली आहेत. स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष आणि वेळेवर उपाययोजना न केल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.बाळे आदीला नदी येथे मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह वाढला असून राष्ट्रीय महामार्गावरील ब्रिज खाली सर्विस रस्त्याचे काम चालू असल्याने या ठिकाणी मोठ्या प्रमाणात बांधकाम साहित्य व आजोरा पडला असल्याने पाण्याचा प्रवाहास अडथळा निर्माण होत आहे. महानगरपालिका कडून अर्धवट रित्या नालेसफाई व खोलीकरण काम करण्यात आले असून बाळे येथे पूर जन्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. परिसरातील नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या संदर्भात माजी नगरसेवक गणेश पुजारी यांनी या ठिकाणी भेट देऊन महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, नगर अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिकारी तसेच सर्विस रोडचे काम करणारे शिंदे मक्तेदार यांना सदर ठिकाणची अडचण दुर करण्यासंदर्भात सूचना केल्या आहेत.

दैनिक सोलापूर तरूण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर

मबाक विभागाअंतर्गत ग्रामीण भागातील महिला व मुली यांचे सक्षमीकरण तसेच त्यांच्या आर्थिक उन्तीसाठी व्यवसायभिमुख योजना, खालील प्रमाणे आहेत.

**जिल्हा परिषद सेस योजना सन २०२५-२६ मधील योजना**

| गट अ | | गट ब | |
|---|---|---|---|
| 1 | इयत्ता ७ वी ते १२ वी पास मुलींना एम.एस.सी.या. टी. प्रशिक्षण देणे | 1 | महिलांना पिकोफॉल मशिन पुरवणे |
| 2 | १० पास मुलींना टॅली संगणक प्रशिक्षण देणे | | |
| 3 | मुलींना स्वसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षण देणे | | |
| 4 | महिलांना समुपदेशन केंद्र | 2 | महिलांना पिठाची गिरणी / मिरची कांडप यंत्र पुरवणे |
| 5 | मुलींना उच्च शिक्षणासाठी आर्थीक मदत करणे | | |

**विशेष घटक योजना सन २०२५-२६ मधील योजना**

| गट अ | | गट ब | |
|---|---|---|---|
| 1 | इयत्ता ७ वी ते १२ वी पास मुलींना एम.एस.सी.या. टी. प्रशिक्षण देणे | 1 | महिलांना पिकोफॉल मशिन पुरवणे |
| 2 | १० पास मुलींना टॅली संगणक प्रशिक्षण देणे | 2 | महिलांना पिठाची गिरणी / मिरची कांडप यंत्र पुरवणे |

**वरील प्रमाणे योजनाकरिताप्रमाणे सर्व साधारण अटी व शर्थी आहेत.**

१. लाभार्थी ग्रामीण भागातील रहिवासी असावी.
२. उत्पन्न रु.१,२०,००० आत असलेले तहसीलदार यांचा दाखला
३. टॅली करीता इ.१० वी पास असणे आवश्यक
४. संगणक व टॅली प्रशिक्षणासाठी लाभार्थ्यांनी शाळेचा / महाविद्यालयाचा बोनाफाईड अथवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा गुण पत्रक जोडणे आवश्यक राहील.
५. लाभार्थ्याने यापुर्वी सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
६. लाभार्थ्यांनीने आधारकार्डची नोंदणी कार्डाची झेरॉक्स प्रत सोबत जोडणे आवश्यक असेल
७. उच्च शिक्षणासाठी १८ वर्षा खालील मुलांना व मुलींना आर्थिक मदतीकरीता मुलांना व मुलींना इ.१० वी व १२ वी मध्ये किमान ८५% गुण प्राप्त करणे आवश्यक व उच्च शिक्षणासाठी कोणत्याही क्षेत्रातील म्हणजे कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय शाखेत प्रवेश घेतलेले प्रमाणपत्र.
८. वैयक्तिक लाभाच्या योजनामध्ये लाभार्थी हिस्सा १०% भरणे आवश्यक आहे.
९. विशेष घटक योजना ही अनु. जातीच्या लाभार्थ्यांनसाठी असल्याने त्यांचेकडील जातीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
१०. महिलासाठी समुपदेशन केंद्र चालविणेत येत असून कुटुंबातील मारहाण, लैंगिक छळ व इतर तन्हेने त्रासलेल्या व मानसिक दृष्ट्या असंतुलित महिलांच्या सामाजिक मानशास्त्रीय दृष्ट्या खचलेल्या महिला करिता कायदेशीर दृष्टीने समुपदेशन केले जाते.
११. लेक लाडकी योजना अंतर्गत दि. ०१/०४/२०२३ नंतर जन्मलेल्या मुलींना लेक लाडकी योजना अंतर्गत आर्थीक सहाय्य दिले जाते.

उपरोक्त नमुद तक्त्यामधील अ व ब गटांच्या योजनांचे अर्ज हे ऑलाईन पध्दतीने https://wcdzpsolapurportal.in या वेब साईट वरुन भरण्यात यावेत. तसेच अधिक माहितीसाठी गट विकास अधिकारी पंचायत समिती / बाल विकास प्रकल्प अधिकारी ग्रामीण यांच्याशी संपर्क करावा.

**योजनेचा अर्ज भरणे करीता बाजूचा क्युआर कोड वापरावा.**

**जिल्हा कार्यक्रम अधिकारी (म.व बा.वि.)**
**जिल्हा परिषद सोलापूर**



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## श्रीमद्भागवत कथेतील मंगलाचरणाचे तत्त्वज्ञान : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**बार्शी दि. ऑगस्ट**

श्रीमद्भागवत कथा ही केवळ नामसंकीर्तन नव्हे, तर त्यामध्ये चिंतन, मनन आणि तत्त्वज्ञानही दडलेले आहे. ही कथा श्रवण करताना, काही तात्त्विक तत्त्वांचे आचरण करणे अनिवार्य असते, असे मौलिक मार्गदर्शन श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी श्रावणमास प्रवचनमालेच्या बाराव्या सत्रात केले. श्री भगवंत मंदिरामध्ये 'श्रीमद्भागवत कथा चिंतन' या विषयावर त्यांनी भावपूर्ण निरुपण केले. या प्रवचनमालेत त्यांनी आतापर्यंत सहा अध्यायांतून श्रीमद्भागवत कथेचे महात्म्य अत्यंत रसाळ पद्धतीने आणि भावपूर्णतेने श्रोत्यांपर्यंत पोहोचवले आहे. एकादशीच्या पावन पर्वावर त्यांनी श्रीमद्भागवत कथेच्या नव्या टप्प्याचा प्रारंभ मंगलाचरणाने केला. भागवत कथेतील एकूण १८,००० श्लोकांपैकी प्रारंभीचा श्लोक सर्वात महत्त्वाचा मानला जातो. या एका श्लोकात संपूर्ण कथेचे सार सामावलेले असून, तो संपूर्ण भागवत तत्त्वज्ञानाचे प्रतिनिधित्व करतो, असे स्पष्ट करत डॉ. महाराज सांगतात की, 'मंगलाचरणातच अखंड भगवदतत्त्व सामावलेले असते.' 'मंगल' म्हणजे असे वर्णन, ज्यामुळे इष्ट फलाची प्राप्ती होते. कार्य विघ्नरहित आणि



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - १२

पूर्णत्वास पोहोचण्यासाठी जे कर्तव्य पार पाडले जाते, त्याला मंगल असे म्हणतात. या मंगलाचे तीन प्रकार असून, ते म्हणजे आशीर्वादरुप मंगल, नमस्काररुप मंगल आणि वस्तुनिर्देशरुप मंगल. शिष्याच्या कल्याणासाठी भगवंताला करण्यात येणारी प्रार्थना म्हणजे आशीर्वादरुप मंगल. नम्रतेने स्वतःला लीन करुन इतरांमध्ये परमोत्कर्ष मानणे, ही भावना नमस्काररुप मंगलात दिसते. आणि भगवंताचे यथार्थ स्वरुप वर्णन करणारे मंगल म्हणजे वस्तुनिर्देशरुप मंगल, जे अलौकिक मानले गेले आहे. महर्षी व्यास याच विचारांची पावती देताना म्हणतात- 'सत्यम् परम धीमहि', म्हणजेच अखंड मंगल असे भगवद् स्वरुपच होय. या मंगल भावनेतून उद्भवणाऱ्या विविध कृतींवर चिंतन करताना डॉ. महाराजांनी जीवनातील विविध घटनांचे चार प्रकारांमध्ये विवेचन केले आहे- ज्या काही वेळा मंगल म्हणून आरंभ होतात पण शेवटी अमंगल ठरतात, काही घटनांचा आरंभ अमंगल वाटतो पण परिणामी मंगल होतो, काहींचा आरंभ व शेवटही अमंगलच असतो आणि काही घटनांचा आरंभही मंगल असतो आणि परिणामही. उदाहरणार्थ, कौरवांच्या आयुष्यातील वैभवाचा आरंभ पाहिला असता त्यांना राज्य, सत्ता, संपत्ती प्राप्त झाली होती, पण धर्मबुद्धी अभावामुळे त्यांचा अहंकार, द्वेष आणि अधर्माचा मार्ग त्यांना विनाशाकडे घेऊन गेला. येथे आरंभ मंगल वाटला, पण परिणाम मात्र अमंगल ठरला. त्याच्या उलट, भक्त प्रल्हादच्या जीवनाकडे पाहिले असता, त्याला वडिलांनी त्रास दिला, अनेक संकटांत टाकले, त्यामुळे त्याचे जीवन आरंभी अमंगल वाटले. पण भक्तीची ताकद एवढी प्रभावी होती की अखेर प्रभू नारायण प्रकट झाले आणि प्रल्हादाला विजय प्राप्त झाला. रावणाने सीतेचे अपहरण केले, हा कृतीचा आरंभच अधर्माचा असल्याने अमंगल होता आणि त्याचा परिणामही विनाश आणि पतन यातच झाला. हे स्पष्ट उदाहरण आहे की, अधार्मिक कर्माचे फल कधीही मंगल होऊ शकत नाही. याच्या अगदी विरुद्ध, श्रीरामांनी वनवासाचा निर्णय धर्मपालन म्हणून शांतपणे स्वीकारला. हा आरंभ जरी त्यागमय होता, तरी तो मंगल भावनेतून प्रेरित होता. या निर्णयातूनच राक्षसांचा संहार झाला, सीतेची मुक्ती झाली आणि अयोध्येचा सिंहासनारुढ राम राज्याचा सुवर्णकाळ पुन्हा उजाडला. येथे आरंभही मंगल आणि परिणाम ही मंगल. या उदाहरणांमधून एक गोष्ट स्पष्ट होते- जो निर्णय धर्मबुद्धीने, नम्रतेने आणि निःस्वार्थपणे घेतला जातो, तो नक्कीच शुभ फलदायी ठरतो. श्रीमद्भागवत कथा म्हणजे केवळ एक ऐकण्यासारखी गोष्ट नाही, तर ती जीवनाला दिशा देणारे मार्गदर्शन आहे. तिच्या श्रवणातून केवळ भक्तीच नव्हे, तर विवेक, धर्म, आणि मंगल कर्माचे तत्त्वज्ञानही अंत:करणात प्रकट होते. असे मार्गदर्शन डॉ. जयवंत महाराज या सत्रात शेवटी करतात.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. ७ ऑगस्ट २०२५ | संत नरहरी सोनार जयंती, |
| विक्रम संवत् २०८२ | भगवान श्री जिव्हेश्वर जयंती, |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. त्रयोदशी (१४.२७) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पूर्वाषाढा (१४.००) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - निष्कंभ (०६.४१) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (२६.२४) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** अंगिकृत कार्यात मनासारखी प्रगती साधता येईल. आर्थिक गुंतवणूक योग्य प्रकारे करावी. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे.

**वृषभ :** उत्साहवर्धक घटना घडतील. गृहसजावट, गृहबांधणी अशा व्यवसायात मनासारखी प्रगती होईल.

**मिथुन:** कितीही योजना करा, वेळेला जे हवे आहे तेच होत असते. धनस्थ मंगळामुळे आर्थिक बाबतीत विशेष जागरूक रहावे.

**कर्क:** घाईने निर्णय नको रूप आणि रूपया यावर कधीच गर्व नाही करायचा. गरीबी, आजार कधीच सांगून येत नाही.

**सिंह :** नवीन योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी. डोळ्याच्या तक्रारी संभवतात. काळजी घ्यावी.

**कन्या :** वैद्यकिय, कृषि क्षेत्रात मनासारखी प्रगती होत जाईल. कौटुंबिक जीवनातील समस्या विचाराने, सामंजस्याने सोडवाव्यात.

**तुळ :** आत्मविश्वास वाढविणाऱ्या घटना घडतील. कला-गुणांच्या प्रगतीसाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे. नव्या संधीचे स्वागत करावे.

**वृश्चिक :** कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या योजना विशेष लाभदायक ठरतील. महत्त्वाची कामे करून घ्यावीत.

**धनु :** कार्यक्षेत्रात अधिक विचाराने रहावे. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. स्थावर बाबतीत शुभ घटना घडतील.

**मकर :** नव्या योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात कला-गुणांचा विकास होत जाईल. जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहिल.

**कुंभ :** उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या कामांना गती मिळेल. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. अपेक्षित संधी लाभतील.

**मीन:** व्यवसायात विचाराने रहावे. सरकारी कामे करून घ्यावीत. यश मिळेल.

# १ हजार १२३ मतदान यंत्र सुस्थितीत

## महापालिकेत ईव्हीएमची प्राथमिक तपासणी; २८ युनिटमध्ये आढळला बिघाड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

सोलापूर महापालिका मास्टर ट्रेनर कडून महापालिकेतील मतदान यंत्राची प्राथमिक स्तरावरील तपासणी पूर्ण झाली आहे. एकूण १२१८ कंट्रोल युनिटपैकी ११२३ कंट्रोल युनिट सुस्थितीत आहेत. ८७ कंट्रोल युनिट युनिटमध्ये बिघाड आढळून आला. २२८४ बॅलेट युनिटपैकी २२५६ चांगले तर २८ युनिटमध्ये बिघाड दिसून आला. निवडणूक आयोगाला या संदर्भात अहवाल सादर करण्यात येणार आहे.





राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सोलापूर महापालिकेच्या गोदामातील मतदान यंत्रांचे प्राथमिक स्तरावरील तपासणी प्रक्रिया हाती घेण्यात आली होती. सुमारे ३० कनिष्ठ अभियंता ही पडताळणी केली. सोलापूर महापालिकेच्या गोदामात एकूण कंट्रोल १२१८ यूनिट २२८४ बॅलेट यूनिट उपलब्ध आहेत. प्राथमिक स्तरावरील तपासणीमध्ये यापैकी ११२३ कंट्रोल युनिट सुस्थितीत आणि ८७ कंट्रोल युनिट युनिटमध्ये बिघाड आहे. बॅलेट युनिटपैकी २२५६ चांगले तर २८ युनिटमध्ये बिघाड दिसून आला आहे. सोलापूर महापालिका प्रशासनाने आपल्या कडील ईव्हीएम मशीनची तपासणी पूर्ण केली. महापालिकेच्या गोदामात एकूण कंट्रोल १२१८ यूनिट २२८४ बॅलेट यूनिट आहेत. काही यंत्रांमध्ये बिघाड दिसून आला. निवडणुकीसाठी जादा यंत्रांच्या मागणीचा अहवाल निवडणूक आयोगाला सादर होणार आहे. त्यानुसार महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सहायक आयुक्त गिरीश पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली उपअभियंता तपन डंके यांच्या नियंत्रणाखाली निवडणूक विभागाचे अधीक्षक ओमप्रकाश वाघमारे यांच्या माध्यमातून पडताळणी केली आहे. याचा अहवाल नियंत्रण अधिकारी तपन डंके यांनी अतिरिक्त आयुक्त कारंजे यांना सादर केला आहे. यासाठी उपअभियंता अविनाश वाघमारे, दीपक रजपूत, किशोर तळीखेडे, बाबानगरे, नादरगी यांनी परिश्रम घेतले आहेत. दरम्यान, महापालिकेची प्रभाग रचना २०११ च्या जनगणनेनुसार होणार आहे. मात्र, मतदारसंख्या वाढलेली आहे. त्यामुळे जादा मतदान यंत्रांची मागणी आयोगाकडे नोंदविण्यात येणार आहे.



## रोटरी क्लबतर्फे सलगर येथे करिअर मार्गदर्शन

**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

ग्रामीण भागातील राहणाऱ्या विद्यार्थी शिक्षण आणि युवक विकासासाठी रोटरी क्लब ऑफ सोलापूर स्मार्ट सिटी हे नेहमी सातत्याने कार्यरत असते. याचाच एक भाग म्हणून सलगर बुद्रुक येथील विद्या मंदिर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन सत्र क्लबचे अध्यक्ष रोटेरियन अकबर नदाफ यशस्वीरीत्या आयोजन करून मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना भविष्यातील शैक्षणिक आणि व्यावसायिक संधींबाबत समर्पक व प्रेरणादायी माहिती देण्यात आली. या सत्रात रोटे. नदाफ यांनी कलाशाखा, वाणिज्य, विज्ञान, डिप्लोमा इन इंजिनीअरिंग आणि व्यावसायिक अभ्यासक्रम यासारख्या विविध पर्यायांची माहिती दिली. कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य अशोक जाधव यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. प्रा. विश्वनाथ ढेपे यांनी रोटरी क्लबचे तर भारत कदम यांनी सर्वांचे आभार मानले.



## गणेश पिरॅमिड येथे एक दिवसीय ध्यान शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

पिरॅमिड ध्यान ही एक वैज्ञानिक आणि अनुभवसिद्ध ध्यान पद्धती आहे, ज्यामध्ये पिरॅमिडद्वारे प्रचंड प्रमाणात वैश्विक ऊर्जा प्राप्त होते. याच ऊर्जेचा अनुभव घेण्यासाठी दि. ३ ऑगस्ट रोजी नवीन यशोधरा हॉस्पिटलच्या पाठीमागे सागर चौक, हैदराबाद रोड, येथील श्री गणेश पिरॅमिड ध्यान मंदिरात एक दिवसीय निवासी ध्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम दि. सोलापूर पिरॅमिड स्पिरिच्युअल ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास ९० ध्यान मास्टर यांची उपस्थिती होती व सर्वांसाठी महाप्रसादची सोय केली होती.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. या उद्घाटन सोहळ्यास अध्यक्ष पूर्णचंद्र राव, चंद्रशेखर रेड्डी, अलगोंडा पाटील, रमेश शिंदे, रोहित वंगारी, ओंकारेश्वर उटगे, नेहा मिरजगावकर व स्मिता दुधनकर आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिरात स्मिता दुधनकर यांचे 'भावना व त्यांची अभिव्यक्ती' उन्मणी जंगे यांचे 'सजगता आणि ध्यान' नेहा मिरजगावकर यांचे 'अध्यात्मातील पाच सापळे' याशिवाय सामूहिक ध्यानातून साधकांनी अंतर्मनातील शांतता आणि प्रफुल्लता अनुभवली. शिबिराच्या अखेरच्या सत्रात सहभागी साधकांनी त्यांच्या ध्यानाच्या अनुभूती मनोगतातून व्यक्त केल्या. शिबिराचे नियोजन रोहित वंगारी, संतोष कांबळे, विवेक वंगारी, ओंकार उटगे, आनंद गांगजी, गणेश मॅकम, श्रीनिवास पुला, प्रकाश पागुल, राजेश मामडयाल, सुधाकर मॅकम, व्यंकटेश आडम, अंबादास कट्टा यांनी केले. सूत्रसंचालन ओंकार उटगे यांनी केले. कार्यक्रमात चंद्रशेखर रेड्डी, नेहा मिरजगावकर, दीपा मेहता, स्मिता दुधनकर, जोत्सना दूस्सल, उन्मणी जंगे, कविता मिरजगावकर, प्रीत सदारंगानी, प्रज्ञा कुलकर्णी, सिद्राम पुराणिक यांचे सहकार्य लाभले. शिबिराची सांगता रोहित वंगारी यांनी आभार प्रदर्शनाने केली.

## प्रधानमंत्री पिक विमा योजनेस ३० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगामामध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजना राज्यातील सर्व जिल्हयात राबविण्यात येत असून, या योजनेत कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांनी सहभाग घेण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ जुलै अशी होती. तथापि, राज्यामध्ये गत वर्षीच्या तुलनेत कमी सहभाग, शेतकऱ्यांकडे ॲग्रीस्टीक फार्मर नसणे, PMFBY पोर्टल सेवेतील व्यत्यय, आधार व सीएसी सर्व्हरवरील व्यत्यय, राज्याच्या भूमी अभिलेख पोर्टलच्या तांत्रिक/सेवेतील व्यत्यय इत्यादीमुळे शेतकऱ्यांच्या योजनेतील सहभागावर होणारा परिणाम लक्षात घेऊन केंद्र शासनाने दि. १ ऑगस्ट, रोजीच्या पत्रातील निर्देशानुसार योजनेत बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होण्यासाठी दि. १४ ऑगस्ट व कर्जदार शेतकऱ्यांना दि. ३० ऑगस्ट, पर्यंत केंद्र शासनाने मुदतवाढ दिली आहे. सर्व शेतकऱ्यांना PMFBY पोर्टलवर सहभाग नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.





## लोकशाही दिनात ३४ तक्रारी प्राप्त; तक्रारींचे निराकरण करण्याचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

जिल्हा प्रशासनाच्या वतीने आज आयोजित जिल्हा लोकशाही दिन कार्यक्रमात नागरिकांकडून ३४ तक्रार अर्ज प्राप्त झाले. या कार्यक्रमात ३८ अधिकारी व विभागीय प्रतिनिधी उपस्थित होते. निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी नागरिकांच्या तक्रारी स्विकारून त्या संबंधित विभागांकडे सुपूर्त केल्या. त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना तक्रारींचे त्वरित व परिणामकारक निराकरण करण्याचे निर्देश दिले. लोकशाही दिन हा नागरिकांच्या अडचणी, तक्रारी व मागण्या थेट प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचा प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हा लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

## ध्येय अन् परिश्रमातून लक्ष साध्य करता येते : पोलिस उपायुक्त गोहर हसन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

विद्यार्थ्यांनी आपल्या शाल्य जिवनात विशिष्ठ ध्येय व उद्दीष्ठ ठेवून परिश्रम केल्यास त्यांना आपले ध्येय साध्य करता येतील असे असे उद्गार सोलापूरचे नूतन पोलिस उपआयुक्त गोहर हसन यांनी काढले.

ते अखिल उर्दू साहित्य संमेलन समितीतर्फे आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सभारंभाच्या अध्यक्ष स्थानावरुन बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणुन सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त सचिन ओंबासे उपस्थित होते. गोहर हसन पुढे म्हणाले की, जिवनात मोठे होण्याकरीता प्रामाणिकपणा, मेहनत, जिद्द व चिकाटीची गरज असते. प्रमुख अतिथी म्हणुन बोलताना म.न.पा. आयुक्त सचिन ओंबासे म्हणाले की, उच्च शिक्षण हाच विकासाचा



मुलभुत पाया असुन आजच्या संगणकीय युगात शिक्षणाशिवाय विद्यार्थ्यांना प्रगती करणे अशक्य आहे. शिक्षणा बरोबर सकारात्मक विचार व परीश्रम करणे आवश्यक आहे उर्दू साहित्य संमेलनाच्या वतीने शहरातील माध्यमिक शाळा तसेच ज्यु. कॉलेजमधील प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवुन उज्वल यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा स्मृति चिन्ह, प्रशस्तीपत्र व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. प्रास्ताविक प्रा.रियाज वळसंगकर यांनी केले. माजी महापौर तथा संस्थेचे अध्यक्ष ॲड. यु.एन.बेरिया यांच्या हस्ते प्रमुख अतिथींचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन अशफाक सातखेड यांनी केले. कार्यक्रमास रफीक नल्लाबंदु, प्रा.हारुन बंदुकवाला, म.हुसेन बक्षी, नासीर आळंदकर, रफिक खान, इक्बाल सय्यद, इरफान कारीगर उपस्थित होते. म.शफी यांनी आभार मानले.

## गर्भलिंग निदान करणाऱ्या केंद्रावर धाडी टाका

### प्रभारी जिल्हाधिकारी जंगम यांचे आदेश

### एडस् प्रतिबंध, लिंग निवड प्रतिबंध आणि तंबाखू नियंत्रणासाठी जिल्हा समित्यांची बैठक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

गर्भधारणा पूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रे (PCPNDT) अंतर्गत लिंग निवडीस प्रतिबंध करण्यासाठी जिल्ह्यातील गुन्हे दाखल प्रकरणांचा आढावा घेण्यात आला. गुप्त पद्धतीने गर्भलिंग निदान करणाऱ्या केंद्रांवर धाडी टाकण्याचे आदेश आरोग्य यंत्रणेला देऊन सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करण्याचे निर्देशही प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिले.

जिल्ह्यातील एडस प्रतिबंध, लिंग निवड प्रतिबंध आणि तंबाखू नियंत्रणासाठी जिल्हा दक्षता समिती व जिल्हास्तरीय समन्वय समितीची बैठक प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जगम यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहात पार पडली. या बैठकीस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, जिल्हा नोडल अधिकारी डॉ. अभय शिंदे तसेच स्त्रीभ्रूण हत्येविरोधात कार्यरत स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्रभारी जिल्हाधिकारी जंगम यांनी एडस् बाधित रुग्णांना वेळेवर औषधे मिळत आहेत का? याचा आढावा घेतला. औषधांच्या तुटवड्याबाबत माहिती घेतली आणि जनजागृतीसाठी जिल्ह्यात शिबिरे घेण्याच्या सूचना दिल्या. शासनाच्या सुविधा कमीत कमी कागदपत्रांवर उपलब्ध करून देण्याचे निर्देशही दिले.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या अनुषंगाने शाळा, महाविद्यालये, रेल्वे स्टेशन, बसस्थानक, गॅरेज आदी ठिकाणी फलकाद्वारे जनजागृती करण्याचे निर्देश श्री जंगम यांनी देऊन तंबाखू व गुटखा विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबतही त्यांनी आदेशित केले. प्रारंभी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने यांनी पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत सुरू असलेल्या कामकाजाची माहिती बैठकीत दिली.

## रविवारपासून श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

जगद्गुरु श्री मन्मध्वाचार्य मूलमहासंस्थान श्री राघवेंद्र स्वामी मठ मंत्रालय येथील सोलापूर शाखेतर्फे ३५४ वा श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सव रविवार दिनांक १० ऑगस्ट ते मंगळवार दिनांक १२ ऑगस्ट दरम्यान सोलापुरातील दोन मठांमध्ये होणार आहे.



श्री राघवेंद्र स्वामी मठ, मंत्रालयम येथील पीठाधिपती श्री श्री १०८ श्री सुबुधेंद्रतीर्थ स्वामीजी यांच्या आज्ञेनुसार सोलापुरातील मुरारजी पेठ आणि श्री काळजापूर मारुती मंदिराजवळील मठात तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम चालणार आहेत. रविवारी (दि.१०) पूर्वाराधना, सोमवारी (दि. ११) दुपारी १२ वाजता मध्याराधना प्रयुक्त लक्ष पुष्पार्चन व तुळशी अर्चना तर मंगळवारी (दि.१२) उत्तराराधना होणार आहे.

आराधना महोत्सवात रविवारी आणि सोमवारी पहाटे ५.३० वाजता सुप्रभात, सकाळी ६ वाजता निर्माल्य विसर्जन, सकाळी ७.३० वाजता अष्टोत्तर पारायण, सकाळी ८ वाजता पाद्यपूजा, सकाळी ९ वाजता पंचामृत अभिषेक, दुपारी १२ वाजता तुळशी अर्चना व नैवेद्य, हस्तोदक, अलंकार, महामंगलारती व तीर्थप्रसाद, रात्री ८ वाजता पालखी सेवा, रथोत्सव, स्वस्तिवाचन, महामंगलारती व श्रेय प्रार्थना होणार आहे. तर मंगळवारी (दि.१२) पहाटे ५.३० वाजता सुप्रभात, सकाळी ६ वाजता निर्माल्य विसर्जन, सकाळी ७.३० वाजता अष्टोत्तर पारायण, सकाळी ८ वाजता पाद्यपूजा, सकाळी ९ वाजता पंचामृत अभिषेक, सकाळी ११ वाजता महारथोत्सव, तुळशी अर्चना व नैवेद्य, हस्तोदक, अलंकार, महामंगलारती व तीर्थप्रसाद आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. मुरारजी पेठ येथील मठामध्ये शनिवारी (दि.९) सकाळी ८ वाजता ऋग्वेदी व यजुर्वेदी नित्य नूतनोपाकर्म व श्रावणी होईल. सायंकाळी ५ वाजता अंबिका व श्रीनिवास काटवे यांचा गुरुवंदना हा भरतनाट्यम चा कार्यक्रम होणार आहे. तर सायंकाळी ६.३० वाजता गोपूजा, ध्वजारोहण, धान्यपूजा, लक्ष्मीपूजा व प्रार्थनोत्सव, स्वस्तिवाचन व महामंगलारती होणार आहे. रविवारी (दि.१०) ते मंगळवारी (दि.१२) सकाळी प्रवचन व भजन होईल. रविवारी (दि.१०) सायंकाळी ६.३० वाजता गीता हेगडे व सहकाऱ्यांचा भक्तिगीत कार्यक्रम सादर होणार आहे. तसेच सोमवारी (दि.११) सायंकाळी ६.३० वाजता प्रशांत देशपांडे व सहकाऱ्यांचा भक्ती गीत कार्यक्रम सादर होणार आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमांना भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन श्री राघवेंद्र स्वामी मठातर्फे करण्यात आले आहे.

## सतीश मालवे यांच्या 'एक पक्षी' गझल संग्रहास समरसता साहित्य पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ६ ऑगस्ट-**

येथील मराठी गझलविश्वात सामाजिक समरसतेचा सुर गझलेतून प्रभावीपणे उमटवणाऱ्या सतिश गुलाबसिंह मालवे यांच्या 'एक पक्षी' या गझल संग्रहास समरसता साहित्य परिषद, महाराष्ट्रतर्फे दिला जाणारा 'समरसता साहित्य पुरस्कार २०२५' नुकताच नांदेड येथे संपन्न झालेल्या २० व्या समरसता साहित्य संमेलनात प्रदान करण्यात आला.



राज्यभरातील शेकडो साहित्य कृतींपैकी या संग्रहाची निवड झाल्या बद्दल ग्रामीण मुस्लीम मराठी साहित्य परिषदेतर्फे संस्थापक शफी बोलडेकर, आध्यक्ष खाजा भाई बागबान यांनी अभिनंदन केले आहे.

## महत्वाचे...

### ब्राह्मण महासंघाच्या महिला आघाडी सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी पद्मजा काळे



**बार्शी, दि.६ ऑगस्ट-**
येथील पद्मजा प्रमोद काळे यांची अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या महिला आघाडी सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. यापूर्वी त्यांनी ब्राह्मण महासंघ तालुका अध्यक्ष म्हणून काम केले आहे. भारतीय जनता पार्टीच्या त्या माजी जिल्हाध्यक्ष आहेत. तसेच त्यांनी भा. ज. पार्टीच्या अनेक पदावर काम केले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल सर्वस्तरातून त्यांचे कौतुक व अभिनंदन होत आहे.



### स्व. गोरख माने यांच्या पुण्यस्मरणार्थ मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना अन्नदान

**टेंभुर्णी, दि.६ ऑगस्ट-**
टेंभुर्णी येथील सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे कै. गोरख मारुती माने आणि ताई गोरख माने यांच्या पुण्यस्मरणानिमित्त जनजागृती प्रबोधन मंच संचलित मूकबधिर निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना अन्नदान करण्यात आले. शांतीलाल माने मित्र परिवार आणि माने कुटुंबियांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते. अन्नदान म्हणून विद्यार्थ्यांना मसाला भात, पनीर भाजी, चपाती, पापड, गुलाबजाम आणि मटकीची उसळ असे पौष्टिक आणि चविष्ट जेवण देण्यात आले. हे स्वादिष्ट जेवण मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद स्पष्ट दिसत होता. यावेळी मुख्याध्यापिका शैलजा पाटील, शिक्षक, कर्मचारी तसेच माने कुटुंबीयांचे नातेवाईक उपस्थित होते. माने कुटुंबीयांनी दरवर्षी अशा प्रकारचे समाजोपयोगी उपक्रम राबवण्याचा मानस व्यक्त केला आहे. संयोजन विशाल माने, शांतीलाल माने, प्रसाद माने, प्रतीक माने, विकास माने, ऋषिकेश कांबळे, चंदन राजभर, विक्रम कांबळे, संतोष धोत्रे, विठ्ठल पवार, धीरज लोंढे, आणि रोहन धोत्रे यांनी केले.




### मोहोळ बँकेच्या टेंभुर्णी शाखेचा ग्राहक मेळावा

**टेंभुर्णी, दि.६ ऑगस्ट-**
मोहोळ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या टेंभुर्णी शाखेचा ग्राहक संवाद मेळावा नुकताच येथील धनश्री हॉटेल येथे संपन्न झाला. यावेळी बँक खातेदार उपस्थित होते. त्यांना चेअरमन डॉ.सागर फाटे यांनी बँकेच्या ठेवी २४ कोटी असून १५ कोटी कर्जे दिली आहेत. ढोबळ एनपीए १६५ टक्के व नेट एनपीए झिरो टक्के आहे व ऑडिट वर्ग 'अ ' असल्याचे सांगितले. ठेवीला व्याजदर ८:५० टक्के असल्याने जनतेने मोहोळ अर्बन बँकेमार्फत आर्थिक व्यवहार करावेत असे आवाहन केले. यावेळी डॉ.धनाजी खताळ , प्रदीप कांबळे, गणेश बापू केचे, सचिन जगताप, जोहर आवटे , शिवाजीराव पाटील, ॲड.बाळासाहेब पाटील, सहकार्य उद्योग समूहाचे प्रकाश (आप्पा) सुभेदार पाटील, संचालक आकाश फाटे, भागवत सुभेदार पाटील, कृषीभूषण दादासाहेब पाटील व नंदकुमार फाटे यांनी मनोगत व्यक्त केले. नागनाथ कांबळे, गोरख बाप्पा देशमुख, नागनाथ पवार, सुनील लोकरे, पांडुरंग कानडे, रणजीत देशमुख, लालचंद माळी, अशोक वाघमारे, दादासाहेब देशमुख, स्वप्निल पाटील उपस्थित होते. सहाय्यक व्यवस्थापक नितीन शिंदे यांनी प्रास्ताविक केले. व्यवस्थापक सुदर्शन शिंदे यांनी बँकेच्या सोयी- सुविधांबाबत तर डिजिटल बँकिंग बद्दल सहाय्यक व्यवस्थापक भैरवनाथ जाधव यांनी माहिती दिली. टेंभुर्णी शाखेचे व्यवस्थापक अमोल ताबे यांनी आभार मानले. संदीप शिंदे, सोनाली हवालदार, सुधीर मोरे, सावित्रीबाई फुले महिला पतसंस्थेचे व्यवस्थापक सिकंदर मुजावर, प्रवीण शिंदे, आकाश शिंदे खेलुदेव वाघमोडे यांनी परिश्रम घेतले.



### सोजर इंग्लिश स्कूलमध्ये मुलांनी खाद्य पदार्थ बनवत घेतला खाण्याचा आनंद

**बार्शी, दि. ६ ऑगस्ट-**
यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सोजर इंग्लिश स्कूल प्राथमिक विभागाच्यावतीने आज बुधवार दि. ६ ऑगस्ट रोजी इयत्ता १ ली ते ४ थी च्या मुलांनी कृतीयुक्त शिक्षणाचा आनंद घेत विविध खाद्य पदार्थ तयार केले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने शाळेच्या मुख्याध्यापिका रिटा नेटके यांनी शाळेचा एक वार्षिक आराखडा तयार केला आहे. त्या अनुषंगाने सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रसाद सहस्त्रबुध्दे यांच्या नेतृत्वाखाली इयत्ता १ ली ते ४ थीच्या सर्व विद्यार्थ्यांनी कृतीयुक्त शिक्षणाचा आनंद घेत विविध खाद्य पदार्थ तयार केले. यामध्ये इ. १ लीसाठी शिक्षक हरीशचंद्र भोसले यांनी विद्यार्थ्यांना चणा चटपटा बनविण्याची कृती सांगितली. इयत्ता २ री मध्ये शिक्षक तुषार गदगी यांनी व्हेज सॅन्डवीच बनविले. इयत्ता ३ रीमध्ये शिक्षिका सोनाली नष्टे यांनी चटकदार भेळ बनवली आणि ४ थीमध्ये शिक्षिका दिपाली देशमुख यांनी मसालेदार पाणीपूरी बनवली. या सर्व पदार्थांचा मुलांनी आस्वाद घेतला व आनंद लुटला.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे उद्या राज्यव्यापी आंदोलन

## जिल्हा परिषदेवर निघणार मोर्चा





**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ ऑगस्ट-**
महाराष्ट्रातील सर्व जिल्हातील ग्रामपंचायत कर्मचारी ८ ऑगस्ट रोजी आपल्या शासन दरबारी प्रलंबित असलेल्या मागण्याची पूर्तता करा, या मागणीसाठी मोर्चाने जिल्हा परिषदेवर धडकणार आहेत. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी ग्रामविकास मंत्री यांना राज्य संघटनेने निवेदन दिले होते. या निवेदनाची दखल घेवून ग्रामविकास मंत्री यांनी त्यांच्या दालनात बैठकीसाठी महासंघाला निमंत्रित केले होते.

तेथे मागण्यासंदर्भत चर्चा झाली व १५ दिवसात मिटिंगचे मिनिटस् देऊ व एक महिन्यात प्रश्नांची सोडवणुक करु, असे अश्वासन मंत्री महोदयांनी दिले. परंतु ना प्रोसिडिंग मिळाले ना कोणत्याही प्रश्नाची सोडवणूक झाली. त्यामुळे राज्यातील सर्व ग्रामपंचायत कर्मचारी अस्वस्थ झाले आहेत. त्यामुळे महासंघाने खालील संघटनात्मक आंदोलनाचा निर्णय घेतला आहे. ८ ऑगस्ट रोजी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयावर मोर्चा त्याचप्रमाणे पुणे येथील विभागीय कार्यालयावर १८ ऑगस्ट रोजी पुणे विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयासमोर निदर्शने, आंदोलन करण्यात येईल, व पुढे सातारा येथे मंत्री महोदयांच्या गावी कलेक्टर कार्यालयावर १८ सप्टेंबर रोजी प्रश्नांची संपूर्ण सोडवणूक होईपर्यंत धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अशी माहिती ग्राम पंचायत कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे व कॉम्रेड ए.बी. कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली आहे.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत- मा. यावलकर समितिच्या शिफारशी लागू करा, ५४ महिन्यांपैकी शासनाने १९ महिन्यांचा किमान वेतनातील वाढीव फरक दिला असून उर्वरित ३५ महिन्याचा वाढीव फरक द्या, किमान वेतनाची मुदत २०२३ लाच संपली असून नवीन किमान वेतन समिती अद्याप न निर्माण झाल्यामुळे कार्मचाऱ्यांवर आर्थिक अन्याय होत आहे. त्यामुळे कामगार विभागाशी संपर्क करुन किमान वेतनाची समितीपासून नवीन किमान वेतन लागू करा, कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठीची उत्पन्न व वसूलीची अट रद्द करा, मा. संचालक पंचायत राज महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि १४ एप्रिल २५ च्या पत्राप्रमाणे महाराष्ट्रातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन पूर्वीप्रमाणे ऑनलाईन करा, लोकसंख्येच्या अकृतीबंधाची जाचक व काळबाहय अट रद्द करुन सध्या पटावर असलेल्या सर्व कार्यरत कर्मचाऱ्याना शासनाच्या तिजोरीतून वेतन दया, रहाणीमान भत्ता १००% शासनाच्या तिजोरीतून द्या, जिल्हा परिषदेमधील एकूण रिक्त पदाची पारदर्शकरित्या जाहीर करा, उत्पादानाच्या अदाईचे निकष बदलून आस्थापनेवरील दहा कर्मचारी व पाच हजार रुपयांची अट रद्द करा, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची भरती करण्यापूर्वी व सेवेतून कमी करण्यापूर्व जिल्हा परिषदेची परवानगी घेणे बंधनकारक करा या मागण्या राज्यव्यापी आंदोलनात करण्यात येणार आहेत.

## पानमंगरुळ येथे रविवारपासून राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**पानमंगरुळ, दि. ६ ऑगस्ट-**
अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरूळ येथील श्री राघवेंद्र स्वामी मठात दि. १० ऑगस्ट २५ ते १२ऑगस्ट २५ पर्यंत श्री राघवेंद्र स्वामी आराधना महोत्सवास प्रारंभ होणार आहे. या तीन दिवसात धार्मिक कार्यक्रमाबरोबर प्रवचन, भजन, सांस्कृतिक होणार आहेत.

शनिवार दि. ९ ऑगस्ट रोजी सायं. ६:३० वाजता गोपूजा, ध्वजारोहण, धान्यपूजा, लक्ष्मीपूजा व प्रार्थनोत्सव, स्वस्तिवाचन व महामंगळाराती इ. रविवार दि. १० ऑगस्ट रोजी पूर्वाराधना रोजी पहाटे ५:३० वा सुप्रभात, सकाळी ८ वाजता ग्राम प्रदक्षिणा, पालखी सेवा, सकाळी १० वा. पाद्यपूजा, अष्टोतर पारायण, दुपारी १२ वा. नैवेद्य, हस्तोदक, अलंकार, महामंगलारती व तीर्थप्रसाद, दुपारी १ वा. सुजाता देशपांडे (सोलापूर) यांचे भक्तिगीत कार्यक्रम, दुपारी २ वा. सुधामृत भजन मंडळ सोलापूर यांचे भजन कार्यक्रम, सायं. ७वा, भजन, पालखी सेवा, रथोत्सव, स्वस्तिवाचन, महामंगलारती व श्रेय प्रार्थना. सोमवार दि. ११ ऑगस्ट मध्याराधना रोजी पहाटे ५:३० वा सुप्रभात, सकाळी ८ वाजता ग्राम प्रदक्षिणा, पालखी सेवा, सकाळी १० वा. पाद्यपूजा, अष्टोतर पारायण, पवमान होम, सकाळी ११ वाजता मध्याराधना प्रयुक्त लक्ष तुळशी अर्चना, दुपारी १२ वा. नैवेद्य, हस्तोदक, अलंकार, महामंगलारती व तीर्थप्रसाद, सायंकाळी ६ वाजता व्यंकटेश संगित विद्यालय यांचे भक्तिगीत कार्यक्रम मंगळवार दि. १२ ऑगस्ट २५ उत्तराधना रोजी पहाटे ५ वा. सुप्रभात, सकाळी ६ वा. निर्माल्य विसर्जन, सकाळी ८ वा. पाद्यपूजा. सकाळी ९ वा. पंचामृत अभिषेक, अष्टोत्तर पारायण, सकाळी ११ वा. सामुहिक मुंज, उपनयन, दुपारी १२ वा. नैवेद्य, हस्तोदक, अलंकार, महामंगलारती, व तीर्थ प्रसाद, सायं ६.३० वा. श्री राघवेंद्र स्वामी भजन मंडळ, यांचे भजन कार्यक्रम. सायंकाळी वा. ८ वा. दयानंद होन्नाली यांचे प्रवचन होणार आहे.

## पोलीस निरीक्षकपदी सुरेश चिल्लावार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ६ ऑगस्ट-**
येथील दक्षिण पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकपदी सुरेश चिल्लावार यांची नियुक्ती झाली. येथील पोलीस निरीक्षक महेश स्वामी यांची बदली झाल्याने त्यांच्या जागेवर चिल्लावार यांनी ४ ऑगस्ट रोजी पदभार घेतला. कुर्डुवाडी येथुन ते अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशनला रूजु झाले.



याआधी त्यांनी सांगली, ठाणे ग्रामीण, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये चांगली कामगिरी बजावली आहे. पदभार घेताच त्यांनी येथील कर्मचाऱ्यांची झाडाझडती सुरू केली असुन पेडिंग गुन्ह्याबाबत माहिती घेतली. पहिल्यांदा येथील समस्या जाणुन घेऊन लोकाभिमुख प्रशासन करण्यास भर असणार असल्याची माहिती त्यांनी याप्रसंगी दिली.




## 'सोजर'च्या विद्यार्थिनींच्या संशोधनाला पेटंट



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ६ ऑगस्ट-**
ग्रामीण भागात असलेल्या सोजर कॉलेज ऑफ फार्मसी, खांडवीच्या दोन प्रतिभावान विद्यार्थिनींनी त्यांच्या सर्जनशील संशोधनाद्वारे राष्ट्रीय स्तरावर यशाची ठसा उमटवला आहे. बी. फार्मसी अंतिम वर्षातील स्वप्नाली नंदकुमार झाल्टे आणि तृतीय वर्षातील संपदा बलवंत मुंढे या विद्यार्थिनींना भारतीय पेटंट कार्यालय, मुंबई यांच्याकडून डिझाइन पेटंट मंजूर झाले आहे, ही बाब संपूर्ण महाविद्यालयासाठी आणि परिसरासाठी गौरवाची आहे.

स्वप्नाली झाल्टे हिने विकसित केलेल्या ऑटोमेटेड थीन लेअर क्रोमॅटोग्राफी प्लेट कोटिंग अप्परेट्स या अभिनव उपकरणाला तर संपदा मुंढे हिच्या मेडिकल एटीएम मशीन या समाजोपयोगी संकल्पनेला पेटंट मिळाल्याने या दोघींनी फार्मसी क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण केला आहे. या दोघी विद्यार्थिनींच्या संशोधनामागे महत्त्वाचे योगदान आहे प्रा. अकलाख शेख आणि प्राचार्य डॉ. सुजित करपे यांचे, ज्यांनी योग्य दिशा व मार्गदर्शन देऊन त्यांचे विचार साकार करण्यास मदत केली.

या उल्लेखनीय यशाबद्दल सोजर कॉलेज ऑफ फार्मसीचे चेअरमन अरुणदादा बारबोले, उपाध्यक्षा कल्पना अरुण बारबोले, तसेच प्राचार्य डॉ. सुजित करपे यांनी विद्यार्थिनींचे मनापासून अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या यशामुळे सोजर कॉलेज ऑफ फार्मसी, खांडवीचे नाव राज्यभर नव्हे तर राष्ट्रीय पातळीवर झळकले असून, दोघी विद्यार्थिनींवर सर्व स्तरांतून कौतुकाचा आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही मोठं यश मिळवण्याची क्षमता आहे, याचा आदर्श उदाहरण म्हणून या दोघींचं नाव आता उभं राहिलं आहे.



## पुण्याच्या महिलांनी केली अकलूजमध्ये १४ लाखांची चोरी

### गर्दीचा फायदा घेत १० लाखांचे दागिने लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ६ ऑगस्ट-**
बसस्थानकातून पुणे येथे निघालेल्या महिलेच्या पर्स मधून गर्दीचा फायदा घेत १० लाख रुपयांच्या दागिन्यांची चोरी करणाऱ्या ४ महिलांना अकलूज पोलिसांनी अत्यंत हुशारीने अटक केली आहे.

दि. ४ ऑगस्ट रोजी दुपारी १.३० वाजन्याच्या सुमारास फिर्यादी महिला या अकलुज बस स्थानक येथुन बसने पुणे येथे जाण्यासाठी निघाले होते. बस मध्ये चढताना गर्दीमध्ये कोणीतरी अज्ञाताने फिर्यादी यांच्या पर्समधील सोन्याच्या बांगडया व गंठन असा अंदाजे १० लाख रुपये किंमतीचे १० तोळे वजनाचे सोन्याचे दागिणे चोरी केले होते. त्यावरुन अकलुज पोलीस ठाणे गुरन नंबर ५४५/२०२५ बी.एन.एस. कलम ३०३ (२) प्रमाणे तक्रार नोंद करण्यात आली होती.

गुन्हा नोंद होताच गुन्हे प्रकटीकरण पथकाने तात्काळ अकलूज बस स्थानक, अकलुज नगरपरिषद सीसीटिव्ही व रस्त्यावरील दुकानाची सीसीटिव्ही कॉमे-याची पाहणी केली असता ४ संशयीत महिला या रिक्षाने टेंभुर्णी रोडने गेल्याचे दिसुन आले. अकलुज ते टेंभुर्णी रोडवरील तसेच टेंभुर्णी शहरातील असे एकुण ३० ते ३५ सीसीटिव्ही फुटेजची पाहणी करुन व त्यांचे तांत्रिक विश्लेषण करुन त्याव्दारे टेंभुर्णी येथुन पळून जाण्याच्या तयारी असताना महिला एकता कैलास उपाध्ये (वय -२४ वर्षे, राहणार मेडिकल कॉलेज शेजारी बापुनगर सेडमनगर कलबुर्गी सध्या राहणार - वॉटर सप्लाय जवळ फुलेनगर येरवडा पुणे), ननीता दिनेश कांबळे (वय - ३५ वर्षे), सुनिता शाखा सकट वय -४५ वर्षे), आरती मेघराज उपाध्य (वय ३० वर्षे सर्वजण राहणार वॉटर सप्लाय जवळ फुलेनगर येरवडा पुणे) यांना शिताफीने ताब्यात घेवुन त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी गुन्हयाची कबुली दिली. त्यांचेकडुन वर नमुद गुन्हयातील चोरी केलेला १० तोळे व यापुर्वी अकलुज बस स्थानाकातून ३ वेगवेगळया गुन्हयातील चोरी केलेले चार तोळे असे अंदाजे १४ लाख रुपये किंमतीचे १४ तोळे वजानाचे सोन्याचे दागिणे हस्तगत करण्यात आलेले आहेत. सदर महिला या सराईत असुन यांचेवर यापुर्वी आंळद पोलीस ठाणे राज्य कर्नाटक, वाई पोलीस ठाणे जिल्हा सातारा, वारजे माळेवाडी, शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर असे वेगवेगळे पोलीस ठाणेस गुन्हे नोंद आहेत.

सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, अकलूज विभाग अकलुज नारायण शिरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निरज उबाळे, सहा. पोलीस निरीक्षक योगेश लंगुटे, सहा. पोलीस निरीक्षक विक्रम साळुंखे, पोलीस उपनिरीक्षक संजय रेगुडे, पोलीस हवालदार सुहास क्षिरसागर, शिवकुमार मदभावी, विक्रम घाटगे, विनोद साठे, सिध्दु कंटोळी, बबलु गाडे, मपोहे मदाकिनी चव्हाण, चालक राहुल नागरगोजे, पोलीस अमंलदार सोमनाथ माने, रणजित जगताप, प्रविण हिंगणगावकर, महिला पोलीस अमंलदार पूनम शिंदे यांनी कामगिरी केली आहे.



## इंदिरा पॉलीटेक्निकमध्ये प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ६ ऑगस्ट-**
सासुरे वैराग (ता. बार्शी) येथील श्री साई चॅरिटेबल ट्रस्ट संचलित इंदिरा इन्स्टिट्यूट ऑफ डिप्लोमा इंजीनियरिंग कॉलेजमध्ये प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचे स्वागत व उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी साई होमिओपॅथी मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. अशोक अनपट, साई औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे प्राचार्य शाम गोवर्धन, प्राचार्य डॉ. डी.आर पिसाळ, व्याख्याते सुधीर भोसले, उपप्राचार्य शाम झांबरे आदींच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. यावेळी प्राचार्य डॉ.अनपट म्हणाले, पालक व विद्यार्थी यांची शिक्षणाबद्दलची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी यशस्वी अभियंता बनावे असे आवाहन त्यांनी केले. प्राचार्य डॉ. डी.आर. पिसाळ यांनी प्रास्ताविक केले. विद्यार्थी-पालक व शिक्षक यांच्यामध्ये नेहमीच सुसंवाद घडून घडल्यास मानसिक तसेच सामाजिक बांधिलकी निर्माण होईल असे मत व्याख्याते श्री. भोसले यांनी मांडले.

यावेळी शिष्यवृत्ती योजना संदर्भात उपप्राचार्य झांबरे यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन केले. अभ्यासक्रमाबाबत प्रा. मिथिला धेंडे व प्रा. जावेद पठाण यांनी माहिती दिली. कॉम्प्युटर विभागाच्या प्रा. सुप्रिया शेळके यांनी सर्वांचे स्वागत केले तर इलेक्ट्रिकल विभाग प्रमुख प्रा. स्नेहा देशमुख यांनी आभार मानले. सूत्रसंचालन सिव्हिल विभाग प्रमुख प्रा. समाधान गायकवाड यांनी केले. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकमुनिकेशनचे विभाग प्रमुख प्रा. सुचिता दुबे, सिव्हिल विभाग प्रमुख प्रा.समाधान गायकवाड आदींसह सर्वांनी परिश्रम घेतले.

# सासवड माळी कारखान्यात मिल रोलर पूजन

## • यंदा ९१ वा गळीत हंगाम

**तभा वृत्तसेवा,**
**माळीनगर, दि. ६ ऑगस्ट-**
येथील सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या यंदाच्या गाळप हंगामासाठी सज्ज होत असलेल्या कारखान्यातील मिल रोलरचे पूजन कारखान्याचे पूर्ण वेळ संचालक गणेश इनामके यांच्या हस्ते करण्यात आले. कारखान्याचा येणारा ९१ वा गळीत हंगाम आहे.

कारखान्याचे चेअरमन राजेंद्र गिरमे यांनी बोलताना सांगितले की उसाचे क्षेत्र व मिळणारे उत्पादन याचा विचार करता यंदा कारखाना चार ते साडेचार महिने चालेल. कारखाना ५ लाखापर्यंत गळीत करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यंदा उन्हाळ्यात धरणातील पाण्याची परिस्थिती चांगली होती. तसेच मे मध्ये राज्यात मान्सूनपूर्व पडलेल्या पावसामुळे उसाचे टनेज आणि रिकव्हरी मध्ये वाढ होईल.गत वर्षापेक्षा उसाचे क्षेत्र वाढले आहे.

ऊस तोडणी यंत्रणेला ॲडव्हान्स देऊन करार केलेले आहेत. यावर्षी ऊस तोडणी मशीन चा जास्तीत जास्त वापर करून ऊस तोडणी केली जाणार आहे. असे राजेंद्र गिरमे यांनी सांगितले.



माळीनगर येथील सासवड माळी शुगर फॅक्टरीच्या मिल रोलरचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी सतीश गिरमे, गणेश इनामके, मोहन लांडे, निळकंठ भोंगळे, निखिल कुदळे, जगताप, राजेंद्र देवकर.

या कार्यक्रमास दुसरे पूर्णवेळ संचालक परेश राऊत, व्हाइस चेअरमन निखिल कुदळे, माजी मॅनेजिंग डायरेक्टर व विद्यमान संचालक सतीश गिरमे, मोहन लांडे, निळकंठ भोंगळे, विशाल जाधव, राजेंद्र देवकर,शुगरकेन सोसायटीचे व्हाइस चेअरमन कपिल भोंगळे, एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी अजय गिरमे, संचालक पृथ्वीराज भोंगळे, आदी मान्यवरांसह कारखान्याचे जनसंपर्क अधिकारी अनिल बनकर, चीफ इंजिनिअर श्री. जगताप, इलेक्ट्रिक इंजिनिअरिंग जाधव, पांढरे, पदाधिकारी व कामगार उपस्थित होते. गत वर्षापेक्षा उसाचे क्षेत्र वाढले आहे. ऊस तोडणी यंत्रणेला ॲडव्हान्स देऊन करार केलेले आहेत. यावर्षी ऊस तोडणी मशीन चा जास्तीत जास्त वापर करून ऊस तोडणी केली जाणार आहे.

MEDICAL

SPORT




दैनिक सोलापूर तरुण भारत

दैनिक तरुण भारतच्या ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

जल शक्ति मंत्रालय MINISTRY OF JAL SHAKTI

Swachh Survekshan Grameen 2025

स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२
जिल्हा परिषद, सोलापूर




Google Play Store वरुन SBMSSG2025 हे मोबाईल ॲपलिकेशन डाऊनलोड करुन सोलापूर जिल्हा निवडा आणि आपला अभिप्राय नोंदवा!

अथवा हा QR Code Scan करुन ॲप डाऊनलोड करा

"उत्सव स्वच्छतेचा मिळून साजरा करुया, अभिप्राय नोंदवून सर्वेक्षणात सहभागी होऊया"

दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!



मा. अब्दुल्ला अलीसाब चौधरी

- अध्यक्ष, अनाबिया एज्युकेशन ट्रस्ट
- नेटबॉल, राष्ट्रीय खेळाडू व राष्ट्रीय पंच.
- बास्केटबॉल, राष्ट्रीय खेळाडू व राष्ट्रीय पंच.
- संचालक, सोलापूर जिल्हा नेटबॉल असोसिएशन.
- पुरस्कार, २०१६-१७ या वर्षाचा कन्या फाउंडेशनचा युवा क्रीडा शिक्षा.

फर्म
एमआर-१, वीट भट्टी अँड एमआर कन्स्ट्रक्शन
साखर कारखाना, कुंभारी रोड, हाडाच्या कारखानाशेजारी, सोलापूर. मो.९१७५७२९८०१/८२०८३३४१४१

दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

मा. चेअरमन, श्री.गजराज मजूर सहकारी संस्था, सोलापूर

दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

संस्थापक



प्रा.शिवाजीराव काळुंगे

काही अर्थ वाढवावा । संसार सुखे करावा !!

धनश्री महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मंगळवेढा मर्या. सोलापूर जिल्हा

स्थापना : २५/०१/१९९६
मुख्य कार्यालय : शिवप्रेमी चौक, दामाजी रोड मंगळवेढा फोन ८३७९९०८५२
E-mail ID: dhanashri.parivar@gmail.com

संस्थेची ठळक वैशिष्ट्ये

● २८ वर्षात ८०० कोटी ठेवीकडे वाटचाल. ● सर्व प्रकारचे बँकिंग व्यवहार. ● १४ शाखांसह गुणात्मक विस्तार. ● सर्व शाखा संगणकीकृत (CBS कार्यप्रणाली). ● सर्व प्रकारच्या व्यवहारानंतर खातेदारांना SMS सुविधा. ● RTGS d NEFT सुविधा. ● शिक्षित व प्रशिक्षित कर्मचारी वर्ग. ● आकर्षक व्याजदर. ● पारदर्शक व्यवहार. ● सर्व ग्रामीण शाखांच्या प्रशस्त इमारती. ● विनम्र व तत्पर सेवा.

चेअरमन

सौ. शोभा शिवाजीराव काळुंगे

व्हा. चेअरमन

सौ. शांताबाई श्रीशैल धायगोंडे

जनरल मॅनेजर

सौ. सुनिता भीमराव सावंत

व संचालक मंडळ, सर्व सल्लागार, शाखाधिकारी, कर्मचारी वृंद व पिग्मी एजंट

आमचे दैवत



मा.आ.सुभाष (बापू) देशमुख



मा. मनिष(भैय्या) देशमुख
संचालक, श्री सिध्देश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर



मा. यतीन शहा
जिल्हा चिटणीस, भाजप

दैनिक सोलापूर तरुण भारत वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

उपसरपंच — मा. सौ. सरिता तुरबे
ग्रामपंचायत सदस्य — श्री. संगप्पा बिराजदार-पाटील
ग्रामपंचायत सदस्य — श्री. सोमनिंग कमळे

सरपंच



ग्रामपंचायत सदस्य — श्री. रविंद्र कदम
ग्रामपंचायत सदस्या — सौ. राजेश्री जंगलगी
ग्रामपंचायत सदस्या — सौ. रुपादेवी कमळे
ग्रामपंचायत सदस्या — सौ. स्मिता मुक्काणे
ग्रामपंचायत सदस्या — सौ. आश्विनी पाटील

ग्रामपंचायत सदस्या — सौ. युक्ता शहा
ग्रामविकास अधिकारी — श्री. ज्ञानेश्वर कोळी
चेअरमन वि.का.सोसा. — श्री. मुकेश व्हनकोरे
व्हाईस चेअरमन वि.का.सोसा. — श्री. व्हन्नप्पा अरकेरी
संचालक वि.का.सोसा. — श्री. आमसिध्द घोडके
संचालक वि.का.सोसा. — श्री. बाळासाहेब मैंदर्गी
संचालक वि.का.सोसा. — श्री. महादेव हत्ताळे
संचालक वि.का.सोसा. — श्री. महादेव बगले

संचालक वि.का.सोसा. — श्री. आमसिध्द बुधाळे
संचालक वि.का.सोसा. — श्री. इरण्णा कोरे
संचालक वि.का.सोसा. — श्री. प्रवीण बिराजदार
संचालिका वि.का.सोसा. — सौ. कमल मुक्काणे
संचालिका वि.का.सोसा. — श्रीमती राजेश्री पाटील
तज्ञ संचालक वि.का.सोसा. — श्री. शिरीष शहा
तज्ञ संचालक वि.का.सोसा. — श्री. सिध्दाराम (पुत्रप्पा) बबलेश्वर
सेक्रेटरी वि.का.सोसा. — श्री. लक्ष्मीकांत बबलेश्वर

मा. भिमाशंकर बबलेश्वर

सौजन्य समस्थ ग्रामस्थ भंडारकवठे। ग्रामपंचायत भंडारकवठे। विविध कार्यकारी सेवा सह. विकास सोसायटी, भंडारकवठे